मराठी अस्मितेचा बुलंद आवाज.

https://epapervrittamanas. in/

# वृत्तमानस

मुंबई/ पालघर | मुंबई, सोमवार, १६ सप्टेंबर २०२४ | वर्ष- २९ | अंक - ८७ | पाने- ८ | आर. एन. आय क्र. - ६५६०९/९६ | किंमत : ३ रुपये

Email : vrittamanas1@gmail. com

*मराठी अस्मितेचा आवाज बुलंद करण्याचे कार्य गेली २७ वर्षे करणारे 'दैनिक वृत्तमानस' आता घरोघरी पोचवण्याचे काम आम्ही करणार आहोत. वाचकांना आमच्या लोकप्रिय दैनिकाची प्रत उपलब्ध होत नसेल तर या दूरध्वनींवर संपर्क साधावा.*

***दातार अँड सन्स न्युज पेपर डिस्ट्रिब्युटर्स***

*भ्रमणध्वनी - ८६५५१९४५५२, ८५९१६६२६१६,९८६७३०८०६३*



जुनी पेन्शन योजना आम्ही लागू करु

पान ५

## बहिणींची अब्रू वाचविण्याची गरज

# ...अन् सरकार लाडक्या बहिणींना 1500 रुपये देतंय!

**प्रतिनिधी**
**धुळे**

हे सरकार बहिणींना 1500 रुपये देणार आहे. पण बहिणींची अब्रू वाचविण्याची गरज आहे. बहिणींचा सन्मान राखला जावा, त्याकडे या सरकारचे मुळीच लक्ष नाही असे म्हणत शरद पवार यांनी राज्य सरकारच्या लाडक्या बहीण योजनेवरुन टोला लगावला आहे.

शरद पवार पुढे बोलताना म्हणाले की, महाराष्ट्रात गुंडगिरीचे राज्य सुरु आहे. सत्तेचा गैरवापर सुरु आहे. काखाने, सहकार चळवळी यांच्यासाठी या सरकारने काहीही काम केलं नाही. तसंच रोजगाराच्या संधीही निर्माण केल्या नाहीत. मागच्या 10 वर्षांत देशाचा विकास झालेला नाही, असे म्हणत राज्य सरकारवर निशाणा साधला.

### पवारांचा महायुती सरकारला टोला



### सत्तेचा माज काहींच्या डोक्यात

शरद पवार म्हणाले की, सरकार लोकांच्या सेवेसाठी आहे, सत्तेचा माज काहींच्या डोक्यात आला आहे. सत्तेचा उन्माद आहे, त्यांना जागा दाखविण्याचे कामं या निवडणुकीत करायचे आहे. बाबासाहेबांनी लोकशाहीचा अधिकार आपणास दिला आहे. परंतु या लोकांना सत्तेचा उन्माद चढला आहे. त्यांना आता खड्यासारखे बाजूला काढा. या निवडणुकीत ती संधी तुम्हाला आहे.

### मोदी सरकार शेतकरी विरोधी

शरद पवार म्हणाले की, आजच्या राज्यकर्त्यांना शेती आणि शेतकरी यांच्याविषयी काहीही आस्था नाही. मी दहा वर्षे कृषी मंत्री म्हणून काम केलं आहे. त्यावेळी देश अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाला. मी 10 वर्ष या खात्याचे काम पाहिलं आणि 2014 मध्ये मी त्या खात्याचं काम सोडलं. त्यावेळी मला सांगायला अभिमान वाटतो की, भारत देश 10 वर्षात जगातील गहू निर्यात करणारा दोन नंबरचा देश बनला. मोदी सरकारने कांद्यावर निर्यातबंदी आणली. कांद्याला भाव मिळाला नव्हता. कांदा उत्पादक शेतकऱ्याने कष्टाने पिक घेतलं. त्यानंतर निर्यातबंदी करण्यात आली. गहू, तांदूळ याबाबत हे घडलं. जे पिकवाल त्या धान्यावर, उत्पादनावर निर्यात बंदी. मोदी सरकार शेतकरी विरोधी आहे,असा हल्लाबोल शरद पवारांनी केला आहे.



## रंगारी बदक चाळीत स्वामी समर्थांच्या लिलांचे दर्शन

मुंबई : लालबागच्या रंगारी बदक चाळ गणेशोत्सव मंडळाने यंदाही आपली धार्मिक ,सामाजिक देखाव्यांची परंपरा कायम राखली आहे.राष्ट्रीय मित्र मंडळाने यंदा स्वामी समर्थांच्या अपूर्व लीलांचे दर्शन चलत्चित्र आणि निवेदनाद्वारे गणेशभक्तांसमोर सादर केले आहे. हा अद्भुत नजारा अनुभवण्यासाठी आणि लाडक्या बाप्पाचे दर्शन घेण्यासाठी भाविकांची मोठी गर्दी उसळली आहे. यंदा हे मंडळ आपले ८५ वे वर्ष साजरे करीत आहे.

छाया - अनिल पानस्कर

# राहुल गांधी एक नंबरचे दहशतवादी, शीख समुदायात फूट पाडत आहेत !

### केंद्रीय मंत्री रवनीत सिंह बिट्टू यांचा हल्लाबोल

**वृत्तसंस्था**
**नवी दिल्ली**

केंद्रीय मंत्री आणि भाजपा नेते रवनीत सिंह बिट्टू यांनी राहुल गांधी हे देशातले एक नंबरचे दहशतवादी आहेत त्यांच्यावर इनाम ठेवलं पाहिजे असं वक्तव्य केलं आहे. राहुल गांधी यांनी शिख समुदायात फूट पाडण्याचा प्रयत्न केला आहे. शिख समुदाय कुठल्याही पक्षाशी संबंधित नाही तरीही या समाजात ठिणगी टाकण्याचं काम राहुल गांधींनी केलं आहे. राहुल गांधी देशातले एक नंबरचे दहशतवादी आहेत असं बिट्टू यांनी म्हटलं आहे. राहुल गांधी यांनी अमेरिकेत शिख समुदायाबाबत जे वक्तव्य केलं त्यानंतर बिट्टू यांनी हे म्हटलं आहे.

'मी आव्हान देतो, जे शिख लोक इथे आहेत त्यांनी सांगावं की शिख समुदाय कुठल्या पक्षाशी जोडला गेला आहे का? भागलपूरमध्ये त्यांना (राहुल गांधी) कुणीतरी सांगितलं आम्ही पगडी घालू शकत नाही, कडं वापरु शकत नाही. कुणी सांगितलं हे? कोण म्हणतंय गुरुद्वारामध्ये आम्हाला जाता येत नाही? मला एका शिख बांधवाने सांगावं मी भाजपा सोडून देईन. भांडणं लावण्यासाठी आधी मुस्लीम समाजात फूट पाडण्याचा प्रयत्न झाला. आता शिख समुदायांत भांडणं लावण्याचा प्रयत्न होतो आहे. शिख समुदायात फूट पाडण्याचं काम सुरु आहे. असा आरोप बिट्टू यांनी केला आहे.

# झारखंडचे तीन शत्रू झामुमो, राजद, काँग्रेस - पंतप्रधान

### काँग्रेसला विकासाची चिंता नाही; झामुमो बांगलादेशी घुसखोरांसोबत

**वृत्तसंस्था**
**जमशेदपूर**

विधानसभा निवडणुकीपूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी आज झारखंड दौऱ्यावर आहेत. जमशेदपूर येथील परिवर्तन महारॅलीला संबोधित करताना पंतप्रधान मोदींनी विरोधकांवर जोरदार हल्लाबोल केला. ते म्हणाले की झारखंडचे तीन शत्रू आहेत, झारखंड मुक्ती मोर्चा,काँग्रेस आणि राष्ट्रीय जनता दल.



वेगळ्या झारखंडच्या निर्मितीपासून आरजेडी बदला घेत आहे. तर काँग्रेस झारखंडचा द्वेष करते. इतकी वर्षे सत्तेत राहूनही काँग्रेसने झारखंडच्या विकासासाठी काहीही केले नाही. राज्याचा विकास करायचा असेल तर भाजपला संधी द्या, असेही पंतप्रधान यावेळी म्हणाले. घुसखोरीबाबत पंतप्रधानांनी जेएमएमवर निशाणा साधला. बांगलादेशी घुसखोरांच्या पाठीशी झारखंड मुक्ती मोर्चा पक्ष उभे असल्याचे पंतप्रधान म्हणाले. तुष्टीकरणाच्या राजकारणात हे लोक आधी दलित, आदिवासी आणि मागासलेल्या समाजाच्या हिताचा बळी देतात.

**मोदींनी दाखवला ६ 'वंदे भारत' एक्सप्रेसना हिरवा झेंडा**

*पंतप्रधानांनी रांची विमानतळावरून 6 वंदे भारत ट्रेनला हिरवा झेंडा दाखवला. पीएम मोदींनी 7 मोठ्या रेल्वे योजनाही ऑनलाइन लाँच केल्या. त्याचवेळी जमशेदपूरमध्ये 2 कोटी पक्की घरेही देण्यात आली.याआधी पंतप्रधान मोदी स्वतः टाटानगर रेल्वे स्थानकावरून या सर्व कार्यक्रमाची सुरुवात करणार होते, मात्र खराब हवामानामुळे हेलिकॉप्टर उडू शकले नाही. त्यानंतर ते रस्त्याने जमशेदपूरला पोहोचले. त्यांचा बिस्तुपूर मेन रोड ते गोपाल मैदान हा रोड शोही मुसळधार पावसामुळे रद्द करण्यात आला.*

## म ह त्त्वा चे

### अल्बर्ट आइनस्टाईन यांच्या पत्राचा 33 कोटींना लिलाव

**न्यूयॉर्क :** अल्बर्ट आइनस्टाईन यांच्या एका पत्राचा लिलाव करण्यात आला. या पत्रावर अल्बर्ट आइनस्टाईन यांची सही होती. हे पत्र ३३ कोटी रुपयांना विकलं गेलं. अल्बर्ट आइनस्टाईन यांनी हे पत्र १९३९ मध्ये अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष असलेल्या रुझवेल्ट यांना लिहिलं होतं. या पत्रात अल्बर्ट आइनस्टाईन यांनी अणुबॉम्ब आणि त्याचा शस्त्र म्हणून होणारा वापर याबाबत इशारा दिला होता. या पत्रामुळे दुसऱ्या महायुद्धात अणुबॉम्बच्या निर्मितीचा मार्ग खुला झाला असंही म्हणता येईल. या पत्राचा लिलाव क्रिस्टीज या कंपनीने केला. या कंपनीचे वरिष्ठ अधिकारी पीटर क्लारनेट म्हणाले हे पत्र इतिहासातलं सर्वात महत्त्वाचं आणि वैशिष्ट्यपूर्ण पत्र आहे. १९३९च्या उन्हाळ्यात ते अल्बर्ट आइनस्टाईन यांनी लिहिलं होतं.

### आजारी मुलाच्या आईवर वॉर्डबॉयकडून अतिप्रसंगाचा प्रयत्न

**कोलकाता :** कोलकाता शहरात आणखी एक खळबळजनक घटना घडली आहे. कोलकात्यातील दुसऱ्या एका रुग्णालयात महिलेची छेडछाड झाल्याचा प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी कोलकाता पोलिसांनी एका आरोपीला अटक देखील केली आहे. पोलिसांनी या प्रकरणाची माहिती देताना सांगितलं की पीडित महिलेच्या मुलावर रुग्णालयात उपचार चालू आहेत. रात्री आई तिच्या मुलाच्या शेजारी झोपली होती. त्याचवेळी रुग्णालयातील एका वॉर्डबॉयने झोपेत असलेल्या महिलेवर अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न केला. पीडितेने तिच्या तक्रारीत म्हटलं आहे की आरोपी वॉर्डबॉयने आधी त्या महिलेचा झोपलेल्या अवस्थेत व्हिडीओ चित्रीत केला. त्यानंतर तिच्यावर अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न केला. पीडितेच्या तक्रारीनंतर वॉर्डबॉयला अटक केली आहे.

# जनतेचा कौल मिळाल्याशिवाय मुख्यमंत्र्यांच्या खुर्चीत बसणार नाही!

### केजरीवाल यांचे दोन दिवसात सीएमपदाचा राजीनामा देण्याचे संकेत

**वृत्तसंस्था**
**नवी दिल्ली**

दोन दिवसांपूर्वी जामिनावर तुरुंगातून बाहेर आलेले अरविंद केजरीवाल यांनी रविवारी सांगितले की, दोन दिवसांत मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा देणार आहे. आम आदमी पार्टीच्या कार्यालयात केजरीवाल बोलत होते. ते म्हणाले- भाजपने माझ्यावर अप्रामाणिकपणा आणि भ्रष्टाचाराचे आरोप केले, आता जनतेच्या कोर्टात माझ्या प्रामाणिकपणाचा निर्णय होईल. निवडणुकीपर्यंत मी मुख्यमंत्र्यांच्या खुर्चीवर बसणार नाही.

मनीष सिसोदिया यांच्यावरही माझ्यासारखेच आरोप आहेत, असे केजरीवाल म्हणाले. तेही पद भूषवणार नाहीत, निवडणूक जिंकल्यावरच पद



भूषवणार, असे त्यांनी सांगितले.

केजरीवाल भगतसिंग यांचे तुरुंगात लिहिलेले पुस्तक "भगतसिंगची जेल डायरी" घेऊन भेटीला पोहोचले. इंग्रज भगतसिंगांची पत्रे बाहेर काढायचे, असे सांगितले. मी तुरुंगात होतो, माझे पत्र एलजीला दिले गेले नाही. "मला पुन्हा असे न करण्याची धमकी देण्यात आली

केजरीवाल म्हणाले की, भगतसिंग यांच्यानंतर स्वतंत्र भारतात 90-95 वर्षांनंतर एक क्रांतिकारी मुख्यमंत्री तुरुंगात गेला. 15 ऑगस्टच्या तीन दिवस आधी मी एलजींना आतिशी यांना माझ्या जागेवर तिरंगा फडकवण्याची परवानगी द्यावी असे सांगितले होते. हे पत्र एलजीपर्यंत पोहोचले नाही. प्रभू राम 14 वर्षांनी वनवासातून परतले तेव्हा माता सीतेला या परीक्षेला सामोरे जावे लागले. आज मी तुम्हाला अग्निपरीक्षा देईन असे केजरीवाल म्हणाले

### दिल्ली विधानसभेच्या निवडणुका नोव्हेंबरमध्ये व्हाव्यात


केजरीवाल म्हणाले- निवडणुका फेब्रुवारीमध्ये आहेत, निवडणुका नोव्हेंबरमध्ये व्हाव्यात अशी माझी मागणी आहे. महाराष्ट्रासोबत निवडणुका झाल्या पाहिजेत. तुमचा निर्णय येईपर्यंत मी जबाबदारी घेणार नाही. आम आदमी पक्षाचा दुसरा कोणीतरी मुख्यमंत्री होईल.

# कोंझर घाटात 40 प्रवाशांची बस कोसळली; सुदैवाने जिवीतहानी नाही

### निपाणीजवळ कंटेनर-कारचा अपघात, 3 ठार

**प्रतिनिधी**
**पोलादपूर /कोल्हापूर**

आजचा रविवार हा अपघातवार ठरला असून दिवसभरात अपघाताच्या तीन मोठ्या घटना घडल्या आहेत. धुळे जिल्ह्यात आज सकाळीच भीषण अपघाताची घटना घडली असून त्यामध्ये 4 जणांचा मृत्यू झाला. तर, सायंकाळी कोल्हापूर जिल्ह्याजवळील निपाणी येथे कंटेनवर, चारचाकी आणि दुचाकीचा भीषण अपघात होऊन तीन जणांचा मृत्यू झाल्याची घटना घडली. तसेच, रायगड जिल्ह्यातील कोंझर घाटात बस दरीत कोसळल्याने मोठी दुर्घटना घडली.



सुदैवाने या दुर्घटनेत बसमधील सर्वच प्रवासी सुखरुप आहेत. या बसमधून 40 पेक्षा जास्त प्रवासी प्रवास करत होते.

### रायगडमध्ये बस दरीत कोसळली

*रायगडमधील कोंझर घाटात एका बसला अपघात झाला. ही बस कोंझरवरून मुंबईच्या दिशेला जात असताना रस्त्याच्या बाजूला चिखलात घसरल्याने हा अपघात झाला. या अपघाताची माहिती मिळताच कोंझर गावातील ग्रामस्थांनी तातडीने घटनास्थळी धाव घेऊन गाडीमधून अडकलेल्या सर्व प्रवाशांना सुखरूप बाहेर काढले आहे. मिळालेल्या माहितीनुसार या बसमध्ये दहा महिला व 10 लहान मुले असल्याची माहिती प्राप्त झाली आहे. रस्त्यालगत गेलेल्या या जागेवर चिखल असल्याने गाडी फार दूर गेली नसल्याची माहिती आहे. झाडाचा आधार घेत बस चालकाने बस सुरक्षितपणे थांबवण्याचा प्रयत्न केला. बसमधील सर्वच प्रवाशांना सुखरूप गाडीतून बाहेर काढून रस्त्यावर आणण्यात आले आहे. स्थानिकांनी घाबरलेल्या प्रवाशांना धीर दिला.*

# नितेशने 'मशीद' हा शब्द वापरायला नको होता

### नारायण राणेंकडून मुलाला समज

**प्रतिनिधी**
**कुडाळ**

"नितेश राणेंनी जे काही व्यक्तव्य केलं. त्याला तसं म्हणायचं नव्हतं. आमच्या देशात येऊन जर तुम्ही अतिरेकी कारवाया करणार असाल तर आम्ही आक्रमक होऊ, असं त्याला म्हणायचं होतं. मात्र, मशीद हा शब्द त्याने वापरायला नको होता. त्यानंतर त्याने त्यामध्ये खुलासा केला, की माझी चूक झाली", असं रत्नागिरी-सिंधुदुर्गचे खासदार नारायण राणे म्हणाले. ते सिंधुदुर्गमध्ये पत्रकारांशी बोलत होते. यावेळी रिफायनरी पुन्हा होण्यासाठी स्वतः पुढाकार घेणार असल्याचेही राणे यांनी स्पष्ट केले.

नारायण राणे म्हणाले, नितीन गडकरी हे मोठे नेते आणि माझे मित्र आहेत. त्यांचं वक्तव्य राजकीय की वैयक्तिक हे मला माहित नाही. मी त्या विषयावर बोलणार नाही. नितीन गडकरी यांच्या पंतप्रधान पदाच्या गौप्यस्फोटावर खासदार नारायण राणे यांनी बोलण्यास नकार दिला.

पुढे बोलताना नारायण राणे म्हणाले, उध्दव ठाकरे यांना बजेट कळत नाही, ते मुख्यमंत्री काय होणार ? अडीच वर्षे मुख्यमंत्री राहून काहीही काम न करता फुकट मानधन घेतलं. ब्रश न करता संजय राऊत सकाळी



पत्रकार परिषद घेतो आणि पत्रकार दाखवतात अशा शब्दात नारायण राणे यांनी संजय राऊत यांच्यावर तोंडसुख घेतलं.

मशिदीत घुसून मारू हा नितेशचा शब्द चुकीचा होता, पण भारतात राहून देशाच्या विरोधी कृत्य करणाऱ्या लोकांच्या विरुद्ध देशातील किती मुस्लिमांनी आवाज उठवला. नितेश बोलला म्हणून त्याच्या विरुध्द आवाज उठवता, पण नितेशचे तोंड बंद केलात तर हजार नितेश राणे तयार होतील, असंही नारायण राणे म्हणाले.

संजय राऊत यांना अक्कल नाही. उध्दव ठाकरे आणि संजय राऊत म्हणजे महाराष्ट्र नाही. मी त्यांच्यावर बोलणार नाही. शरद पवार चार वेळा मुख्यमंत्री होते. तेव्हा महिलांवरील अत्याचार का थांबले नाहीत. तेव्हाची यादी बाहेर काढू का ? असा सवालही नारायण राणे यांनी केला. या वयात हातात काही नसताना शरद पवार यांना काहीही आठवत, असंही राणे म्हणाले.

# एसटी प्रवासात अडचण आल्यास थेट आगार प्रमुखांना फोन करा

**प्रतिनिधी**
**मुंबई**

एसटीच्या प्रवासात प्रवाशांना काही अडचण आल्यास त्यांना त्याबाबत थेट आगार प्रमुखांकडे तक्रार करता येणार आहे. त्यानंतर तक्रारीचे तातडीने निराकरण होईल, अशा पद्धतीची यंत्रणा एसटी प्रशासनाकडून उभी करण्यात आली आहे.एसटी बसमध्ये चालकाच्या मागील बाजूस संबंधित बस ज्या आगारातील आहे, त्या आगार प्रमुखांचा दूरध्वनी क्रमांक, तसेच तेथील स्थानक प्रमुख व कार्यशाळा अधीक्षक यांचा दूरध्वनी क्रमांक लिहिण्यात आला आहे.

एसटीच्या प्रवासात काही समस्या अथवा अडचण आल्यास त्यासाठी दाद कोणाकडे मागावी? हा एक मोठा प्रश्न प्रवाशांसमोर होता. त्यामुळे प्रवाशांच्या सुचनेनुसार एसटी महामंडळाने आता ज्या आगाराची बस आहे, त्या आगार प्रमुखांचा नंबर प्रसिद्ध करण्यास सुरुवात केली आहे. जेणेकरून प्रवासादरम्यान प्रवाशांना अडचण अथवा समस्या निर्माण झाली तर त्या समस्येचे किंवा तक्रारीचे निराकरण तातडीने व्हावे, हा या मागचा उद्देश आहे. त्यामुळे प्रवासादरम्यान त्यांना एखादी अडचण आल्यास थेट तिथे प्रदर्शित केलेल्या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधून अडचणीत अथवा समस्येचे निवारण तातडीने करावे, असे आवाहन एसटी महामंडळाने केले आहे.

# भूसंपादन प्रक्रियेत भरपाई देणे सरकारचे कर्तव्यच!

### सुप्रीम कोर्टाचा जमीनमालकांना मोठा दिलासा

**वृत्तसंस्था**
**नवी दिल्ली**

विविध सार्वजनिक प्रकल्पांमध्ये स्वतःची खाजगी जमीन देणाऱ्या आणि नंतर वर्षानुवर्षे भरपाईच्या प्रतीक्षेत राहणाऱ्या जमीनमालकांना सर्वोच्च न्यायालयाने मोठा दिलासा दिला आहे. पालिका व इतर सरकारी यंत्रणांनी प्रकल्पांसाठी संपादित केलेल्या जमिनीची भरपाई जमीनमालकांना वेळीच दिली पाहिजे, सरकारचे हे कर्तव्यच आहे, असे स्पष्ट करीत न्यायालयाने मुंबई महापालिकेला विविध प्रकल्पांतर्गत भरपाईची प्रक्रिया जलदगतीने मार्गी लावण्याचे निर्देश दिले.

बृहन्मुंबई महापालिकेने रस्ते तसेच इतर सार्वजनिक प्रकल्पांसाठी जमीन संपादित केली होती. त्या जमिनीच्या बदल्यात भरपाई



म्हणून टीडीआरची मागणी करीत बिल्डरांनी मुंबई उच्च न्यायालयात अनेक याचिका दाखल केल्या होत्या. तथापि, टीडीआरची मागणी करण्यास ८ ते १३ वर्षांचा विलंब केल्याच्या कारणावरून उच्च न्यायालयाने २०१८ मध्ये बिल्डरांच्या याचिका फेटाळल्या होत्या. उच्च न्यायालयाचा तो निकाल सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती बी. व्ही. नागरत्ना आणि न्यायमूर्ती एन. के. सिंह यांच्या खंडपीठाने रद्द केला आहे. टीडीआरची मागणी करण्यास विलंब केल्याच्या कारणावरून रिट याचिका फेटाळण्याचा उच्च न्यायालयाचा निर्णय योग्य नाही, असे सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने म्हटले आहे. कुकरेजा कन्स्ट्रक्शन व इतरांनी दाखल केलेल्या जवळपास अर्धा डझन अपिलांचा खंडपीठाने स्वीकार केला आणि मुंबई महापालिकेला टीडीआरच्या रूपात भरपाई देण्याची प्रक्रिया जलदगतीने पूर्ण करण्याचे निर्देश दिले.

### कर्तव्यात कसूर केल्यास हक्कावर आघात ठरेल!

टीडीआरच्या रूपात भरपाई निश्चित केल्यानंतर जमीनमालकाने निवेदन दिले नाही तरी भरपाई देण्यासाठी सरकार बांधील आहे. सार्वजनिक प्रकल्पांत जमीन गमावलेल्या जमीनमालकांना भरपाई देणे सरकारचे कर्तव्यच आहे. या कर्तव्यात कसूर केल्यास तो राज्यघटनेच्या अनुच्छेद ३०० मधील मालमत्ता हक्कावर आघात ठरेल, असे मत सर्वोच्च न्यायालयाने व्यक्त केले आहे.

## परेरानगरचे शाखाप्रमुख (शिंदे गट) संतोष कानसे यांचे निधन

**वसई :** नायगाव पूर्व परेरानगरचे शिवसेना (शिंदे गट) शाखाप्रमुख संतोष कानसे यांचे शनिवारी (दि.14) रात्रीच्या सुमारास हृदयविकाराच्या तिव्र धक्क्याने निधन झाले. त्यांच्या निधनाने नायगाव पूर्व पट्टीतील शिवसेनेचा (शिंदे गट) बुलंद कार्यकर्ता हरवल्याने हळहळ व्यक्त होत आहे. त्यांच्या पश्चात आई, पत्नी व दोन मुली असा परिवार आहे. रविवारी (दि.15) परेरानगर येथील स्मशानभूमित त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. मृत्यूसमयी ते 48 वर्षांचे होते. नायगाव पूर्व परिसरातील अनधिकृत बांधकामं, अनधिकृत बांधकामांना अवैध विजजोडण्या याप्रकरणी शिवसेना शाखाप्रमुख संतोष कानसे यांनी आवाज उठवला होता. सातत्याने पालिकेकडे पाठपुरावा करून पालिकेला अनधिकृत बांधकामांवर कारवाईसाठी मोहिम उगारण्याचे आवाहन ते करत होते. शिंदे गटाची शिवसेना नायगाव पूर्व परिसरात वाढवण्यासाठी ते खऱ्या अर्थाने प्रयत्नशील होते, तशा प्रयत्नांत ते अग्रेसर होते. शिवसेनेच्या वतीने करण्यात येणाऱ्या विविध आंदोलनांत त्यांचा मोठा सहभाग होता. मात्र त्यांच्या सारखा एक बुलंद कार्यकर्ता काळाच्या पडद्याआड गेल्याने शिवसेनेच्या गोटात हळहळ व्यक्त होत आहे. त्यांच्या अंत्यसंस्कारावेळी विविध राजकीय पक्षांचे पुढारी, पदाधिकारी उपस्थित होते.



## थोडक्यात

### 50 लाख रुपयांच्या प्रतिबंधित विदेशी सिगारेटी जप्त

**मुंबई:** मुंबई पोलीसांकडुन संपुर्ण मुंबई आणि मुंबईच्या आजुबाजुच्या परीसरात मोठ्या प्रमाणात प्रतिबंधित विदेशी व इलेक्ट्रॉनिक्स सिगारेटीवर कार्यवाही चालू असतांना तब्बल ५० लाख रुपयांच्या विदेशी सिगारेटीचा साठा चकाला अंधेरी येथील एका कुरीअर ऑफीसमध्ये सापडला.
मुंबई पोलीसांनी मुंबई आणि आजु-बाजुच्या परीसरात केलेल्या कार्यवाहीत आतापर्यंत सुमारे ५० लाखापर्यंतच्या रुपयाच्या विदेशी सिगारेट जप्त केल्या आहेत. प्रतिबंधित विदेशी सिगारेटीचा लाखो रुपयाचा माल पोलिसांनी मुंबई चकाला, अंधेरी (पू.) येथून हस्तगत केला असून तरुणास अटक करुन कार्यवाही केलेली आहे. तपासणीदरम्यान टॉप गन फ्रेश सील, प्लॅटिनम 7 या प्रतिबंधित विदेशी सिगारेट साठा आढळला. आरोपीने विदेशी / ई सिगारेट भारत सरकारने प्रतिबंधित परदेशी बनावटीची /ई सिगारेट बेकायदेशीरपणे वितरणासाठी जवळ बाळगला व इलेक्ट्रॉनिक्स सिगारेट प्रतिबंध (उत्पादन निर्मिती आयात निर्यात वाहतूक विक्री वितरण साठा आणि जाहिरात) कायदा 2019 चे उल्लंघन केले म्हणून गु.र. क्र. 721/2024 कलम 3.4 7 इलेक्ट्रॉनिक्स सिगारेट उत्पादन निर्मिती आयात निर्यात वाहतूक विक्री वितरण साठा आणि जाहिरात प्रतिबंध कायदा 2019 म्हणून मुंबई पोलीसांनी कारवाही करुन गुन्हा नोंदविला आहे.

### जयवंत दळवी जन्मशताब्दीनिमित्त बोरिवलीत कार्यक्रम

**मुंबई:** कोकण मराठी साहित्य परिषद, मुंबई जिल्हा आणि कोकण मराठी साहित्य परिषद, बोरिवली शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने दिवंगत ज्येष्ठ साहित्यिक जयवंत दळवी यांच्या जन्मशताब्दीनिमित्ताने विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. १६ सप्टेंबर रोजी सकाळी १०.०० वाजता पॅरेडाईज बँक्वेट अँड लॉन, देवीदास लेन, अदानी इलेक्ट्रिसिटीसमोर, बोरिवली (पश्चिम), येथे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून कोमसापचे संस्थापक-अध्यक्ष मधुमंगेश कर्णिक, विशेष उपस्थिती म्हणून कोमसापच्या केंद्रीय अध्यक्षा नमितावाई कीर, कार्याध्यक्ष प्रा. प्रदीप ढवळ, प्रमुख वक्ते म्हणून साहित्यिक, नाटककार अशोक समेळ उपस्थित राहणार आहेत. प्रमुख पाहुण्या म्हणून आमदार मनीषाताई चौधरी उपस्थित राहतील. विशेष निमंत्रित म्हणून जयवंत दळवी यांचे पुत्र गिरीश दळवी आणि कन्या शुभांगी दळवी-नेरूरकर उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाला साहित्य रसिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन कोमसाप मुंबई जिल्हा अध्यक्ष डॉ. मनोज वराडे आणि बोरिवली शाखा अध्यक्ष जगदीश भोवड यांनी केले आहे.

**महत्त्वपूर्ण निवेदन**

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीचा मजकूर स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी आपल्या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तीबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान व हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.ला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्याच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी वाचकांनी आवश्यकती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

## पाऊस पुन्हा मुसळधार! शेतकऱ्यांत चिंता; वसई- विरार शहराला धुतले

प्रतिनिधी
■ वसई

गेले काही दिवस वसईवर मुसळधार पावसाचे सावट होते. ती शक्यता खरी ठरवत रविवारी (दि.15) सकाळपासूनच पावसाने वसईत मुसळधार हजेरी लावली आहे. सकाळपासून वसईच्या ग्रामीण भागात मुसळधार हजेरी लावलेल्या पावसाने वसईच्या शहरी भागात काळोख केला होता. दुपारी 12:30 ते 1 वाजताच्या दरम्यान पावसाने वसईच्या शहरी भागात अर्धा तास मुसळधार हजेरी लावली. त्यामुळे सखल भागात पाणी साचले होते.

ग्रामीण भागात भातपिक बऱ्या पैकी तयार झाले असून मुसळधार पावसामुळे या पिकाला नुकसान पोहोचण्याचा धोका आहे. अती पावसामुळे भातपिकावर बगळ्या व करपा रोगाचा प्रादुर्भाव पसरण्याचा धोका आहे. सध्या पावसाने काही दिवस तरी विसावा घेणे आवश्यक आहे. पावसाने संततधार सुरू ठेवल्यास भातशेतीचे नुकसान होऊन शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांत चिंतेचे वातवरण पसरले आहे. वसईत हलवार, गरवार अशी पावसाळी पिके घेतली जातात. यातील हलवार या पिकाला जास्त पाऊस झाल्यास धोका आहे.



सकाळीच पावसाने मुसळधार हजेरी लावल्याने शेतकऱ्यांत चिंता आहेच. तसेच वाहतुकदेखील काही ठिकाणी संथ दिसून आली. वसईच्या ग्रामीण भागात पाऊस मुसळधार असून शहरी भागात रिपरिप तर कधी मुसळधार असा पडत असल्याने नागरिकांच्या कामांचा खोळंबा झाला आहे. पावसाने सध्या काही दिवस तरी विसावा घ्यावा, असे आर्जव शेतकरी करित आहे.दरम्यान, दुपारनंतर पावसाने काही काळ विश्रांती घेतली होती.

## गणेश विसर्जनासाठी भाविकांची कृत्रिम तलावांना पसंती

### तलावांच्या संवर्धनासाठी भाविकांचा हातभार



प्रतिनिधी
■ वसई

यंदा वसई -विरार शहर महानगरपालिकेने गणेश विर्जनासाठी कृत्रिम तलावांची निर्मिती करण्यात आली आहे. या तलावांना वसईकरांनी मोठ्या प्रमाणात प्रतिसाद दिल्याने गणेश विसर्जनासाठी यंदा शहरातील तलावांचे एकप्रकारे संवर्धन करण्याच्या कामात वसईतील भाविकांनी हातभार लावला आहे.

वसई -विरार शहर महानगरपालिकेने केंद्र शासनाच्या आदेशानुसार सार्वजनिक तलावांत गणेश मुर्त्यांच्या विसर्जनास बंदी घातली आहे. मात्र तरीही नागरिक पारंपरिक विसर्जनावर ठाम असल्याचे चित्र मागील वर्षी दिसून आले होते. यंदा मात्र वसई- विरार शहर महानगरपालिकेने 105 ठिकाणी व्यवस्था केलेल्या कृत्रिम तलावांना पसंती देत त्यात गणेश मुर्त्यांचे विसर्जन केले. वसईकरांनी पर्यावरणाच्या संवर्धनासाठी तसेच सार्वजनिक तलावांचेदेखील संवर्धन व्हावे या अनुषंगाने सार्वजनिक तलावांत बाप्पांचे विसर्जन करणे टाळले. त्यामुळे तलावांचे संवर्धन होण्याबरोबरच जलप्रदुषणही टाळण्यास वसईकरांनी हातभार लावल्याने वसईकरांच्या या कृतीचे कौतुक होत आहे.

वसई- विरार शहर महानगरपालिकेने चालू अर्थसंकल्पात सार्वजनिक तलावांच्या संवर्धनासाठी मोठ्या प्रमाणात तरतूद केली आहे. दरवर्षी गणेश विसर्जनासाठी याच तलावांचा वापर होत असल्याने तलावांचे प्रदुषण वाढले होते. याबाबत पालिकेने तलावांचे संवर्धन व्हावे यासाठी ठिकठिकाणी कृत्रिम तलावांची व्यवस्था केली आहे. या तलावांतच गणेश मुर्त्यांचे विसर्जन करण्यावर भाविकांनी भर दिल्याने वसईकरांनी सार्वजनिक तलावांच्या संवर्धनासाठी हातभार लावला आहे.

## जरीवाला सार्वजनिक गणेशोत्सव मित्र मंडळाच्या अमृत महोत्सवी वर्षात मान्यवरांची हजेरी



प्रतिनिधी
■ मुंबई

जरीवाला सार्वजनिक गणेशोत्सव मित्र मंडळाच्या गणरायाच्या अमृत महोत्सवी वर्षाच्या सोहळयात भाजपा मुंबई अध्यक्ष अँड.आशिष शेलार यांच्यासह भाजप पदाधिकाऱ्यांनी उपस्थित राहून दर्शन घेतले.

याप्रसंगी कामगार नेते,भाजप मुंबई सचिव जितेंद्र राऊत, माहीम विधानसभा अध्यक्षा अक्षता तेंडुलकर, महामंत्री सन्नी साठे, नितीन बेळणेकर, मयुर खेडेकर, मनोज शहा, विकास मंडलिक, संतोष सुकडे, दिप्ती मिठबावकर, ज्योती भोसले, सुप्रिया प्रभु, अध्यक्ष सम्राट हाटे, उपाध्यक्ष व अखिल भारतीय लॉटरी संघटनेचे अध्यक्ष अनुज बाजपेयी, आशिष मुणगेकर, महेन्द्र दिघे आणि सागर पवार सुधाचंद्र नायर व माहीम विधानसभा चे ईतर पदाधिकारी यांनी गणरायाचे मनोभावे दर्शन केले.

यंदाचे वर्ष ७५ असल्यामुळे अत्यंत सुंदर असा जयपुर पॅलेसचा देखावा उभारण्यात आला सर्व मुंबईहून गणेशभक्तांनी गणरायाचे दर्शन घेऊन मनोकामना पुर्ती ची प्रार्थना केली. जरीवाला सार्वजनिक गणेशोत्सव मित्र मंडळाच्या अमृत महोत्सवी वर्षात सामाजिक व राजकीय पक्षातील मान्यवरांची हजेरी लागत आहे.

## समाज माध्यमांवर सायबर सेलची नजर; चुकीच्या पोस्ट टाकणाऱ्यांवर होणार कारवाई

प्रतिनिधी
■ जव्हार

जव्हार उपविभागातील जव्हार, मोखाडा, वाडा, विक्रमगड व कासा पोलीस स्थानक हद्दीत सण-उत्सवाच्या काळात माध्यमांचा गैरवापर करणाऱ्यांवर, अफवा पसरवणाऱ्यांवर सायबर सेल लक्ष ठेवून असल्याचे जव्हार येथील उपविभागीय पोलीस अधिकारी गणपतराव पिंगळे यांनी सांगितले आहे.त्यामुळे कोणत्याही नागरिकांनी समाज माध्यमांवर चुकीच्या पोस्ट करू नये असे आवाहन पालघर पोलीस विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

दरम्यान, गणेशोत्सव आणि ईद-ए-मिलाद हे दोन्ही सण यावर्षी एकाच कालावधीत आले आहेत. जव्हार उपविभागात हे दोन्ही सण साजरे करताना सर्व धर्मीयांनी परस्पर सौहार्द व शांततेला गालबोट लागणार नाही याची काळजी घेऊन एकोप्याने व आनंदाने सण साजरे करावेत, जेणे करून सामजिक सलोखा अबाधित राहील.

उत्सवांचे या काळात सर्व धर्मीयांकडून विविध सांस्कृतिक कार्यक्रम, देखावे, वेगवेगळया प्रतिकृती, वेगवेगळया सणांच्या मिरवणुका सुरू आहेत. त्या संदर्भातील माहिती प्रसिद्ध करताना काळजी घ्यावी. सोशलमीडियाचा वापर काळजीपूर्वक करावा. सामाजिक जाणिवांचे भान ठेवावे. समाज माध्यमांचा गैरवापर करणाऱ्यांवर सक्त कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यामुळे समाज माध्यमांचा योग्य प्रकारे सर्वांनी वापर करावा. शिवाय, नागरिकांनी समाज माध्यमांवर येणाऱ्या कोणत्याही पोस्टबद्दल प्रतिक्रिया देताना शांततेने प्रतिक्रिया व्यक्त करावी.

पोलिसांची मदत घ्यावी. काही समाजकंटक अशा वेळी जुन्या पोस्ट टाकून लोकांची दिशाभूल करतात. अफवा पसरवितात, टीका करतात. त्यामुळे जनतेने सावध राहावे असे आवाहन पोलिस प्रशासनाकडून करण्यात आले आहे.



**पोलिसांना द्या माहिती**

*जव्हार उपविभागातील पोलीस स्थानक हद्दीतील शहर व गावांना सर्वधर्मीयांच्या सामंजस्याचा चांगला इतिहास आहे. त्यामुळे कोणतीही चुकीची पोस्ट समाज माध्यमांवर आल्यावर त्याबाबत जवळच्या पोलिस स्टेशनला माहिती द्यावी असे आवाहन गणपतराव पिंगळे, उपविभागीय पोलिस अधिकारी जव्हार यांनी केले आहे.*

## गोटमारीची जीवघेणी अघोरी प्रथा बंद करा

### महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीची मागणी

प्रतिनिधी
■ मुंबई

उत्तर प्रदेशातील पांढुर्णा-सावरगाव येथे रूढी परंपरेच्या नावावर एकमेकांवर दगडफेक करून ६००हून अधिक जणांना जखमी आणि ८ जणांना गंभीर जखमी करणारी ही कुठली परंपरा? असा संतप्त सवाल करत ही अघोरी प्रथा तातडीने बंद करावी अशी मागणी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने एका पत्रकाद्वारे केली आहे.

२ सप्टेंबरला 2024 रोजी जाम नदीच्या किनाऱ्यावर हा अघोरी कार्यक्रम पार पडला. पांढुर्णा आणि सावरगाव या गावातील नागरिकांनी नदीच्या दोन किनाऱ्यावर उभे राहून परंपरेच्या नावावरती एकमेकांवरती दगडफेक केली.

मध्य प्रदेशातील पांढुर्णा येथे परंपरेच्या नावावर ही अघोरी प्रथा ७६ वर्षांपासून चालू आहे. आज पर्यंत अनेक लोकांना अपंगत्व आले आहे तसेच अनेकांना आपले प्राण गमवावे लागले आहे. यामध्ये आतापर्यंत एकाच कुटुंबातील तीन व्यक्तींनी जीव गमावला आहे.१९९५ ते २०२३ या दरम्यान नोंद असलेल्या मृतांची संख्या १३ आहे. त्यापूर्वीच्या नोंद नसलेल्यांची संख्या ही अधिक असू शकते अशी भीती समितीने व्यक्त केली.ही जीवघेणी गोटमार प्रथा बंद होण्याच्या दृष्टीने पुढील वर्षभर स्थानिक प्रशासन, विविध सामाजिक संघटना व नागरिक यांच्याशी चर्चा करणार असल्याचा निर्धार समितीने व्यक्त केला आहे.



रूढी परंपरांच्या नावावर चालणारी ही घातक प्रथा तातडीने बंद करणे आवश्यक असताना आजूबाजूच्या सहा जिल्ह्यातील प्रशासकीय व्यवस्था या कामी जुंपली जाते आणि यामध्ये स्थानिक आमदारांसारखे लोकप्रतिनिधी सुद्धा सहभागी होतात हे अधिकच वेदनादायी असल्याचे मत महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्य कार्यकारिणी सदस्य रामभाऊ डोंगरे, नरेंद्र कांबळे, अॅड मुक्ता दाभोलकर, प्रा प्रवीण देशमुख, सम्राट हटकर, मिलिंद देशमुख यांनी व्यक्त केले .

मध्यप्रदेशमध्ये जादूटोणा आणि अघोरी प्रथा विरोधी कायदा नाही.महाराष्ट्र आणि कर्नाटकानंतर मागीलच महिन्यात गुजरात सरकारने सुद्धा हा कायदा पास केला. अनेक राज्यांमध्ये चालणाऱ्या अशा अघोरी प्रथांना पायबंद घालायचा असेल तर कठोर कायदा असणे ही काळाची गरज झाली आहे.याच पार्श्वभूमीवर महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने जादूटोणा आणि अघोरी प्रथा विरोधी कायदा हा राष्ट्रीय पातळीवरती व्हावा याची मागणी केली आहे. अशा प्रथा प्रबोधनाच्या मार्गाने बंद करतानाच कायद्याचे पाठबळ मिळाले तर अधिक सक्षमपणे याघोरी प्रथांना आळा घालता येईल. असे अंनिस चे राज्य कार्यकारिणी सदस्य प्रा प्रविण देशमुख यांनी म्हटले आहे.

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मलनि:सारण प्रयोगशाळेला 'एनएबीएल' कडून मानांकन

प्रतिनिधी
■ मुंबई

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मलनिःसारण प्रयोगशाळेला राष्ट्रीय परीक्षण आणि अंश परीक्षण प्रयोगशाळा अधिस्विकृती मंडळ अर्थात एनएबीएल यांचेकडून शुक्रवारी मानांकन प्राप्त झाले आहे. मलनिःसारण प्रयोगशाळेला मानांकन मिळणे म्हणजे मुंबई महानगराच्या पर्यावरण संवर्धनाच्या अनुषंगाने टाकलेले आणखी एक पाऊल आहे.

पालिकेची मलनिःसारण विभागाची प्रयोगशाळा ही १९३५ पासून कार्यरत आहे. प्रयोगशाळेसाठी आवश्यक तांत्रिक तसेच पायाभूत सुविधांचा विकास याठिकाणी करण्यात आला आहे. तसेच प्रयोगशाळेत काम करणाऱयांना कर्मचाऱयांना अद्ययावत पद्धतीचे प्रशिक्षणही देण्यात आले आहे. मुंबईत पर्यावरणीय समतोल राखण्याच्या दृष्टीने करण्यात येणाऱ्या अनेक प्रयत्नांपैकी मलनिःसारण प्रयोगशाळेचे अद्ययावतीकरण करण्याच्या सूचना पालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी यांनी दिल्या होत्या. त्याचाच एक भाग म्हणून सुविधा अद्ययावत करून या प्रयोगशाळेला मानांकन मिळण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात आले. मुंबईत मलनिःसारण व्यवस्थेमध्ये अधिकाधिक गुणवत्तापूर्ण सुधारणा व्हाव्यात यादृष्टीने होत असलेल्या प्रयत्नांना मिळालेल्या यशापैकी एक म्हणजे एनएबीएल मानांकन ठरले आहे.

पालिकेला हे मानांकन प्राप्त झाल्याबद्दल प्रतिक्रिया देताना अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) डॉ. अश्विनी जोशी यांनी, एनएबीएल मानांकन प्राप्त झाल्यामुळे आता पालिकेच्या मलनिःसारण प्रयोगशाळेचा अहवाल हा फक्त भारतातच नव्हे तर जागतिक पातळीवर विश्वासार्ह ठरणार आहे. कारण मलनिःसारण प्रकल्पातून पुनर्प्रक्रिया केलेल्या पाण्याचा चाचणी अहवाल हा या मानांकनाची मोहोर उमटवलेला असेल. एवढेच नव्हे तर मलनिःसारण प्रक्रिया केलेल्या पाण्याची तपासणी पालिकेच्या प्रयोगशाळेत अधिकाधिक संख्येने होवून पर्यायाने महसूल वाढीसाठी देखील फायदा होणार आहे, असे नमूद केले.

बृहन्मुंबईतील मलनिःसारण व्यवस्थेची विभागणी ही कुलाबा, वांद्रे, वरळी, मालाड, भांडुप, घाटकोपर अशी करण्यात आली आहे. मलनिःसारण प्रक्रिया प्रकल्पाच्या ठिकाणी प्रक्रिया करण्यात आलेले पाणी हे समुद्रात सोडण्याआधी या प्रकल्पाच्या ठिकाणी शुद्ध केले जाते.

## शताब्दीकडे जाणाऱ्या केइएममधील अनधिकृत बांधकामे हटवा

### कामगार नेते रमेश जाधव यांचे आयुक्तांना पत्र

प्रतिनिधी
■ मुंबई

के. ई. एम. रुग्णालय इमारतीस येत्या दोन वर्षात १०० वर्षे पूर्ण होत आहेत. या धर्तीवर या हेरिटेज वास्तूचे योग्य ते जतन तसेच त्यातील अनधिकृत बांधकामे नष्ट करण्यात यावीत अशी मागणी.कामगार नेते रमेश जाधव यांनी केली पालिका आयुक्त भूषण गगराणी यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.

के ई एम ची हेरिटेज असलेल्या इमारतीत संबंधित अधिकाऱ्यामार्फत कोणताही प्लॅनिंग न बनवता निर्माण केलेले अनाधिकृत बांधकामे संपूर्ण नष्ट करून किंवा काढून टाकून मूळ हेरिटेज इमारतीची आकृतीत असलेली वास्तू अस्तित्वात आणून खऱ्या अर्थाने आपल्या मार्फत १०० वर्ष थाटामाटात साजरा करणे गरजेचे आहे. एका बाजूला दोन मोठया नवीन इमारती आहेत. अत्यावश्यक सेवा आणि ओपीडी या दोन्ही नवीन इमारतीत सुरू करण्याचं नियोजन होणे गरजेचे आहे.

रुग्णालयाच्या मुख्य प्रवेशद्वारा जवळ असलेली वास्तू ही पूर्णपणे अनधिकृत केलेल्या बांधकामाच्या विळख्यातून मुक्त करणे गरजेचे आहे. एवढी सुंदर वास्तू आज मुंबईमध्ये असताना स्वतःच्या हातून तिची अत्यंत दूरवस्था केल्याचे दिसते. ह्या रुग्णालयाला चारी बाजूने प्रशस्त गेट असतानाही फक्त मुख्य प्रवेशद्वारातुंच सर्व रुग्ण, नागरिक किंवा कामगार कर्मचारी यांची ये जा सुरू असते त्यामुळे तेथील सुरक्षा रक्षकांवर मोठ्या प्रमाणात ताण पडताना दिसतो सर्वच गेटचा वापर केला आणि मुख्य गेट फक्त रुग्णांना आणि येणाऱ्या नागरिकांसाठी वापरता आला तर एक प्रशस्त जागा मोकळी होईल. असेही रमेश जाधव यांनी पत्रात.म्हटले आहे.जाधव यांनी या पत्राच्या प्रती अतिरिक्त आयुक्त, आरोग्य विभाग, आणि उपायुक्त, आरोग्य विभाग, यांनाही दिल्या आहेत.

## जवाहरनगरच्या राजाचे आशीर्वाद घेण्यासाठी भक्तांची अलोट गर्दी

प्रतिनिधी
■ मुंबई

गोरेगाव पश्चिम येथील जवाहर नगर येथे गेल्या 62 वर्षापासून गणेशोत्सव साजरा केला जात आहे. नवसाला पावणारा जवाहरनगरचा राजा अशी गणेश भक्तांमध्ये श्रद्धा असल्यामुळे दरवर्षीप्रमाणे यंदाही अलोट गर्दी उसळत आहे. गोरेगावसह उपनगरातील सर्वच राजकीय पक्षाचे पदाधिकारी, संघटनाचे पदाधिकारी, गणेशभक्त मोठ्या प्रमाणात आशीर्वाद घेण्यासाठी येत आहेत. सदर मंडळातर्फे गेल्या अनेक वर्षापासून राजवाडा, शिर्डीचा दरबार याबरोबरच सामाजिक देखावे उभारण्यात येत आहेत. यावर्षी मंडळाने पाण्यावरील विश्व उभारले आहे.

अनंत चतुर्थीच्या दिवसापासून मुंबईसह संपूर्ण भारतामध्ये मोठ्या थाटामाटात गणेशभक्त गणेशोत्सव साजरा करीत आहेत. श्री गणरायाची मनोभावे पूजा केली तर पावतोच. गोरेगाव पश्चिम येथील 265, जवाहर नगर रोड नंबर 11/12, मंगलमूर्ती चौक येथे स्व. नरेश शेटे यांनी 62 वर्षांपूर्वी जवाहरनगर राजाचा गणेशोत्सव साजरा करण्याचे ठरवले. त्यानुसार आजपर्यंत सर्व पदाधिकारी, सभासद, कार्यकर्ते आपल्या राजाची 10 ते 11 दिवस भक्तीभावाने सेवा करीत असतात. दरम्यान, नवसाला पावणाऱ्या अशी ख्याती असलेल्या या राजाचे दर्शन व आशीर्वाद घेण्यासाठी राजकीय नेते, उद्योगपती, सामाजिक कार्यकर्ते व गणेशभक्त मोठ्या संख्येने येत असतात. दरवर्षी गणेशभक्तांमध्ये लाडक्या राजाला पाहण्यासाठी मोठ्या प्रमाणात वाढत होत आहे.



जवाहर नगर राजा मित्र मंडळ तर्फे अनेक सामाजिक उपक्रम राबवले जातात. काल श्री सत्यनारायणाची महापूजेचे आयोजन करण्यात आले होते. दरम्यान, रोज संध्याकाळी जवाहरनगरची राजाची आरती करण्यासाठी गरीब - श्रीमंत असा भेदभाव केला जात नाही. सर्व गणेशभक्तांना आपल्या राजाची आरती करण्याचा मान दिला जातो. जवाहर नगरच्या राजाची मिरवणुकही मोठ्या थाटामाटात, जल्लोषात काढली जाते.

## 'सर्वोदयनगरचा राजा'च्या उत्सवात जल्लोषी वातावरण



■ मुंबई

पश्चिम उपनगरात ख्याती असलेल्या जोगेश्वरी-पूर्वेकडील सर्वोदयनगरच्या राजाचा यंदाचा उत्सव अत्यंत जल्लोषी आणि उत्साही वातावरणात साजरा होत आहे. मंडळाचे यंदाचे ४१ वे वर्ष असून शाळकरी मुलांच्या विविध स्पर्धा तसेच इतर उपक्रम राबवले गेले आहेत. मंगळवारी 'अनंत चतुर्दशी'च्या दिवशी पारंपरिक पद्धतीने पालखीसह विसर्जन सोहळा साजरा होणार आहे.

'जोगेश्वरीतील पहिली मानाची पालखी' म्हणून मंडळाची ख्याती आहे. सर्वोदयनगर-एमएचबी कॉलनी येथील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळामार्फत मागील ४१ वर्षांपासून येथील गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा होत आहे. यंदा प्रसिद्ध मूर्तिकार बाबल बंधू यांनी मंडळाच्या गणरायाची देखणी मूर्ती साकारली असून बाप्पाच्या दर्शनासाठी जोगेश्वरीसह परिसरातील गणेशभक्त गर्दी करीत आहेत. केवळ गणेशोत्सव काळात नव्हे तर मंडळामार्फत पुढील वर्षभरात विविध समाजोपयोगी उपक्रम राबवले जातात. सामाजिक बांधिलकी जपत मंडळाचे तरुण पदाधिकारी-कार्यकर्ते विविध उपक्रमांमध्ये उत्स्फूर्तपणे सहभागी होतात. मागील १७ वर्षांपासून लाडक्या गणरायाची पालखीतून पारंपरिक विसर्जन मिरवणूक काढली जात आहे. गणरायाचा हा देखणा विसर्जन सोहळा पाहण्यासाठी परिसरातील गणेशभक्त मोठी गर्दी करतात.

Printed and Published by **Bhushan B.Mhatre** for Owner **Marik Media And Communication Pvt .Ltd.** at S.R.Publicatiinns ,Mohan Arjun Compound ,Godown No. 8,9 And 10 , Near Ghartan Pada ,Vaishali Nagar ,Last Bus Stop ,Dahisar (E ) ,Mumbai -400068 and Published From Marik Media And Communication Pvt .Ltd.,102, Shyam Sunder Sadan ,Sitaram Jadhav Marg, Lower Parel ,Mumbai 400013. Editor - **Deepak B. Mhatre**, E-mail vruttmanas1@ gmail.com ,telephone 2498546,24985609. Resident Editor - **Sham Deulkar**

**As per PRB Act Editorial Responsibilities On Deepak B. Mhatre Nespaper Related Desputes Lies Under Jurisdiction of Mumbai Courts**

**Year - Twenty Nine**
**Issu - 87**
**R.N.I. Registration No. - 65609/96**

मुद्रक आणि प्रकाशक **भूषण भा. म्हात्रे** यांनी मालक **मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.** साठी, एस. आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडाऊन नं. ८,९ आणि १०, घारटन पाडाजवळ, वैशालीनगर लास्ट बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई - ४०० ०६८ येथे छापून मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि., १०२, श्याम सुंदर सदन, सीताराम जाधव मार्ग, लोअर परळ (पश्चिम), मुंबई - ४०० ०१३ येथून प्रकाशित केले. संपादक - **दीपक भा. म्हात्रे,** E-mail: vrittamanas1@gmail.com दूरध्वनी क्रमांक - २४९८५४६, २४९८५६०९ निवासी संपादक - **शाम देऊलकर**

**पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी दीपक भा. म्हात्रे यांच्यावर राहील. सदर वृत्तपत्रासंबंधीच्या विवादित बाबी मुंबई न्यायालय क्षेत्रात येतील.**

**वर्ष- एकोणतीसावे**
**अंक - ८७**
**आर.एन.आय. रजिस्ट्रेशन क्र.- ६५६०९/९६**

## लिटल फ्लॉवर इंग्लिश स्कूल आणि ज्युनिअर कॉलेजमध्ये हिंदी दिन

**मुंबई :** घाटकोपर पश्चिम येथील लिटल फ्लॉवर इंग्लिश स्कूलमध्ये प्राचार्य जेनेथ डिसोझा यांच्या अध्यक्षतेखाली हिंदी दिन साजरा करण्यात आला, यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सामाजिक कार्यकर्ते शिक्षणतज्ज्ञ चंद्रवीर बंशीधर यादव आणि लक्ष्मी अरुणकुमार यादव उपस्थित होते. दीपप्रज्वलन करून समारंभाची सुरुवात करण्यात आली, त्यानंतर संस्थेत कार्यरत असलेल्या हिंदी शिक्षिका दिवंगत मंजू सिंह यांना त्यांच्या प्रथम पुण्यतिथी निमित्त आदरांजली वाहण्यात आली कार्यक्रमाच्या शेवटी हिंदी विभागाचे प्रमुख ओमप्रकाश यादव सर्वांचे आभार मानले.



## थोडक्यात

### ईद-ए-मिलाद ची सार्वजनिक सुट्टी 16 ऐवजी 18 सप्टेंबर रोजी

**मुंबई:** राज्य शासनाने अधिसूचित केलेल्या २४ सार्वजनिक सुट्ट्यांमध्ये ईद-ए-मिलाद या सणाची सुट्टी सोमवार, दि.१६ सप्टेंबर, २०२४ रोजी दर्शविण्यात आले आहे. ईद-ए-मिलाद हा मुस्लिम धर्मियांचा सण मुस्लिम बांधव मोठ्या प्रमाणात साजरा करत असतात. यावेळी जुलूस कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. मंगळवार १७ सप्टेंबर, २०२४ रोजी अनंत चतुर्दशी हा हिंदूचा सण असल्याने दोन्ही समाजामध्ये शांतता व सामाजिक सलोखा कायम राहण्याच्या हेतूने यावर्षी मुंबई शहर, मुंबई उपनगर व इतर काही जिल्ह्यांमध्ये मुस्लिम धर्मियांनी बुधवार, १८ सप्टेंबर, २०२४ रोजी जुलूस काढण्याचा निर्णय घेतला आहे. सबब, मुंबई शहर व मुंबई उपनगर या जिल्ह्यात सोमवार, दि.१६ सप्टेंबर, २०२४ करिता घोषित केलेली ईद-ए-मिलाद ची सार्वजनिक सुट्टी रद्द करून ती आता बुधवार, १८ सप्टेंबर, २०२४ या दिवशी जाहीर करण्यात आली असल्याची अधिसूचना निर्गमित करण्यात आली आहे.

### रिलाय ऑन विरकॉन एमपॉक्स विषाणूविरुद्ध प्रभावी

**मुंबई:** लँक्सेस या स्पेशलिटी केमिकल्स कंपनीचे रिलाय+ ऑन विरकॉन हे जंतुनाशक यापूर्वी "मंकीपॉक्स विषाणू" म्हणून ओळखल्या जाणाऱ्या एमपॉक्सवर प्रभावी ठरले आहे. हे स्वतंत्र चाचण्यातून सिद्ध झाले असून त्यातून उत्पादनाच्या विषाणूविरोधातील प्रभाव सिद्ध झाला आहे. मध्य आणि पूर्व आफ्रिकेतील वाढत्या एमपॉक्स संसर्गाच्या दृष्टीकोनातून जागतिक आरोग्य संघटनेने (डब्ल्यूएचओ) आंतरराष्ट्रीय आरोग्य आणीबाणी जारी केली आहे. "संसर्गाचा वेग वाढत असताना परावजीवीचा नायनाट करण्यासाठी प्रभावी निर्जंतुकीकरण करणाऱ्या उत्पादनाची गरज वाढू लागली आहे," असे मत लँक्सेसमध्ये हायजीन आणि केअर या बाजार विभागाचे प्रमुख रॉय वान वेल यांनी व्यक्त केले. रिलाय+ ऑन विरकॉनचा वापर रूग्णालये, आरोग्यसेवा सुविधा, विमानतळ, सार्वजनिक वाहतूक व्यवस्था, वाहतूक टर्मिनल्स, क्लिनिक्स, शॉपिंग मॉल्स आणि इतर अनेक सार्वजनिक ठिकाणी केला जातो. रिलाय+ ऑन विरकॉन हे परावजीवींवर अत्यंत प्रभावी ठरले असून ते धोकादायक ठिकाणी प्रतिबंधाला मदत करते.

### विनोबा भावेंची जयंती साजरी

**मुंबई:** मुंबई सर्वोदय मंडळाच्या वतीने नुकतीच विनोबा भावे यांची जयंती साजरी करण्यात आली. या वेळी प्रा. डॉ. रमिला गायकवाड यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना संबोधित केले. रमिला यांनी दक्षिण कोकण विभागातील भूदान चळवळीबाबत माहिती दिली. तसेच, आपल्या व्याख्यानात त्यांनी विनोबाजींच्या विद्यार्थी जीवनावर प्रकाश टाकला. विद्यार्थ्यांनी एकाग्रतेने अभ्यास केला पाहिजे, असे सांगितले. पुस्तकांशी मैत्री करण्याचे आवाहन त्यांनी केले. बजरंग सोनवणे, सूरज भोईर यांनी सादर केलेल्या विनोबाजींच्या नाम माला गीताने सभेला सुरुवात झाली. नफिसा कोलंबोवाला यांनी सूत्रसंचालन केले.

# उपवर्गीकरणामागे हिंदू दलित व्होट बँक गठित करण्याचे राजकारण!

## डॉ. सुरेश माने यांचा भाजपवर आरोप

प्रतिनिधी
■ मुंबई

लोकसभा निवडणुकीत समस्त नागरिकांना मूलभूत आणि मानवी हक्क - अधिकारांची हमी देणाऱ्या संविधानाच्या अस्तित्वाचा मुद्दा केंद्रस्थानी आला होता. त्याने भाजपला ३०३ जागांवरून २४० जागांवर खाली आणले, असे सांगतानाच अनुसूचित जाती, जमातींचे उप वर्गीकरण करण्यामागे नवी हिंदू दलित व्होट बँक गठित करण्याचे भाजपचे राजकारण आहे, असा आरोप संविधान तज्ज्ञ आणि बहुजन रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टीचे अध्यक्ष ॲड. डॉ.सुरेश माने यांनी केला. ते शनिवारी मुंबईत उपवर्गीकरण या विषयावर दलित विचारवंत, कायदेतज्ज्ञ, माजी सनदी अधिकारी, साहित्यिक, पत्रकार आणि सामाजिक कार्यकर्त्यांच्या एका परिषदेत बोलत होते.

अंधेरी (पश्चिम) चार बंगला येथील कर्मवीर दादासाहेब गायकवाड सांस्कृतिक केंद्रातर्फे अध्यक्ष विजय जाधव आणि सरचिटणीस चंद्रकांत बच्छाव यांनी डॉ. आंबेडकर जन्म शताब्दी भवनात ही परिषद आयोजित केली होती. तब्बल सहा तास चाललेल्या या परिषदेत माजी खासदार डॉ. भालचंद्र मुणगेकर,



साहित्यिक अर्जुन डांगळे, माजी आयपीएस सुधाकर सुराडकर, माजी न्यायाधीश डॉ. डी. के.सोनावणे, ॲड. जयमंगल धनराज, प्रा.डॉ. एम. के. डेकाटे, प्रा. डॉ. जयराम चव्हाण, चर्मकार नेते अच्युत भोईटे, ज्येष्ठ पत्रकार मधू कांबळे, दिवाकर शेजवळ, चंद्रकांत सोनावणे, प्रशांत रूपवते, ॲड. किशोर कांबळे आदी मान्यवरांनी आपले विचार मांडले.

डॉ. सुरेश माने आपल्या भाषणात पुढे म्हणाले की, देशात अनुसूचित जातींची संख्या ११०८ इतकी असून अनुसूचित जमातींची संख्या ६२८ आहे. त्यातून उपवर्गीकरणाची मागणी करणाऱ्या एससी जातींची संख्या १० सुद्धा नाही. तर, एसटीमधील कुठल्याही जातीने तशी मागणी केलेली नाही. असे असतानाही केंद्र सरकारला त्या जाती - जमातींना अलग अलग करण्याची गरज का भासली आहे?

एससी आणि एसटी यांच्या उप वर्गीकरणापूर्वी केंद्र सरकारने रोहिणी आयोगाच्या माध्यमातून ओबीसींचेही चार तुकडे करण्याची खेळी केली आहे, याकडे त्यांनी लक्ष वेधले. दलित, आदिवासी आणि ओबीसी यांच्यावर अधिसत्ता गाजवण्यासाठीच भाजप सरकारने 'फोडा आणि झोडा' या नीतीचा अवलंब केला आहे, असे प्रतिपादन डॉ. माने यांनी केले.

भाजपचे हे फूट पाडण्याचे आणि व्होट बँक गठित करण्याचे राजकारण रस्त्यावर उतरून हाणून पाडता येणार नाही, असे सांगून ते म्हणाले की, उपवर्गीकरणाचे धोके उत्तर भारतातील अनुसूचित जाती, जमातींनी पुरेपूर ओळखले आहेत, हे त्यांनी 'भारत बंद'च्यावेळी दाखवून दिले. मात्र महाराष्ट्रात अनुसूचित जाती, जमातींमध्ये या प्रश्नावर जागृती करण्याची गरज आहे.

महाराष्ट्रातील चर्मकार, मातंग या अनुसूचित जाती उपवर्गीकरणाचे समर्थन, स्वागत करत असल्या तरी त्यांच्यासाठी तो आत्मघात आहे, असे प्रतिपादन चर्मकार नेते अच्युत भोईटे यांनी या परिषदेत बोलताना केले. महाराष्ट्र विधानसभेत २०११ च्या जनगणनेनुसार अनुसूचित जातीसाठी २९ जागा राखीव आहेत, असे सांगून ते म्हणाले की, २९ पैकी चर्मकार समाजाचे सध्या ११ आमदार आहेत.

लोकसंख्येच्या १.३ टक्क्याप्रमाणे उप वर्गीकरण झाल्यास त्यांच्या आमदारांची संख्या ३ पर्यंत घसरेल. मातंग समाजाचे सध्या चार आमदार आहेतच. उप वर्गीकरणात लोकसंख्येच्या २.३४ टक्क्याप्रमाणे त्यांचे पाच आमदार होतील. म्हणजे एक मातंग आमदार वाढेल. उर्वरित ५६ जातींचे सध्या सहा आमदार आहेत. त्यात बुरड: २, बलाई :१, खाटीक : १ , वाल्मिकी १, कैकाडी : १ आहे. लोकसंख्येच्या १.५६ टक्क्याप्रमाणे उप वर्गीकरण झाल्यावर त्यांच्या आमदारांची संख्या तीन इतकी होईल.

राज्यात उपवर्गीकरणविरोधी लढ्यात बौद्ध सर्वात आधी मैदानात उतरल्यामुळे त्या समाजाला उपवर्गीकरण मारक असावे, असा इतर अनुसूचित जातींचा समज होवू शकतो. पण प्रत्यक्षात मात्र बौद्ध समाज हा उप वर्गीकरणाअभावी सध्या तोट्यात आहे, याकडे भोईटे यांनी सर्वांचे लक्ष वेधले.

पूर्वाश्रमीच्या महार म्हणजे बौद्ध समाजाचे सध्या फक्त ८ आमदार आहेत. लोकसंख्येच्या ७.८ टक्क्याप्रमाणे त्या समाजाचा १७ आमदारांचा सर्वात मोठा वाटा उप वर्गीकरणानंतर निश्चित होईल, असे भोईटे यांनी यावेळी सांगितले.

### *आरक्षण तिसऱ्या पिढीला नको - डॉ. मुणगेकर*

*मुळात अनुसूचित जातींना क्रीमी लेअर लागू करण्याची तरतूद राज्यघटनेत नाहीच. पण उपवर्गीकरणाच्या निकालानंतर आरक्षणाचा लाभ फक्त एकाच पिढीला देण्याची चर्चा सुरू झाली आहे. त्याचा उल्लेख करून माजी खासदार डॉ. भालचंद्र मुणगेकर म्हणाले की, आरक्षणाचा लाभ तिसऱ्या पिढीला न देण्याचा विचार करायला हरकत नाही. पण शिरकावासाठी पहिल्या पिढीला आणि स्थैर्यासाठी दुसऱ्या पिढीला आरक्षण आरक्षण राहिले पाहिजे, असे प्रतिपादन त्यांनी केले.*



# यंदा छत्रपती शिवाजी पार्कवरील 'दसरा मेळावा' आचारसंहितेच्या विळख्यात

प्रतिनिधी
■ मुंबई

गणेशोत्सवाचे अजून ३ दिवस शिल्लक आहेत. त्यानंतर पुढच्या महिन्यात २ ऑक्टोबर रोजी महात्मा गांधी जयंती साजरी झाल्यानंतर दुसऱ्याच दिवशी घटस्थापना होणार आहे. व ९ दिवसानंतर १२ ऑक्टोबर रोजी सोने लुटण्याचा दिवस म्हणजे.दसरा आहे. म्हणजे जवळपास १ महिना शिल्लक असताना नेहमी प्रमाणे दसरा मेळावा घेण्यासाठी छत्रपती शिवाजी पार्क कोणत्या शिवसेना गटाला मिळणार याची चर्चा सुरू झाली आहे. दसरा झाल्यानंतर नोव्हेंबर मध्ये दिवाळीनंतर विधानसभा निवडणूक होईल असे सूतोवाच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले आहे. त्यामुळे निवडणुकीची आचारसंहिता लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे मेळावा होईल की नाही याबाबत शंका व्यक्त केली जात आहे. मेळावा घेतल्यास झालेला खर्च निवडणूक खर्चातून वजा केला जाईल.

त्यानंतर मुंबई महानगरपालिकेसह राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार आहेत. त्यामुळे शिवाजी पार्क वरील सभेला विशेष महत्त्व आले आहे. पण निवडणुकीची आचारसंहिता आड येणार आहे.

पालिकेचा ज्यांचा पहिला अर्ज येईल त्यांना दसरा मेळाव्यासाठी शिवाजी पार्क देण्यात येते. असा नियम आहे. यावेळी उध्दव ठाकरे गटाने दोन महिन्यांपूर्वीच मुंबई महानगरपालिकेच्या स्थानिक जी उत्तर विभागीय कार्यालयात अर्ज सादर करण्यात आल्याचे शिवसेना (उबाठा) पक्षाचे विभागप्रमुख महेश सावंत यांनी सांगितले. त्यामुळे उध्दव ठाकरे यांच्या शिवसेनेलाच यंदा छत्रपती शिवाजी पार्क मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे. शिवाजी पार्क साठी अन्य कुणाचा अर्ज आला नसल्याचेही समजते. नेमकी त्याचा वेळी आचारसंहिता असणार आहे. याची कल्पना असल्यानेच शिंदे गटाने शिवाजी पार्क साठी अर्ज केला नसेल असे बोलले जातेय.

शिवाजी पार्क वर्षातून केवळ ४५ दिवस राजकीय व सांस्कृतिक कार्यक्रमासाठी देता येते. यातील ९ दिवस मैदान कोणाला द्यायचे हे राज्य सरकारच्या नगर विकास विभागाकडून ठरवण्यात येते. तशी रितसर परवानगी नगर विकास विभागाकडून घ्यावी लागते. उदाहरणार्थ २६ जानेवारी १५ ऑगस्ट रोजी होणाऱ्या शासकीय कार्यक्रमाला नगर विकास विभाग परवानगी देते. २०१६ मध्ये राज्य सरकारने शिवाजी पार्क मैदान दसरा मेळाव्यासाठी देण्याचा निर्णय घेतला होता. मात्र दसरा मेळाव्याला मैदान कोणाला द्यायचे याची जबाबदारी मुंबई महापालिकेवर सोपवली आहे.

वार्षिक ४५ दिवसांपैकी ९ दिवस शिवाजी पार्क कोणाला द्यायचे याचा अधिकार राज्य सरकारचा असला तरी, उरलेले ३६ दिवस मैदान कोणाला द्यायचे, याचा निर्णय घेण्याचा अधिकार मुंबई महापालिकेला आहे. दसरा मेळाव्यासाठी कोणताही राजकीय पक्ष अथवा संस्था अर्ज करू शकते. मात्र पालिकेच्या निकषानुसार मैदानासाठी जी संस्था अथवा राजकीय पक्ष प्रथम अर्ज करते, त्याला प्रथम प्राधान्य देण्यात येते.

# धनगर समाजाच्या अनुसूचित जमातीत समावेशासाठी सकारात्मक प्रयत्न - मुख्यमंत्री शिंदे

## सकल धनगर जमात समन्वय समितीच्या शिष्टमंडळाशी चर्चा

प्रतिनिधी
■ मुंबई

धनगर समाजाचा अनुसूचित जमाती प्रवर्गात समावेश करण्यासाठी सकारात्मक पावले उचलली जातील. हा समावेश कायद्याच्या चौकटीत टिकणारा आणि अन्य कुठल्याही समाजावर अन्याय करणारा नसेल असे प्रयत्न केले जातील, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे सांगितले.धनगर समाजाच्या अनुसूचित जमातीत समावेश करण्याच्या मागणीसाठी सुरू असलेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर सकल धनगर जमात समन्वय समितीच्या शिष्टमंडळाची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे बैठक झाली. यावेळी मुख्यमंत्र्यांनी उपोषणकर्त्या आंदोलकांशी दूरध्वनीवरुन संपर्क साधला व त्यांची विचारपूस देखील केली.

बैठकीस राज्य उत्पादन शुल्क मंत्री शंभूराज देसाई, गृह विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव डॉ आय. एस. चहल, आदिवासी विकास विभागाचे प्रधान सचिव विजय वाघमारे, सामाजिक न्याय विभागाचे सचिव गणेश पाटील उपस्थित होते. इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, प्रधान सचिव विनिता वेद-सिंघल दूरदृश्य संवाद प्रणालीच्या माध्यमातून उपस्थित होते.मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, धनगर समाजाची अनुसूचित जमातीच्या समावेशाची मागणी खूप वर्षे प्रलंबित आहे.

हा समावेश व्हावा यासाठी कायद्याच्या विहित पद्धतीचा अवलंब करावा लागेल. त्यासाठी सचिव स्तरावर तातडीने पाठपुरावा करण्यासाठी प्रयत्न केले जातील. यात राज्याचे महाधिवक्ता, विधी व न्याय विभाग यांचा सल्ला घेतला जाईल.

आदिवासी विकास विभागासह संबंधित अन्य विभागांचे सचिव तसेच समन्वय समितीच्या सदस्यांचा सक्रिय सहभाग घेऊन अन्य मागण्यांबाबत तातडीने कार्यवाही व्हावी, असे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी दिले.

# लैंगिक छळ प्रकरणाच्या चौकशीत 'नायर'च्या अधिष्ठात्याचा खोडा

## रईस शेख यांनी मुख्यमंत्र्यांकडे कारवाईची केली मागणी

प्रतिनिधी
■ मुंबई

प्रशिक्षिणार्थी महिला डॉक्टरने सहयोगी प्राध्यापकांविरोधात केलेल्या लैंगीक छळाच्या तक्रार प्रकरणात मुंबई महापालिकेच्या बा. य. ल. नायर रुग्णालयाचे अधिष्ठाता यांनी आरोपीला वाचवण्याचा प्रयत्न केला असून 'कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ प्रतिबंधक आणि निवारण कायदा २०१३'च्या अंमलबजावणीत अडथळा आणला, असा गंभीर आरोप चौकशी समितीने ठेवला असून या प्रकरणी अधिष्ठाता यांच्यावर कठोर कारवाई करावी, अशी मागणी समाजवादी पक्षाचे 'भिवंडी पूर्व'चे आमदार रईस शेख मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली आहे.

यासंदर्भात आमदार रईस शेख यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्र पाठवले आहे. याप्रकरणी माहिती देताना आमदार रईस शेख म्हणाले की, वैद्यकीय महाविद्यालयातील विद्यार्थिनींच्या सुरक्षेसाठी नायर रुग्णालयाच्या अधिष्ठाता यांच्यावर त्वरित कठोर कारवाई होणे अत्यंत आवश्यक आहे. तसेच महिलांच्या सुरक्षेसाठी राज्य सरकार कटिबद्ध असल्याचा संदेश राज्यभर देणे आवश्यक आहे.

महिलांवरील लैंगीक अत्याचार प्रतिबंधक समितीच्या अहवालानुसार, 'एमबीबीएस'च्या विद्यार्थिनीने दाखल केलेल्या लैंगिक छळाच्या तक्रारीत नायर रुग्णालयातील औषध विज्ञान विभागातील सहयोगी प्राध्यापक पूर्णपणे दोषी आढळले आहेत. या प्राध्यापकावर गैरवर्तन आणि विद्यार्थिनीला अयोग्यरित्या स्पर्श केल्याचा स्पष्ट होते. या प्रकरणात नायर रुग्णालयाच्या अधिष्ठाता यांची भूमिका दुर्दैवी आणि असंवेदनशील आहे. अधिष्ठाता यांनी कायद्याच्या अंमलबजावणीत अडथळे आणले. चौकशीच्या कामकाजात सहकार्य केले नाही. वरिष्ठांनी दिलेल्या आदेशांची अंमलबजावणी करण्यास विलंब केला,असे समितीच्या अहवालात नमूद करण्यात आले आहे.

आमदार रईस शेख यांनी या प्रकरणातील अधिष्ठाताच्या भूमिकेचा निषेध केला असून महिलांच्या संरक्षणासाठी सरकारची बांधिलकी असल्याचे दर्शवणारे ठोस उदाहरण देण्यासाठी नायर रुग्णालयाच्या अधिष्ठाता यांच्यावर कठोर कारवाई करावी, अशी पत्रात मागणी केली आहे.

अधिष्ठाता यांच्या गैरकृतींमुळे तक्रारदारांऐवजी विभागातील वरिष्ठ अधिकारी असलेल्या आरोपींना पाठिंबा देत असल्याचा जनमानसाचा समज वाढण्यास हातभार लागला आहे. मुहिला सुरक्षिततेची खात्री देण्यासाठी तसेच सरकार महिलांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याचे स्पष्ट करण्यासाठी या प्रकरणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे तातडीने आणि निर्णायक कारवाई करतील, अशी अपेक्षा आमदार शेख यांनी पत्रात व्यक्त केली आहे. लैंगीक छळ प्रकरण यावर्षीच्या जून महिन्यातले असून ऑगस्टमध्ये या प्रकरणाची चौकशी झाली.

# राज्यघटनेबाबत जागृतीसाठी संविधान मंदिर प्रेरणादायी - उपराष्ट्रपती

## ४३४ औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये 'संविधान मंदिरांचे' लोकार्पण

प्रतिनिधी
■ मुंबई

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार असून भारतीय राज्यघटना ही सर्वार्थाने वैशिष्ट्यपूर्ण आहे. भारतीय राज्यघटनेबाबत नवीन पिढीत जागृतीसाठी संविधान मंदिर नक्कीच प्रेरणादायी ठरेल असे प्रतिपादन उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी केले.

एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय येथे कौशल्य विकास विभागांतर्गत व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय अंतर्गत ४३४ औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये 'संविधान मंदिर लोकार्पण सोहळा झाला. यावेळी उपराष्ट्रपती यांच्या पत्नी डॉ. सुदेश धनखड, केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले, राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन,उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस नागपूर येथून दूरदश्य संवादप्रणाली व्दारे उपस्थित होते.



कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, कौशल्य विकास विभागाचे सचिव गणेश पाटील, विकास आयुक्त प्रदिपकुमार डांगे,कौशल्य विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. अपुर्वा पालकर, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाचे संचालक सतीश सूर्यवंशी उपस्थित होते.यावेळी मान्यवरांच्या हस्ते परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. मान्यवरांनी संविधान संग्रहालयाची पाहणी केली.

उपराष्ट्रपती जगदीप धनखड म्हणाले की, भारतीय संस्कृतीचे सार आपल्या संविधानात सामावले आहे. भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधान निर्मितीमध्ये खूप मोठे योगदान आहे. भारतीय राज्यघटना सर्वार्थाने वैशिष्ट्यपूर्ण असून राज्यघटनेचा गाभा आपण समजून घेणे गरजेचे आहे. वंचितांच्या विकासासाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आयुष्यभर परिश्रम केले. सामाजिक न्याय हा आरक्षणाचा आधार असून वंचितांना मुख्य प्रवाहात आणण्यावर भर देणे गरजेचे आहे. डॉ. आंबेडकर यांचे योगदान नव्या पिढीला समजणे गरजेचे असून त्यादृष्टीने संविधान मंदिर उपक्रम अतिशय उपयुक्त ठरेल. जागतिक लोकशाही दिवस सर्वत्र साजरा होत असताना आपल्याला अभिमान आहे की भारत हा सर्वात मोठा लोकशाही असलेला देश असून जो विविधतेतही एकता जपून आहे. याचे सर्व श्रेय आपल्या संविधानाला जाते. भारतीय हीच आपली पहिली ओळख असून राज्यघटनेप्रती आपण सदैव आदर बाळगणे गरजेचे आहे. या संविधानाचे महत्व नव्या पिढीला समजावे यासाठी असे उपक्रम खूप गरजेचे आहेत असेही धनखड यांनी सांगितले. राज्यात ४३४ औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये 'संविधान मंदिर लोकार्पण हा उपक्रम स्तुत्य असल्याचे धनखड यांनी सांगितले.

# मध्यरात्री रमाबाई नगरातील इमारतीच्या इलेक्ट्रिक केबिनला आग

## धुरामुळे १३ जण गुदमरले , राजावाडी मध्ये दाखल

प्रतिनिधी
■ मुंबई

पूर्व उपनगरातील घाटकोपर पूर्व येथील रमाबाई नगरातील शांती सागर बिल्डिंग, रमाई निवास- डी 2, या तळमजल्यावर आणि वरच्या सात मजल्यांच्या इमारतीतील सामान्य इलेक्ट्रिक मीटर केबिनमध्ये इलेक्ट्रिक वायरिंग, इलेक्ट्रिक इन्स्टॉलेशन इत्यादींपर्यंत काल मध्यरात्री १.३५ च्या दरम्यान आग लागली होती, संपूर्ण इमारतीत धुराचे लोट पसरले होते; विविध मजल्यांवर अडकलेल्या 80-90 व्यक्तींची जिने चढून अग्निशमन दलाच्या जवानांनी सुटका केली. अर्ध्यातासात ही आग विझवण्यात आली. डॉ. इनामदार (एमओ) यांच्याकडून मिळालेल्या माहितीनुसार एकूण १३ गुदमरलेल्या लोकांची नोंद झाली, त्यापैकी १२ जणांना दाखल करण्यात आले आणि एकावर ओपीडीच्या आधारे उपचार करून त्यांना डिस्चार्ज देण्यात आला,

जखमीना रुग्णालयात ने आण करण्याची व्यवस्था पालिकेतील राष्ट्रवादी काँग्रेसच्या माजी मनपा गटनेत्या राखी जाधव यांनी केली. तसेच जखमी रुग्णांना योग्य उपचार मिळावे म्हणून शिव आरोग्य सेनेचे मुंबई सह समन्व्यक प्रकाश वाणी, विधानसभा संघटक सचिन भांगे, कैलास गोसावी,चंद्रकांत हळदणकर,गोपाळ जोशी यांनी रुग्णालयात धाव घेत, जखमीना योग्य ते उपचार देण्यात यावे,अशी विनंती डॉक्टरांना केली.

या आगीत जखमी झालेल्या हर्षा अनिल भिसे (,35) 2. स्वीटी संदिप कदम ( 45) जान्हवी मिलिंद रायगावकर (एफ, 17), प्रियंका काळे (एफ, 30), जसीम सलीम सय्यद (M, 17),. ज्योती मिलिंद रायगावकर ( 32),. फिरोजा इकबाल शेख ( 35), लक्ष्मी लक्ष्मण कदम (एफ, 50),. लक्ष्मण रामभाऊ कदम ( 60), मानसी श्रीवास्तव (एफ, 24), अक्षरा सचिन दाते ( 19),. आबिद शाह ( 22) अमीर इक्बाल खान (M, 27) यांना राजावाडी रुग्णालयात उपचार करुन सोडण्यात आले.

# नेहरू सेंटरमध्ये 26व्या नाट्यमहोत्सवाचे आयोजन : पाच दिवसाचा महोत्सव

प्रतिनिधी
■ मुंबई

वरळीच्या नेहरू सेंटर मध्ये २३ सप्टेंबर ते २७ सप्टेंबर या दरम्यान नाट्यमहोत्सव सलग पाच दिवस नेहरू सेंटरच्या प्रशस्त नाट्यगृहात होणार आहे. दररोज संध्याकाळी ७ वाजता प्रेक्षक प्रिय ठरलेल्या, समीक्षकांनी दखल घेतलेल्या, गौरवशाली नाटकांचा मुंबईकरांना विनामूल्य आनंद घेता येईल. यात

हरवलेल्या पत्त्यांचा बंगला, आषाढ का एक दिन, एकेक पान गळावया, हुं स्पेशल छुं, नकळत सारे घडले या नाटकाचा समावेश आहे. अशी सर्वोत्कृष्ट नाटके एकत्रितपणे मुंबईकरांना पाहता यावीत यासाठी वरळीच्या नेहरू सेंटरच्या वतीने प्रत्येक वर्षी थिएटर फेस्टिवलचे आयोजन करण्यात येते. यंदा या महोत्सवाचे २६वे वर्ष आहे.

यावेळी मराठी बरोबर गुजराती, हिंदी नाटकांचा सुद्धा समावेश आहे. २३ सप्टेंबरला स्वरा मोकाशी लिखित आणि चंद्रकांत कुलकर्णी दिग्दर्शित 'हरवलेल्या पत्त्यांचा बंगला' हे नाटक होणार आहे. अनेक पुरस्कार प्राप्त हे नाटक असून 'जिगीषा' या संस्थेने या नाटकाची निर्मिती केली आहे. दुसऱ्या दिवशी २४ सप्टेंबरला 'आषाढ का एक दिन' हे हिंदी नाटक सादर करण्यात येणार आहे. मोहन



राकेश यांनी या नाटकाचे लेखन केले असून राजेश शर्मा हे या नाटकाचे दिग्दर्शक आहेत. सुरभी थिएटर्सची ही निर्मिती आहे. ज्यानी अनेक प्रायोगिक नाटकांची निर्मिती करून प्रेक्षक वर्ग निर्माण केला आहे. अतिशय लोकप्रिय ठरलेली ही कलाकृती सादर करण्यासाठी नाशिकचे कलाकार मुंबईत दाखल होणार आहेत. २५ सप्टेंबरला 'एकेक पान गळावया' हे मराठी नाटक सादर केले जाणार आहे. डॉ. समीर मोने लिखित हे नाटक असून सुनील कदम यांनी त्याचे दिग्दर्शन केले आहे. विशेष म्हणजे पोलीस सेवेत काम करणाऱ्या कलाकारांची ही कलाकृती आहे. जी विविध स्पर्धेत गाजलेली आहे. पोलीस आयुक्त कार्यालयाच्या वतीने पोलीस कर्मचारी हे नाटक सादर करणार आहेत. २६ सप्टेंबरला गुजराती व्यावसायिक रंगमंचावरती गाजलेले 'हुं स्पेशल छुं' नाटक सादर केले जाणार आहे. याचे लेखन हेनीश नरेशकुमार खनवार यांनी केले असून दिग्दर्शन विजय गाला आणि ऋषभ छेडा यांनी केले आहे. श्री वाघड ग्रॅडूटेस असोसिएशनची ही निर्मिती आहे. महोत्सवाच्या शेवटच्या दिवशी शेखर ढवळीकर लिखित आणि विजय केंकरे दिग्दर्शित 'नकळत सारे घडले' हे नाटक सादर केले जाणार आहे. नवनीत प्रोडक्शनची ही निर्मिती आहे.

नेहरू सेंटरच्या तिकीट काउंटर वरती फक्त १८ सप्टेंबर या दिवशी सकाळी १०.३० वाजल्यापासून वितरित करण्यात येणार आहेत. असे नेहरू सेंटर ने कळविले.आहे.

# दादर सांस्कृतिक केंद्रातर्फे वसीम अहमद खान यांचे गायन

प्रतिनिधी
■ मुंबई

दादर माटुंगा सांस्कृतिक केंद्राच्या वतीने नाना आणि भाऊ राजाध्यक्ष यांच्या स्मृतीप्रित्यर्थ आणि भरत व शैलेश राजाध्यक्ष तसेच शारदा सबनीस यांच्या सहकार्याने वसीम अहमद खान यांचा गायन कार्यक्रम रसिकांसाठी आयोजित करण्यात आला आहे. त्यांना तबल्यावर अभय दातार तर संवादिनीवर निरंजन लेले साथ देतील. हा कार्यक्रम रविवार दिनांक २२ सप्टेंबर २०२४ या दिवशी सायंकाळी पाच वाजता संस्थेच्या वा. वा. गोखले वातानुकूलित सभागृहात होईल. कार्यक्रम सर्वांसाठी खुला असून अधिक माहितीसाठी संपर्क २४३०४१५०.


वसीम अहमद खान यांची हेवा करणारी वंशावळ आहे. १३ व्या शतकापासून भारतात गायन क्षेत्रात अस्तित्वात असलेल्या आग्रा घराण्याचे ते एकमेव थेट वंशज आहेत त्यांच्या गायकीत आग्रा धृपद गायनाचा प्रभाव आहे. धृपद आणि ख्यालच्या आवाजाने आशीर्वादित खान यांनी अनेकांना प्रभावित केले आहे. भारतातील प्रसिद्ध गायक उस्ताद रशीद खान यांनी चालवल्या जाणाऱ्या शाखरी बेगम मेमोरियल ट्रस्ट या अकादमीचे वरिष्ठ प्राध्यापक सदस्य म्हणून पाच वर्षे अध्यापन केले. ख्याल गायनाव्यतिरिक्त, खान यांच्या ठुमरी सादरीकरणांनाही रसिक आणि सामान्य प्रेक्षकांकडून प्रशंसा मिळाली आहे.

**पश्चिम रेल्वे**

ओएचई फेरफार काम वरी. डी ई ई/टीआरडी /वलसाड ई निविदा सूचना क्र. ई एल- टी आर डी - डबल्यू - ११८ - २४-२५-११ दिनांकित १०.०९.२०२४ मगवित आहेत. कामाचे नाव: मुंबई विभागा मधील उधना जळगाव अनुभागामधील चावलखेड स्थानकाच्या दोन्ही बाजूंना नव्याने प्रस्तावित आपत्कालीन एक्स/ओ संदर्भात ओ एच ई फेरफार काम. जाहिरात मूल्य: रू. ६२,८८,७९०/- ई र ठे : रू. १,२५,८००/- सादरीकरणाचा दिनांक: ०९/१०/२०२४ रोजी १५.०० वा. पर्यंत. अधिक तपशिलासाठी कृपया आमच्या www.ireps.gov.in लां भेट द्या. प्रत्यक्ष प्रस्ताव स्विकारले जाणार नाहीत ०५३६

आम्हाला लाईक करा: facebook.com/WesternRly

माणूस आणि निसर्ग यांच्यामध्ये असलेला बंध तुटू नये,हीच सुखी होण्याची पहिली अट आहे.



- लिओ टॉलस्टॉय
रशियन लेखक

वृत्तमानस
मुंबई, सोमवार, १६ सप्टेंबर २०२४

# आत्महत्येचे पीक...

कृषिप्रधान देश अशी ओळख आपल्याकडे असूनही शेतकरी आणि शेती कायमच उपेक्षित राहिलेले आहे. आजही किमान ६० टक्के जनता शेतीवर अवलंबून असताना शेती हा विषय कायमच दुय्यम स्थानी राहिला हे दुर्दैव. बदलत्या काळानुसार शेती आणि शेतीमधील तंत्रज्ञान यांचा फारसा मेळ न बसल्याने शेती तोट्यातच गेल्याने अनेकांनी आत्महत्येचा पर्याय स्वीकारला आणि तो आजही कायम आहे. मधल्या काळात सत्तेत आलेल्या अनेक लोकांनी संपूर्ण कर्जमाफी देऊन त्यावर उपाययोजना करण्याचा प्रयत्न केला असला तरी तो तात्पुरता ठरत आहे. मुळात शेती आणि शेतकरी यांना बदलत्या काळानुसार आधुनिकतेची जोड दिल्यास हा व्यवसाय शाश्वत होऊ शकतो याची जाणीव अनेकांना यापूर्वी झाली नाही. अलीकडेच केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत कृषी आणि कृषीसंलग्न क्षेत्राला बळ देणाऱ्या विविध सात योजनांना मंजुरी देण्यात आली. शेतकऱ्यांचे आर्थिक उत्पन्न वाढविणे हे मुख्य उद्दिष्ट ठेवून सुमारे १४ हजार २३५ कोटी रुपये खर्चाची तरतूद असलेल्या या सात योजनांना मंजुरी देण्यात आली. यात प्रामुख्याने डिजिटल कृषी, पीक विज्ञान, कृषी शिक्षण, दुग्ध उत्पादन, फलोत्पादन, कृषी विज्ञान केंद्रांचे बळकटीकरण आणि नैसर्गिक स्रोतांचे व्यवस्थापन करणे आदींचा यामध्ये समावेश आहे. या निर्णयामुळे शेती क्षेत्रात पुढील काळात अपेक्षित बदल घडू शकतात. देशाची लोकसंख्या १४० कोटींवर गेली आहे. गहू, तांदूळ, मका, साखर, तेलबिया, कडधान्य उत्पादनात देश अग्रेसर आहे. अन्नधान्याच्या उत्पादनात देश जगात आघाडीच्या स्थानावर आहे. तरीही लोकसंख्येची भूक प्रचंड मोठी असल्यामुळे अन्नधान्याच्या उपलब्धतेबाबत कायम साशंकता असते. महागाई, दरवाढीची टांगती तलवार कायम असते. त्यामुळे केंद्र सरकारने या योजनेंतर्गत देशाची अन्न सुरक्षा सुनिश्चित करण्याला प्राधान्य दिले आहे. अन्न सुरक्षेसाठी पीक विज्ञान अभियान सुरू करण्यात आले आहे. शेतकऱ्यांना हवामानातील बदलाला अनुकूल बनविणे, हवामान बदल अनुकूल शेतीचे प्रारूप विकसित करणे, देशाला २०४७ पर्यंत अन्न सुरक्षा प्रदान करणे हा या अभियानाचा उद्देश आहे. या अभियानासाठी निधीची तरतूद करण्यात आली आहे. या अभियानाअंतर्गत संशोधन आणि शिक्षणावर भर असून, हवामान अनुकूल पिकांच्या जाती विकसित केल्या जाणार आहेत. अन्न आणि चारा पिकासाठी आनुवंशिक सुधारणांवर भर असणार आहे. कडधान्य आणि तेलबिया पिकांतील आनुवंशिक सुधारणा करून जास्त उत्पादन देणाऱ्या, अति तापमान, अति थंडी, अतिवृष्टी आणि पाण्याचा ताण सहन करून चांगले उत्पादन देणाऱ्या जातींचे संशोधन केले जाणार आहे. तसेच व्यावसायिक पिकांतील कीटक नियंत्रण, सूक्ष्म जंतू आणि परागकण, परागीभवन आदींवर संशोधन केले जाणार असल्याचे सांगण्यात येते. मुळात शेती तोट्यात असल्याने शेतकरी आत्महत्या करण्याचे प्रमाण गेल्या काही काळात वाढले. दुष्काळ, अतिवृष्टी, नापिकी या नैसर्गिक स्थितीखेरीज शेतमालाचे पडलेले भाव, सरकारचा बाजारातील हस्तक्षेप, पीक विम्यातील गोंधळ, सरकारी योजनांचा लाभ मिळवून देण्यात होत असलेली अडवणूक, पीक कर्ज घेताना येणाऱ्या अडचणी, वीज आणि पाण्याचे प्रश्न, उदरनिर्वाहासाठी होणारी आर्थिक ओढाताण आणि यातून उभा राहणारा कर्जबाजारीपणा ही शेतकरी आत्महत्यांसाठी प्रमुख कारणे सांगितली जात आहेत. बँका पीक कर्जासाठी शेतकऱ्यांना मदत करीत नाहीत. पीक विम्याचा फायदा शेतकऱ्यांच्या मिळत नाही. सततची नापिकी, कर्जबाजारीपणा आणि कर्ज परतफेडीचा तगादा या कारणांमुळे शेतकरी आत्महत्या झाली असल्यास मदत व पुनर्वसन विभागामार्फत शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना १ लाख रुपयांची आर्थिक मदत दिली जाते. नैसर्गिक आपत्तीमुळे शेतीपिकांचे नुकसान झाल्यास राज्य आपत्ती व्यवस्थापन निधीतून अथवा वेळप्रसंगी राज्य सरकारच्या निधीतून निकषाबाहेर मदत दिली जाते. पण ही मदत तुटपुंजी असते, असे अनेक शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. राज्यात सर्वाधिक शेतकरी आत्महत्या पश्चिम विदर्भात होत आहेत. यंदा वर्षाच्या पहिल्या सहा महिन्यांत किमान ५०० शेतकरी आत्महत्या येथे झाल्या. त्यातही सर्वाधिक आत्महत्या अमरावती जिल्ह्यात झाल्या आहेत. खरीप हंगामासाठी शेतकरी पेरणीच्या धावपळीत असताना शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचा आलेख मात्र वाढला आहे. राज्यात गेल्या पाच महिन्यांत सुमारे १ हजार शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे उघडकीस आले आहे. याचा अर्थ दिवसाला सात शेतकरी आत्महत्या करतात, ही आकडेवारी चिंताजनक आहे. खरीप पिकावर कापूस, सोयाबीन, धान, ज्वारी, बाजरी, भाजीपाला या पिकावरच विदर्भ, मराठवाडा व उत्तर महाराष्ट्राची ग्रामीण अर्थव्यवस्था अवलंबून असते. तीही पिके उद्ध्वस्त झाल्यामुळे धोक्यात आली आहे. दरवर्षीच्या नैसर्गिक आपत्तीमुळे व शेतीमालाला न मिळणाऱ्या भावामुळे अर्थव्यवस्था आधीच नाजूक असून, ती संपण्याच्या मार्गावर आहे. त्याचा फटका शहरी उद्योगांनासुद्धा बसणार आहे. ६० कोटी शेतकऱ्यांची क्रयशक्ती संपल्यावर उद्योगातील वस्तूंची विक्री कमी होईल. मंदीची गती वाढेल. उद्योग बंद होऊन बेरोजगारी वाढेल. शेती बुडाल्यामुळे असे चक्र फिरेल अशी सध्या अवस्था आहे. यावर मात करण्यासाठी केंद्र सरकारने शाश्वत पशुधन आरोग्य आणि उत्पादन योजना सुरू केली आहे. त्याअंतर्गत पशुधन आणि दुग्ध व्यवसायातून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यावर भर असणार आहे. या योजनेसाठी १,७०२ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. योजनेत पशुधनाच्या आरोग्याचे व्यवस्थापन करणे, पशुवैद्यकीय शिक्षणाला चालना देणे, दुग्ध उत्पादनात वाढ करण्यासाठी तंत्रज्ञानाचा अवलंब करणे, विकास करणे, पशु आनुवंशिक क्षेत्रात अभ्यासाला बळ देणे, जास्तीत जास्त दूध देणाऱ्या गायी, म्हशींवर संशोधन करणे, भ्रूण प्रत्यारोपण यासारखे तंत्रज्ञान सामान्यांच्या आवाक्यात येण्यासाठी प्रयत्न करणे आदींचा समावेश आहे. फलोत्पादन क्षेत्राचा शाश्वत विकास करण्यात येणार आहे. तसेच कृषी क्षेत्रात डिजिटल क्रांती करण्याचा सरकारचा मानस आहे. यासाठी कृषी क्षेत्रातील सर्व प्रकारच्या पायाभूत व्यवस्थेचे डिजिटलायझेशन करण्यात येणार आहे. या अभियानासाठी अडीच हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. ॲग्री स्टॉकअंतर्गत शेतकरी नोंदणी कार्यालय, गाव भू-अभिलेख नोंदणी कार्यालय आणि पीक पेरणी नोंदणी कार्यालय सुरू करण्यात येणार आहे. यामुळे देशाच्या खेडोपाड्यातील कृषीविषयक माहिती एका क्लिकवर उपलब्ध होण्याची चिन्हे आहेत. कृषी निर्णय समर्थन प्रणालीअतंर्गत दुष्काळ, पूर आदींची भौगोलिक माहिती संकलित केली जाईल. हवामान, उपग्रहांद्वारे भूजल, पाण्याच्या उपलब्धतेची माहिती संकलित केली जाईल. पिकांच्या उत्पादनाची निश्चितता आणि विम्यासाठीचे प्रारूप विकसित करण्यात येणार आहे. मातीचा अहवाल, मातीचे स्वरूप, संबंधित मातीत कोणते पीक घेता येईल, याचा सल्ला शेतकऱ्यांना देण्याचा प्रयत्न होणार असल्याने त्याचा फायदा होईल, असे मानावयास हरकत नाही. सर्वात महत्त्वाचे म्हणजे कृषी कर्जासाठी वेगळी आणि तात्काळ संपर्क होऊ शकेल, अशी व्यवस्था निर्माण करण्यात येणार असल्याने ती शेतकऱ्यांची चिंता मिटू शकते. व्यवस्थेचे बळकटीकरण करण्याचा भाग म्हणून कृषी शिक्षण, कृषी व्यवस्थापनाला बळ दिले जाणार आहे. या उपक्रमांचा कृषी शिक्षण घेणारे विद्यार्थी आणि संशोधकांना फायदा होणार आहे. सध्याच्या आणि भविष्यातील संभाव्य आव्हानांचा सामना करण्यासाठी कृषीच्या विद्यार्थ्यांनी संशोधन करण्याची अपेक्षा आहे. एकूणच सर्वांच्या मदतीने आधुनिकतेची कास धरत शेती व्यवसायाला ऊर्जितावस्था देण्याचा प्रयत्न किती यशस्वी ठरतो याचे उत्तर काळच देईल.

# उत्सवाच्या निमित्ताने मुंबई...



## महापालिकायन

**सुनील शिंदे**

मोबाईल नंबर–९८२१९९६११७

भारताची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईत गणेशोत्सव मोठ्या भक्तिभावाने साजरा होत आहे. उद्या शेवटचा दिवस आहे. सर्व बाप्पा आपल्या भक्तांचा निरोप घेणार आहेत. एकट्या मुंबईत १० ते १२ हजार सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे आहेत. त्यातील खूप कमी अशी मंडळे आहेत की ते सर्व रितसर परवानग्या घेऊन गणेशोत्सव साजरा करतात.

बृहन्मुंबई महानगर पालिकेच्या जनसंपर्क विभागाच्या माध्यमातून अशा नोंदणीकृत गणेश मंडळांसाठी दरवर्षी श्री गणेश गौरव पुरस्कार स्पर्धा आयोजित केली जाते. या वर्षीही ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. पर्यावरण पूरक गणेशोत्सव साजरा करण्याचे आवाहन मुंबई महानगरपालिकेने आधीच केले होते.तसे ते दरवर्षी केले जात असते. गणपतीची मूर्ती प्लास्टर ऑफ पॅरिसची नको. या मूर्ती विसर्जनानंतर पाणी प्रदूषित होते. त्यामुळे शाडूच्या मातीची, लाल मातीची मूर्ती, कागद्याच्या लगद्यापासून बनविण्यात आलेली मूर्ती, टिश्यू पेपर च्या माध्यमातून बनविण्यात आलेली मूर्ती अशा मूर्तींचा आग्रह पालिकेने धरला होता. गणेश मूर्तींना कृत्रिम रां रंगाऐवजी नैसर्गिक रंग देण्यात आला आहे का? त्याच बरोबर उत्कृष्ट नेपथ्य, मंडळाचे वर्षभर चालणारे उपक्रम, उत्कृष्ट मूर्ती, पर्यावरण विषयक, व पूरक, स्वच्छता जनजागृती, सी सी टी वी कॅमेरे लावले की नाही यासाठी पालिकेने घसघशीत रोख पुरस्कार ठेवले होते. या वेळी आम्हाला जनसंपर्क विभागाने पत्रकार म्हणून परिक्षक नेमण्यात आले होते. शहर, पूर्व व पश्चिम उपनगर या तीन विभागांसाठी परिक्षकांच्या तीन टीम नेमण्यात आल्या होत्या. पहिली व नंतर अंतिम फेरीत मंडळाची निवड करायची होती. यंदा मंडळांमध्ये पर्यावरण विषयक जनजागृती बऱ्यापैकी झाल्याचे दिसले. पर्यावरण जपण्याचा प्रयत्न अनेक मंडळींनी केलेला दिसला. पालिकेने ठेवलेल्या अटींचे पालन होत असल्याचे दिसले. मुंबई आधीच प्रदूषित आहे. गेल्या वर्षभरापासून हे प्रदूषण कमी करण्याचा प्रयत्न पालिकेचे पर्यावरण खाते करीत आहे. मुंबईत सुमारे ६ हजार नवनिर्माणाची कामे सुरू आहेत. त्यातून उडालेले धुलिकण, वाहने धुराच्या माध्यमातून सोडत असलेले कार्बनडाय ऑक्साईड, बेकरीत जाळण्यात येणारे लाकूड या मुळे मुंबई प्रदूषित झाली आहेच. पालिकेने हे प्रदुषण कमी करण्यासाठी विकासकांना अनेक निर्बंध घातले , दर शनिवारी हजारो कामगार कर्मचाऱ्यांना घेऊन मुंबईतील प्रत्येक विभागात रस्ते पाण्याने स्वच्छ करणे, रस्त्यावरील भंगार जमा करणे अशी कामे केली. मोकळ्या खेळाच्या मैदानात हवे मुळे मोठ्या प्रमाणात धूळ उडून ती लोकांच्या नाकावाटे वा तोंडावाटे शरीरात प्रवेश करीत असल्याने मैदानात पाणी मारणे असे अनेक उपक्रम राबविले त्यात पुन्हा गणेशोत्सवात प्रदूषण फैलावणाऱ्या कोणत्याही वस्तूंचा वापर नको असे आवाहन च मंडळांना पालिकेने केले होते. मात्र मंडळांनी देखावे उभारताना ही त्याची चांगली काळजी घेतली होती. अनेक मंडळांनी ऑडियोच्यामाध्यमातून चांगले सामाजिक, पर्यावरण विषयक, देश भक्तीवर, मराठीचा विषय, मोबाईल चा अतिरेक, कचरा, बालमजुरी, महिलांवरील अत्याचार, मुंबईची वाहतूक समस्या, झाडे लावाचा संदेश देणारे असे विविध देखावे उभे केले होते, अनेक मंडळांनी भक्तांना वह्या, पुस्तकांपासून सर्व शालेय वस्तू बाप्पाला अर्पण करण्याचे आवाहन केले होते. भक्तांनीही या आवाहनाला चांगला प्रतिसाद दिल्याचे दिसले. मंडळातर्फे मग या वस्तू आदिवासी भागातील गरजू व गरीब मुलांमध्ये त्याचे वाटप करतात. दान पेटीत जमा होणारे पैसेही मुलांच्या शिक्षणासाठी देतात. काही मंडळांनी आदिवासी मुलांना दत्तक घेतले आहे.त्यांच्या शिक्षणाचा सर्व खर्च ही मंडळे करतात, वर्षभरात रक्तदान, आरोग्य शिबिरे भरवतात असे लोकोपयोगी विविध उपक्रम मंडळे राबवतात हेही दिसले. सगळी तरुण मंडळी आपला कामधंदा करून ही समाज सेवा करीत असतात. अनेक मंडळांमध्ये कलागुण.असलेले कार्यकर्ते आहेत. गणपतीची मूर्ती बनवण्यापासून देखावे तयार करण्यापर्यंत ची सर्व कामे हे कार्यकर्ते करतात. या कार्यकर्त्यांना प्रोत्साहन मुंबई महानगरपालिकेसारख्या काही संस्था स्पर्धेच्या माध्यमातून देत असतात. पण त्या फार तोकड्या पडतात. कार्यकर्त्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी सरकारी पातळीवर काही प्रयत्न व्हायला हवेत. बरे हे कार्यकर्ते म्हणजे तरुण पिढी आहे. ती इतर कोणत्या वाईट मार्गाला जाणार नाही. याची काळजी घेण्याची गरज आहे. म्हणून लक्ष देण्याची गरज आहे.

**मुस्लिम कार्यकर्ते**

सार्वजनिक गणेशोत्सवात केवळ मराठी हिंदू कार्यकर्तेच नाही तर सर्वसमभाव जपणारे इतर धर्मीय कार्यकर्तेही परिक्षण करीत असताना दिसले. आज देशात मुस्लिम समाजाविरुद्ध वातावरण तयार करण्याचे पध्दतशीर प्रयत्न होत आहेत. सत्ताधारी पक्षातीलच एक आमदार , मशिदीत घुसून मारू, कोणत्याही एजंट ने मुस्लिमांना घरे देऊ नये, हिंदूंनी मुस्लिमांशी कोणताही व्यवहार करू नये, हिंदुंशीच व्यवहार करावा, कुणी वळवळ करीत असेल तर मला.फोन करा.अशी चिथावणी खोर भाषा करून दोन धर्मात वितुष्ट निर्माण करण्याचे काम करतो.पण त्या आमदाराविरुद्ध कोणतीही कारवाई होत नाही. तोच आमदार जर विरोधी पक्षाचा असता तर त्यांच्यावर लगेच दंगल घडविण्याचा आरोप ठेऊन त्यांच्यावर कारवाई झाली असती. समाज माध्यमांवर भक्तांकडून मुस्लिमविरोधी पोस्ट टाकल्या जातात. त्यांना भडकवण्याचा प्रयत्न केला जातो. पण तरीही संबधितांवर कोणतीच कारवाई होत नाही. दंगली घडवायला कारण ठरतील हेच लोक पण त्या दंगलीत भरडले जातील सर्वसामान्य लोक, की ज्यांचा कशाशीच संबंध नाही. मुस्लिमांविरोधात अशा प्रकारच्या कारवाया सुरू असल्याने हा समाज भयभीत झाला आहे. हिंदू - मुस्लिम व इतर सर्व समाजात भाईचारा रहावा, एकमेकांशी चांगले संबंध असावेत, एकमेकांच्या धार्मिक, सामाजिक, सणावारात एकमेकांनी सहभागी व्हावे, घरी दारी एकत्र भोजन करावे , मशिदीत काही आक्षेपार्ह चालत असल्याचा जर कुणाला संशय येत असेल तर कोणत्याही हिंदू बांधवांनी मशिदीत यावे त्यांनी तिथे पाहणी करावी. असे प्रयत्न PROPHET for all या माध्यमातून इस्लाम जीमखान्याचे चेअरमन माजी आमदार युसुफ अब्राहनी व त्यांचे सहकारी करीत आहेत. त्यांचे प्रयत्न स्तुत्य आहेत. पण ही झाली त्यांची बाजू पण एका हाताने टाळी वाजत नाही. मुस्लिम समाजातील काही प्रवृत्ती ही तेढ वाढविण्यास कारणीभूत ठरत आहेत. त्या प्रवृत्ती मध्ये परिवर्तन घडवून आणण्याचा प्रयत्न ही युसुफ अब्राहनी यांनी केला पाहिजे. जो पर्यंत मुळावर घाव घातला जात नाही, दोन समाजातील गैरसमज दूर होत नाही, एकमेकांबद्दल विश्वासाचे वातावरण निर्माण होत नाही,एकमेकांची मने जुळत नाही तोपर्यंत सलोख्याचे वातावरण निर्माण होणार नाही. उत्तर प्रदेशात तर भाजपच्या मुख्यमंत्र्यांनी हम करेसो कायदा हाती घेतला होता. एखाद्या मुस्लिम मुलाने हिंसाचार किंवा दंगलीत सहभाग नोंदवला तर त्याच्या घरावरच बुलडोझर फिरवला जात असे. ही मुस्लिमविरोधी खुनशी वृत्ती आहे. म्हणून कायद्याला न जुमानता राज्य सरकार ही कृती करत होते. जो गुन्हेगार आहे. त्याला शिक्षा व्हायलाच हवी याबद्दल कुणाचे दुमत असण्याचे कारण नाही. पण त्याची शिक्षा ही त्याच्या कुटुंबाला का? असा प्रश्न साऱ्यांनाच पडला होता. पण सर्वोच्च न्यायालयाने २ सप्टेंबर रोजी या राज्यांना चांगलेच फटकारले आहे.कायदेशीर प्रक्रियेचे पालन न करता एखाद्या आरोपीच्या घरावर बुलडोझर कसा काय चालवला जातो. असा सवाल उपस्थित केला. व कायदेशीर मार्गानेच कारवाई करण्याचा अधिकार आहे त्याचे पालन करा असा दमही न्यायालयाने या राज्यांना दिला आहे. इतक्या टोकाचा समाजाला विरोध होत असताना सुद्धा दहिसर पूर्व येथील झोपडपट्टी असलेल्या गावदेवी नगरात नवतरुण मित्र मंडळाचे अध्यक्ष आसिफ मुल्ला आणि राजू मुल्ला हे आपल्या कार्यकर्त्यांसह गेल्या २५ वर्षापासून सार्वजनिक गणेशोत्सव साजरा करीत आहेत. आसिफ मुल्ला हे संपूर्ण सजावटीचे काम आपल्या कल्पनेने करतात. यावेळी त्यांनी महिलांवरील अत्याचारावर देखावा उभा केला आहे. व महिलांना प्रशिक्षण देण्याचा संकल्प त्यांनी सोडला आहे. तर कुलाबा मार्केट मध्ये दर्गा व गणपतीचा मंडप अगदी बाजू बाजूला दरवर्षी असतो. साई गणेश मित्र मंडळातर्फे हा गणेशोत्सव गेल्या अनेक वर्षापासून साजरा करण्यात येतो. असेही दृश्य काही ठिकाणी दिसले. याचा अर्थ स्थानिक पातळीवर हिंदू मुस्लिम एकोप्याने , मिळून मिसळून राहतात पण काही राजकारणी त्यांची निवडणुकीत मते मिळत नाहीत म्हणून ते लोकांमध्ये दोन धर्माबाबत विष पेरण्याचे काम करीत असतात. व माग अंध भक्तही त्याच मार्गाने विरोधी पोस्ट टाकून तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करीत असतात. समाज माध्यमांवर असेही काही व्हिडियो प्रसारित होतात की, ते बघून देशात कायदा सुव्यवस्था राखणारी पोलिस यत्रणा आहे की नाही. असे वाटावे. सात आठ जण एका मुलाला त्याचा जीव जाई पर्यंत लाठ्या काठ्याने मारताना दिसतात तर काही व्हिडियो मध्ये त्या मुलाच्या गुप्तांगात मिरची पावडर टाऊन त्यात पेन घुसवला जात असल्याचे दिसते. ही भयानक परिस्थिती एका विशिष्ट धर्माच्या मुलांबद्दल होत असताना तो व्हिडियो कुठला आहे. हे शोधून कारवाईची अपेक्षा असते. पण काही घडत नाही. त्यामुळें देशातून कायदा हद्दपार झाला की काय अशी शंका यायला वाव मिळतो.

**मुंबईतील दुर्लक्षित विभाग**

श्री गणेश गौरव पुरस्कार स्पर्धेचे परीक्षक म्हणून काम करताना असे अनेक विभाग विकासापासून अजून दुलर्क्षित असल्याचे दिसले. तिथले खराब रस्ते, पाण्याच्या पाईप लाईनला लागलेल्या गळतीमुळे झालेला ओला रस्ता. इतरत्र कचरा हे सारे दृश्य दहिसर गावदेवी भागात बघायला मिळाले. भांडुप पश्चिम येथील खिंडीपाडा म्हणजे शिवाजी महाराजांचा एखादा किल्लाच. वर पर्यंत बाईक जाऊ शकते. वर पायी जाणे म्हणजे दिव्यच. दम्याचा रुग्ण असेल तर तो पुन्हा वर डोंगर चढून जाण्याची हिम्मत करणार नाही. एखादा आजारी माणूस वरून खाली आणायचा म्हणजे मोठी कसरतच करावी लागत असेल. धारावी झोपडपट्टी म्हणजे आशिया खंडातील सर्वात मोठी समजली जाते. चिंचोळ्या गल्ल्या, माणसांची गर्दी रात्रीचे १२ वाजून गेले होते तरी माणसांची गर्दी कमी होत नव्हती.सारखी ये जा. एखादे वाहन मोठ्या मुश्किलीने बाहेर काढता येईल इतकी जागा. कुलाबा मार्केट मध्येही तीच अवस्था, गणेश मंडळाच्या मंडपा पर्यंत सुद्धा वाहन जात नव्हते इतकी दाटीवाटी. धारावीचा विकास तिथल्या लोकांच्या विरोधाला न जुमानता जोर जबरदस्तीने सरकारच्या पाठिंब्याने सुरू होऊ पाहतोय. त्याला विकास म्हणायचे की, जोर जुलूम म्हणायचे. मुंबई हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे शहर आहे.पण या शहराच्या उदरात कष्टकरी, श्रमिक, रोंजंदारीवर काम करून आपल्या संसाराचा गाडा हाकणाऱ्या हाडामासाच्या माणसांचे जगण्याचे अनेक प्रश्न, दुःखाचे डोंगर दडलेले आहेत. त्या कडे कोण बघणार? मुंबई फक्त नरिमन पॉइंट, मलबार हिल, गिरगाव, दादर, वांद्रे येथील चौपाट्या इथपर्यंत सीमित नाही. मुंबईची लोकसंख्या आज नक्की किती आहे हे कुणीही ठामपणे सांगू शकत नाही. कारण २०११ नंतर जी जनगणना करायची असते ती २०२१ मध्ये केली गेली नाही. २०११ च्या जनगणनेत १ कोटी २४ लाख ७८ हजार ४४७ इतकी लोकसंख्या अधिकृतपणे असल्याचे जाहीर करण्यात आले होते.आज घडीला ती दिड कोटीच्या पुढे गेली असल्याचे बोलले जाते. अशा या मुंबईच्या अंतरंगात डोकावून पाहण्याची गरज आहे. ते खरेच आंतर राष्ट्रीय दर्जाचे शहर म्हणता येईल का? इतकेच.

# पत्र मानस

## रेल्वेची नवी प्रणाली प्रवाशांना दिलासादायक पण

मुंबईत लोकलच्या दोन गाडीतील अंतर नव्या प्रणालीमुळे ३ ऐवजी २.५ मिनिटांवर येणार आहे.त्यामुळे लोकल गाड्यांची संख्या वाढून काही प्रमाणात प्रवासी गर्दी कमी करता येणार आहे.ही रेल्वे प्रवाशांना दिलासादायक बातमी आहेच.पण जेवढ्या सोयी सुविधा नव्याने मुंबईतील नागरिकांना केल्या जात आहेत त्या वाढत्या लोकसंख्येमुळे पुढे अपुऱ्याच पडणार आहेत.मुंबईत परराज्यातून नोकरी धंदया निमित्ताने येणाऱ्या नागरिकांमुळे मुंबईची लोकसंख्या दिवसेंदिवस वाढतच आहे. त्यांचा ताण नागरी सोयी, सुविधांवर पडत आहे.त्यासाठी वाढत्या लोकसंख्येला आवर घालण्याची वेळ आली आहे. याचा राज्य सरकारने विचार करावयास हवा.मुंबईतील गर्दीस रोखले तरच मुंबईकर जनता सर्व बाजूंनी त्रासमुक्त होतील.

**- नंदकुमार आ पांचाळ, घोडपदेव**

## योजनांवर भर याचा अर्थ सरकारला निवडणूक सोपी राहिलेली नाही

आगामी काळात होवू घातलेल्या विधानसभा निवडणुकीसाठी महाराष्ट्रातील सर्व पक्षांनी जोरात तयारी सुरु केली आहे विधानसभा निवडणुका नोव्हेंबरमध्ये होण्याची शक्यता आहे. लोकसभेमध्ये अपयश आल्याच्या पार्श्वभूमीवर विधानसभेच्या निवडणुकांसाठी महायुती सरकारने मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना कार्यान्वित केली आहे. लाभार्थी महिलांच्या खात्यात दरमहा १५००/- रुपये देणारी ही योजना महाराष्ट्रात चांगलीचं चर्चेत आली असली तरी प्रामुख्याने जिवनावश्यक वस्तूंचे भाव कमी करणे गरजेचे असताना सरकारने महिलांना १५००/- रुपये देवून बोळवण केली आहे. सद्या झपाट्याने अनेक वस्तूंचे भाव गगनाला जावून भिडले आहेत. काही ठिकाणी अतिवृष्टी तर कुठे दुष्काळ सदृश्यस्थिती यामुळे अनेक पिकांना फटका बसला आहे पण याच्याकडे सरकारचे लक्ष नाही फक्त आणि फक्त निवडणूका डोळयासमोर ठेवून मतांचा जोगवा मागण्यासाठी असल्या योजना कार्यान्वित केल्या जात आहेत. या लाडक्या योजनेच्या मुद्यावरुन अनेक नेते विविध सभेतून आरोप प्रत्यारोपांच्या फैरी झाडत आहेत. नेटकॅफेमध्ये ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी महिलांना तासन् तास ताटकळत रहावे लागते त्यामुळे महिलांच्या कामाचे नियोजन कोलमोडले आहे. सरकारने असल्या योजना राबवण्यापेक्षा शाश्वत विकासाचे सार्वजनिक प्रश्न सोडवले पाहिजेत. ही योजना ज्या महिला पात्र आहेत त्यांना लाभ मिळणारं आहे मग अपात्र आहेत त्यांचे काय ? तमाम महाराष्ट्रातील जनता लाडकी नाही काय ? असा देखिल सवाल विचारला जात आहे त्यासाठी सरकारने सार्वजनिक कामाला प्राधान्यक्रम देणे कधीही हिताचे ठरणार आहे. आज महाराष्ट्रात महागाई खून, बलात्कार, भ्रष्टाचार, अपघात, मारामारी, बेरोजगारी या समस्या वाढत असताना सरकार फक्तं निवडणूकीचा विषय घेवून सभा, विविध कार्यक्रमांचे इव्हेंट यामध्येच गुंतले आहे त्यामुळे लोकप्रिय योजना राबवली म्हणजे जनतेचे प्रश्न सुटले असा त्याचा अर्थ होत नाही म्हणूनच आगामी काळातील निवडणूक सत्ताधाऱ्यांना सोपी राहिलेली नाही !

**- राजू जाधव, मांगूर**

## चरणस्पर्श करायलाच हवा का?

लालबागचा राजाचे दर्शन अनेक राजकारणी,सेलिब्रिटी यानी सुलभपणे घेतले.पण सामान्य भक्त मात्र दोन दोन तास लहान मुलाबाळासह रांगेत उभे राहुन दर्शन घेतात. त्यातच राजाच्या चरणस्पर्शासाठी भक्त आग्रही असतात. यालाच नवसाची रांग म्हणतात.वास्तविक ज्याना नवस करायचा असेल तो मुखदर्शन घेऊनही नवस करु शकतो आणि ज्याला तो फेडायचा असेल तो चरण स्पर्श रांगेत उभे न रहाताही फेडू शकतो.नवसाच्या रांगेत उभे असलेले ८० टक्के भाविक हे कोणताही नवस केलेले नसतात पण फक्त चरणस्पर्शासाठी धडपडत असतात.याची खरच गरज आहे का ?प्रचंड गर्दीत धक्काबुक्की,भांडण करुन चरणस्पर्श केल्यास बाप्पा पावेल काय ? वास्तविक लालबागच्या राजा मंडळाने माटुंगा जीएसबीच्या मंडळाचा कित्ता गिरवुन नवसाची रांग बंद केल्यास व सर्व भाविकाना रांगेत दूरून दर्शन दिल्यास धक्काबुक्कीचे प्रकार बंद होतील त्याच प्रकारे मंडळाचे कार्यकर्ते आणि पोलिसावरील ताणही कमी होईल.आता उद्योगपती अनंत अंबानी मंडळाचे सल्लागार आणि विश्वस्त आहेत त्यानी या गैरव्यवस्थेकडे लक्ष द्यावे.

**- अरुण पां.खटावकर,लालबाग**

## शिवनेरी बस चालकाचा उद्दाम पणा

दि. १५.०९. २४ रोजी बस क्र.MH01EE5359 , बस वाहन चालक - PRL69 ०१९१२८ आर एस थोरात , प्रवास मार्ग दादर पूर्व - पुणे रेल्वे स्टेशनं , उतरण्याचे ठिकाण - वल्लभ नगर ) दुपारी. ११. ४२ ने माझी मुलगी प्रवास करत होती. उतरण्याचे ठिकाण वल्लभ नगर असताना माझ्या मुलीने विनंती करून सुद्धा , मुजोर बस वाहन चालक याने बस वल्लभ नगर ला नं थांबवता तुला नाशिक फाट्या ला उतरावे लागेल असं सांगून तिला नाशिक फाट्याला उतरवीली. वरील नमूद प्रवासात वल्लभ नगर बस स्थानक हा शिवनेरी चा अधिकृत बस स्टॉप म्हणून नोंद असताना मुजोर पणे माझ्या मुलीला नाशिक फाट्या येथे उतरवीणाऱ्या बस चालक याच्या वर दादर पुणे शिवनेरी कार्यालयाकडून योग्य कारवाई केली जाईल की मुजोर बस वाहनचालकाला पाठीशी घातले जाईल ? एकीकडे राज्यात दिवसेंदिवस महिलांच्या सुरक्षेबाबत विविध तर्क वितर्क निर्माण होत असताना , थोरात सारख्या मुजोर वाहन चालका कडून भविष्यात दुर्घटना घडण्यापूर्वीच संबंधित व्यवस्था पण यांनी सावध राहावे.

**- नितीन कदम दादर मुंबई**

महाबळेश्वर : ग्रामपंचायत झांजवड, ता. महाबळेश्वर, जिल्हा. सातारा यांच्या वतीने गणेशोत्सवाचे औचित्य साधून तालुक्यात प्रथमच रक्त दान शिबीर आयोजित करण्यात आले होते. या रक्त दान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. महाबळेश्वर तालुक्यात आता पर्यंत कधीच रक्त दान शिबीर आयोजित करण्यात आले नव्हते परंतु झांजवड गावाने शिबीर आयोजित करून नवीन विक्रम केला आहे. सदर शिबिरास मा. सभापती श्री. संजय गायकवाड तसेच पंचक्रोशीतील मान्यवर, सरपंच तसेच झांजवड गावाचे ग्रामस्थ बहू संख्येने उपस्थित होते.



## म ह त्त्वा चे

### रिक्षाच्या धडकेत तरुणाचा मृत्यू

**भिवंडी :** भरधाव रिक्षाने दिलेल्या धडकेत तरुणाचा उपचारापूर्वी मृत्यू झाल्याची घटना भिवंडीतील नदीनाका परिसरात घडली. याप्रकरणी मृत तरुणाच्या नातेवाइकांनी शुक्रवारी (ता. १३) निजामपुरा पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानंतर पोलिसांनी अज्ञात रिक्षाचालकाविरोधात गुन्हा दाखल केला आहे. शारीफ अलाउद्दीन शेख (वय ३१) असे मृत तरुणाचे नाव आहे. ४ सप्टेंबर रोजी रात्री नदीनाका येथे एका अज्ञात चालकाने त्याची रिक्षा बेदरकारपणे व भरधाव चालवून शारीफ शेख याला जोरदार धडक दिली. त्याला जखमी अवस्थेत मुंबईतील सायन रुग्णालयात उपचारासाठी नेले होते; मात्र रुग्णालयात दाखल करण्यापूर्वीच डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

### आरोग्य शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**मुलुंड :** पश्चिमेतील अष्टविनायक मित्र मंडळ यांच्या सुवर्ण महोत्सवी गणेशोत्सवानिमित्त आरोग्य शिबिराचे आयोजन शनिवारी (ता. १४) करण्यात आले होते. या शिबिरात रक्त तपासणीचा ४९ नागरिकांनी लाभ घेतला. तर मोफत चष्मा शिबिराचा तब्बल १२१ नागरिकांनी लाभ घेतला. वैद्यकीय शिबिरासही ४० नागरिकांनी हजेरी लावली. आरोग्य शिबिर मंडळाचे सल्लागार माजी शिवसेना उपविभागप्रमुख सुनील गारे, डॉ. राजेंद्र शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले. शिबिर यशस्वी करण्यासाठी मंडळाचे अध्यक्ष विजय रोटे यांच्या नेतृत्वाखाली लक्ष्मण हिले, प्रमोद पडवळ, प्रतीक गारे, भावेश हिले, विनोद बोरजे, सचिन बोराडे, विकास गारे यांनी अथक परिश्रम घेतले.

### मूकबधीर विद्यार्थ्याचा बंधाऱ्यात बुडून मृत्यू

**सातारा :** सातारा जिल्ह्यातील माण तालुक्यातील म्हसवड येथील शेंबडेवस्ती येथे आईसोबत शेतात मोटार चालू करण्यासाठी गेलेल्या मुकबधीर विद्यार्थ्यांचा माण नदी पात्रातील बंधाऱ्यात बुडून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना आज दुपारी एकच्या सुमारास घडली. माण नदीवरील म्हसवड पालिकेच्या नळपाणी पुरवठा करणाऱ्या विहीरजवळ शेंबडेवस्तीवरील बंधाऱ्यात ही घटना घडली. हणमंत मोहन शेंबडे (वय १८ , रा. शेंबडेवस्ती-म्हसवड ) असे मृत्यू झालेल्या मुकबधीर विद्यार्थ्यांचे नाव आहे. आईसमोरच मुलाचा मृत्यू झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. याबाबत घटनास्थळावरून मिळालेल्या माहितीनुसार हणमंत मोहन शेंबडे हा मुकबधीर विद्यार्थी इयत्ता दहावीच्या वर्गात सातारा येथील मुकबधीर विद्यालयात शिक्षण घेत आहे. गणेशोत्सव मुळे तीन चार दिवस सुट्टी असल्याने तो गावी झाला होता. आज दुपारी एक वाजता हणमंत शेंबडे हा आईसोबत शेतात मोटार चालू करण्यासाठी गेला होता. हणमंतची आईसुद्धा मुकबधीर आहे. माणगंगा नदी सध्या पुर्ण क्षमतेने वाहत आहे. त्यामुळे दोरखंडाच्या सहायाने नदी पार करून शेतात जावे लागत आहे. हणमंत शेंबडे सुध्दा आईला नदीच्या काठावर उभा करून दोरखंडाच्या सहाय्याने नदीपार करत होता. मात्र नदीच्या मध्यभागी गेल्यानंतर हणमंत शेंबडे यांचा हातातून कासरा निसटला आणि तो नदीच्या पाण्यात वाहत गेला. मुकबधीर आईच्या समोर मुलगा वाहून गेला. त्या माऊलीला साधे ओरडता सुध्दा आले नाही. मुलगा पाण्यात वाहत गेल्याचे त्या आईनं घरी पळत जाऊन वडील मोहन शेंबडे व इतरांना सांगितले.

# जुनी पेन्शन योजना आम्ही लागू करू; शिर्डीत उद्धव ठाकरेंचे कर्मचाऱ्यांना आश्वासन

प्रतिनिधी
■ शिर्डी



माजी मुख्यमंत्री व शिवसेना उद्धव ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी जुनी पेन्शन योजनेच्या महाअधिवेशनात कर्मचाऱ्यांना संबोधित करताना आंदोलकांशी संवाद साधला आहे. यावेळी बोलताना त्यांनी या आंदोलक कर्मचाऱ्यांना विनंती केली की उपोषण करू नका, या सरकारवर उपोषणाची वेळ आणा, असे आव्हान केले. तसेच जुनी पेन्शन योजना आम्ही लागू करू, तुम्ही फक्त आम्हाला निवडून आणा, असेही आवाहन केले आहे.

उद्धव ठाकरे म्हणाले, ही जुनी पेन्शन योजना आपण सगळे मिळून खेचून आणू. तुमची एकजूट पाहता हे सरकार गेल्यातच जमा आहे. आमचे सरकार आणा, जुनी पेन्शन योजना अंमलात आणतो. सरकारच्या योजना राबवणारे तुम्ही आहात, लोकांच्या घराघरात जाऊन तुम्ही सरकारचे काम करता, तरी योजनेच्या पोस्टरवर फोटो या दाढीवाल्यांचे लागतात, असे म्हणत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर निशाणा साधला आहे.

महायुती सरकारच्या लाडकी बहीण योजनेवर बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले, ज्यांना बहीण आहे हे माहीत नव्हेत, निवडणुका जवळ आल्या की यांनी लाडकी बहीण योजना काढली, असा टोला त्यांनी लगावला आहे. कोरोनाच्या काळात तुम्ही सगळ्यांनी जिवावर उदार होऊन कामे केलीत म्हणून महाराष्ट्र वाचला आहे. तरी सुद्धा हे सरकार तुम्हाला तुमच्या हक्काची पेन्शन देत नाही. आपले सरकार पुन्हा आणा, आम्ही तुम्हाला तुमच्या हक्काची पेन्शन मिळवून देऊ, असे आश्वासन उद्धव ठाकरे यांनी दिले आहे.

उद्धव ठाकरे म्हणाले, मला कोणीही सत्तेतून काढू शकत नाही. बाळासाहेब ठाकरे यांचेकडे कुठे सत्ता होती, पण तरी त्यांच्याकडे सत्ता होती, जनतेची सत्ता होती. तशीच ही जनताच माझी सत्ता आहे, असे उद्धव ठाकरे म्हणाले. पुढे ते म्हणाले, कर्मचाऱ्यांनी साथ दिली नाही तर सरकारच चालू शकत नाही. तुम्ही घरोघरी जाऊन सरकारच्या योजना पोहोचवण्याचे काम करता मात्र श्रेय हे घेतात आणि म्हणतात सरकार आपल्या दारी, अशी टीका उद्धव ठाकरे यांनी केली आहे.

दरम्यान, आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय नेत्यांचे महाराष्ट्रभरात दौरे सुरु झाले आहेत. मागील महिन्यात युवसेना प्रमुख आदित्य ठाकरे यांनी छत्रपती संभाजीनगरचा दौरा केला होता. यानंतर आता शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे शिर्डी आणि छत्रपती संभाजीनगरमध्ये सभा घेणार आहेत.

# कृषी अर्थव्यवस्थेला अव्हेरून 'आत्मनिर्भर भारत' होणार नाही

## केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे प्रतिपादन



प्रतिनिधी
■ पुणे

आजही सुमारे ६५ टक्के नागरिक ग्रामीण भागात राहतात आणि कृषी अर्थव्यवस्था हा त्यांच्या उदरनिर्वाहाचा मुख्य स्रोत आहे. संशोधन आणि तंत्रज्ञानाची जोड देत कृषी अर्थव्यवस्थेला आपणास पाठबळ द्यावेच लागेल कारण कृषी अर्थव्यवस्थेला अव्हेरून आत्मनिर्भर भारताचे स्वप्न पूर्ण होणार नाही, असे मत केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केले.

सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ (सीओईपी टेक) आणि सीओईपी माजी विद्यार्थी संघटना यांच्यावतीने देण्यात येणारा 'सीओईपी अभिमान पुरस्कार' यंदा देश आणि परदेशातील तंत्रज्ञान क्षेत्रात मोलाचे योगदान देणाऱ्या माजी विद्यार्थ्यांना भारतरत्न सर एम. विश्वेश्वरय्या यांच्या जयंतीनिमित्त साजरा होत असलेल्या अभियंतादिनी केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते.

सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठाच्या मुख्य सभागृहात झालेल्या या कार्यक्रम प्रसंगी व्यासपीठावर राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, सीओईपी माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष भरत गीते, नियामक मंडळाचे अध्यक्ष ज्येष्ठ उद्योजक डॉ. प्रमोद चौधरी, सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. सुनील भिरूड, कुलसचिव डॉ. दयाराम सोनवणे, मानद सचिव डॉ. सुजीत परदेशी आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी यंदाचा सीओईपी जीवनगौरव पुरस्कार अहमदाबाद येथील भगवती स्फेरोकास्ट प्रा. लि. चे अध्यक्ष आणि कार्यकारी संचालक ज्येष्ठ उद्योगपती पी.एन. भगवती यांच्यावतीने लोहिया यांनी स्वीकारला. तर यंदाच्या सीओईपी अभिमान पुरस्काराने अभिनेता वैभव तत्ववादी, राज्याच्या पर्यावरण विभागाचे मुख्य सचिव आयएएस अधिकारी प्रवीण दराडे, सिक्कीमचे कॅबिनेट मंत्री राजू बसनेत, अमेरिकेतील 'जे.पी. मॉर्गन चेस'च्या कार्यकारी संचालक मोनिका पानपलिया आणि अमेरिकेतील टेस्ला मोटर्सचे वरिष्ठ संचालक हृषीकेश सागर यांना सन्मानित करण्यात आले.

नितीन गडकरी म्हणाले की, शेतकरी हा केवळ अन्नधान्याचा उत्पादक राहिलेला नसून तो ऊर्जादाताच्या भूमिकेतही शिरला आहे. कृषी क्षेत्रात देखील अनंत संधी दडलेल्या असून आपली इंधनाची सध्याची आणि भविष्यातली देखील गरज भागवण्याची क्षमता कृषी उद्योगात आहे. ग्रामीण भागाच्या गरजा आणि गरजवंतांचा मानवी चेहरा केंद्रस्थानी ठेवून संशोधन करीत तंत्रज्ञानाचा विकास झाल्यास ग्रामीण भागातून येणारे लोंढे गावातच थांबतील आणि त्यांना स्थानिक पातळीवरच रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध होतील. कृषी आणि ग्रामीण भागाचा जीडीपी केवळ पंधरा ते सोळा टक्के आहे, ते योगदान वाढण्यासाठी अनेक पर्याय उपलब्ध करून देणे आपल्याला शक्य आहे. कृषी उद्योगाला ऊर्जा निर्मितीचाही पर्याय दिल्यास अधिक क्षमतेने प्रगती करता येईल, असा मला विश्वास आहे.

# पुणे फेस्टिव्हलला पुणेकरांचा उदंड प्रतिसाद

■ पुणे

विविधतेने नटलेल्या आपल्या देशात प्रत्येक राज्यातील नृत्यप्रकार हा त्या त्या भागातील संस्कृती, परंपरा यांचे दर्शन घडवीत असतो. पुण्याजवळील फुलगाव येथील 'ईश्वरपुरम्' संस्थेत वास्तव्यास असलेल्या नागालँडमधील नागा विद्यार्थ्यांनी नुकतेच आपल्या पारंपारिक बांबू नृत्याचे दर्शन पुणेकरांना घडविले. निमीत्त होते स्वारगेट येथील गणेश कला क्रीडा रंगमंच येथे सुरु असलेल्या ३६ व्या पुणे फेस्टिव्हलचे. यावेळी संस्थेच्या ३७ विद्यार्थ्यांनी नागालँड मधील नागा आदिवासी बांबू नृत्य सादर केले. शुभांगी मेहता आणि ३७ नागा कलाकार यांनी या नृत्याचे सादरीकरण केले.

२००२ साली कै. भय्याजी काणे यांच्या कामातून प्रेरणा घेऊन सामाजिक कार्यकर्ते कै. विकास भागवत यांनी आपल्या अन्य सहकाऱ्यांबरोबर 'ईश्वरपुरम्' या संस्थेची स्थापना केली. भारताच्या ईशान्येकडील सात राज्यांना मूळभूमी भारताशी सांस्कृतिकदृष्ट्या जोडण्यासाठी अगदी लहान वयातच विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी पुण्यात आणण्याचा विचार करून या संस्थेची स्थापना करण्यात आली.

नगर रस्त्यावरील फुलगांव येथील स्थानिक शेतकरी असलेले तानाजी खेसे यांनी आपली पत्नी कै. लक्ष्मीबाई खेसे यांचे स्मरणार्थ दोन एकर जागा संस्थेला दान केली आणि नागालँडचे माजी राज्यपाल कै. पद्मनाभजी आचार्य यांच्या सहकार्यातून आज नागालँड येथील २० तर अरूणाचल प्रदेश येथील २० विद्यार्थी या वसतीगृहात राहतात व शेजारी असलेल्या नेताजी सुभाषचंद्र बोस सैनिकी साळा व लोकसेवा इंग्रजी माध्यमाच्या शाळेत शिक्षण देखील घेतात.

# कष्टाने दीड हजार रुपयांचे दहा हजार करणाऱ्या लाडक्या बहिणीचे मुख्यमंत्र्यांनी केले कौतुक

प्रतिनिधी
■ मुंबई

शासनाच्या दीड हजारांच्या मदतीत काय होऊ शकते, अशी शंका उपस्थित करणाऱ्यांना प्रणाली बारड या लाडक्या बहिणीने चोख उत्तर दिले आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेत मिळालेल्या दीड हजार रुपयांच्या भांडवलावर तब्बल दहा हजारांची कमाई बरड यांनी केली. वर्षा निवासस्थानी बोलावून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या लाडक्या बहिणीचे विशेष कौतुक केले.

काळाचौकी इथं राहणाऱ्या प्रणाली बारड यांनी गणेशोत्सवातील समय सूचकता दाखवून आरतीवेळी वापरात येणाऱ्या हस्त घुंगराचा व्यवसाय केला. समाजमाध्यमवरही त्याची त्यांनी जाहिरात केली. केवळ दीड हजाराच्या भांडवलात त्यांनी मोजक्या दिवसात दहा हजार रुपयांची कमाई केली.

प्रणाली कृष्णा बारड यांनी शुक्रवारी वर्षा निवासस्थानी येऊन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली. यावेळी त्यांच्यासोबत सहकारी साईराज परब हे देखील होते. बारड यावेळी म्हणाल्या की, मुख्यमंत्री साहेबानी स्वतः माझ्याजवळील घुंगरू विकत घेऊन माझे मनोबल वाढवले आहे.

तर मुख्यमंत्री म्हणाले, लाडक्या बहिणींना माझे सांगणे आहे की, मिळालेल्या पैश्यांचा सदुपयोग करून आपली मिळकत वाढवता येऊ शकते. तसेच आपल्यातली कला आणि कौशल्य यासह समाजमाध्यमाची साथ घेतली तर नक्कीच एखादा व्यवसाय यशस्वी होऊ शकतो. महिलांच्या सक्षमीकरणासाठी शासन चांगली पावले उचलत असून यामुळे महिलांना आधार मिळालाय.

यावेळी मुख्यमंत्री शिंदे यांनी प्रणालीने दाखवलेल्या कष्टाचे आणि समय सूचकतेचे तोंड भरून कौतुक केले. महिलांनी अशाचप्रकारे शासनाने दिलेल्या मदतीचा सदुपयोग करून एखादा छोटा व्यवसाय करण्यासाठी केला तर अनेक महिलांचे आयुष्य बदलू शकेल, असे मत यावेळी मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केले.

मुख्यमंत्री माझी लाडकी योजना महायुती सरकारची अत्यंत महत्त्वाकांक्षी योजना ठरली आहे. या योजनेतून लाडक्या बहिणींना मिळालेल्या पैशातून अनेक महिलांना घरगुती अडचणी सोडवण्यास मदत झाली आहे. तसेच कित्येक महिलांनी आपले छोटे छोटे भांडवल तयार करून संसाराला हातभार लावणाऱ्या घरगुती व्यवसायाची मुहूर्त मेढ रोवली असल्याचे दिसून येत आहे. काही जण असे म्हणत होते की 1500 रुपयात नक्की काय होऊ शकते त्याचे उत्तर प्रणाली बारड या लाडक्या बहिणीने दिले असल्याचे मत यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले आहे

## अखिल भारतीय खिलाफत समितीच्या आयोजित

# मोहम्मद पैगंबर जयंती कार्यक्रमाला खा. चंद्रशेखर आझाद राहणार उपस्थित

प्रतिनिधी
■ मुंबई

पैगंबर मोहम्मद (PBUH) यांचा जन्मदिवस बुधवार, 18 सप्टेंबर 2024 रोजी ऑल इंडिया खिलाफत कमिटीतर्फे आयोजित करण्यात आला आहे. खिलाफत हाऊस, लव्ह लेन, भायखळा येथे सीरत-उन-नबी या विषयावर विविध वक्ते बोलणार आहेत. समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून नगीना (यू.पी.) चे खासदार आणि आझाद समाज पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अँड चंद्रशेखर आझाद उपस्थित राहणार आहेत. खासदार झाल्यानंतर आझाद प्रथमच मुंबईत येत आहेत. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अखिल भारतीय खिलाफत समितीचे अध्यक्ष सरफराज आरजू हे असतील. हा कार्यक्रम डिजिटल आणि सोशल मीडियावर लाईव्ह दाखवण्यात येणार आहे.

सार्वजनिक सभेनंतर अखिल भारतीय खिलाफत समितीच्या वतीने दुपारी ईद-ए-मिलाद मिरवणुकीला खिलाफत हाऊस, भायखळा येथून सुरू होईल आणि विविध मुस्लीम वस्त्यांमधून आणि रस्त्यांवरून (पारंपारिक मार्ग) मदनपुरा, नागपाडा जंक्शन, डंकन रोड, मौलाना शौकत अली रोड, जे.जे. जंक्शन, भेंडी बाजार, मोहम्मद अली रोड, क्रॉफर्ड मार्केट, अब्दुल रहमान स्ट्रीट, पायधोनी, जे.जे. जंक्शन, दिमतीमकर रोड आणि मस्तान तलाव टाकी येथे समाप्त होईल.या मिरवणुकीचे नेतृत्व हजरत अल्लामा मौलाना सईद वली अश्रफ अशरफी अल जिलानी, सज्जादा नशीन आस्ताने आलिया हुजूर अशरफुल औलिया, शुद्ध कामगार शरीफ, फैजाबाद (यू. पी.) करणार आहेत. अमीन पटेल (आमदार), मधु चव्हाण (माजी आमदार), वारिस पठाण (माजी आमदार), जावेद जुनेजा (माजी नगरसेवक). मनोज जामसुतकर (माजी नगरसेवक) आणि इतर स्थानिक आमदार आणि एम. पी. देखील मिरवणुकीत सहभागी होणार आहेत.असे अध्यक्ष सरफराज आरजू यांनी कळविले आहे.

# महापालिकेच्यावतीने गरोदर मातेस मोफत रुग्णवाहिकेसाठी लवकरच टोल फ्री नंबर

प्रतिनिधी
■ पनवेल

नुकत्याच घडलेल्या गरोदर मातेस संदर्भ सेवेवेळी १०८ रुग्णवाहिका न मिळाल्याच्या घटनेची पुनरावृत्ती होऊ नये व जनसामान्यास महापालिका देत असलेल्या सोयीसुविधांची माहीती मिळणेसाठी आयुक्त श्री. मंगेश चितळे यांच्या आदेशानुसार महानगरपालिका क्षेत्रातील गरोदर मातेस उपलब्ध मोफत रुग्णवाहिका सेवेचे टोल फ्री नंबर लवकरात लवकर कार्यान्वित होणार आहेत.

आजपर्यंत महापालिकेच्यावतीने गरोदर मातेसाठी निशुल्क उपलब्ध असलेल्या रुग्णवाहिकेने 289 प्रसुती रुग्णांसाठी अगदी मुंबई पर्यंत संदर्भ सेवा दिली आहे. नुकत्याच घडलेल्या घटनेतील प्रसुती रूग्ण परदेसी गौंड यांना न मिळालेल्या संदर्भ सेवेबाबत चौकशी समिती गठीत करण्यात आली होती. या समितीच्या प्राथमिक अहवालानुसार प्रसुती पूर्व आशा सेविका व आरोग्य सेविकांमार्फत वारंवार भेट देऊन माता बाल संगोपन कार्ड वरती रुग्णवाहिकेचे १०८ व १०२ नंबर तसेच आशा सेविकेचा मोबाईल क्रमांक देण्यात आला होता. गरोदर मातेच्या सर्व चाचण्या, सोनोग्राफी महापालिकेमार्फत निशुल्क करून देण्यात आल्या होत्या.

परंतु सदर गरोदर मातेस दिलेल्या तारखे आधीच प्रसुती वेदना सुरू झाल्या व त्यांना खाजगी डॉक्टरांनी १०८ क्रमांवर संपर्क साधून उपजिल्हा रुग्णालय येथे जाण्याचे सुचवले.त्यानूसार नातेवाईकांनी १०८ टोल फ्री क्रमांकावरील रुग्णवाहिकेस कळविले ,मात्र पुन्हा १०८ क्रमांकाच्या रुग्णवाहिकेचा व रुग्ण नातेवाईक यांचेमध्ये फोनद्वारे योग्य तो संपर्क झाला नाही. तसेच नातेवाईकाने १०२, उपजिल्हा रुग्णालय , महानगरपालिकेच्या रुग्णावाहिकेसाठी कोणताही संपर्क साधला नाही. तोपर्यंत उशीर होत असल्याने नातेवाईकांनी उपलब्ध वाहनातून रुग्णास उपजिल्हा रुग्णालय, पनवेल येथे प्रसुतीसाठी दाखल केले. उपजिल्हा रुग्णालयात रुग्णांची नैसर्गिक प्रसुती होऊन बाळास जन्म दिला.दिनांक १२ सप्टेंबर रोजी रुग्णालयातुन डिस्चार्ज देवुन घरी मातेस घरी सोडण्यात आले.

रुग्णवाहिकेच्या १०८ क्रमांक आस्थापनेस याबाबतचा संपूर्ण खुलासा सादर करण्याबाबत चौकशी समितीने सुचित केले आहे. भविष्यात अशा संदर्भ सेवे पासून रुग्णांनी वंचित राहू नये यासाठी पालिकेच्या रूग्णवाहिकेसाठी टोल फ्री नंबर लवकरच सुरू करण्यात येणार आहे. टोल फ्री नंबर आल्यानंतर यास व्यापक प्रसिद्धी देण्याच्या सूचना आयुक्तांनी दिल्या आहेत.

**गरोदर मातांसाठी निशुल्क रुग्णवाहिका सेवा**
१.डॉ.रेहाना मुजावर, माता बाल संगोपन अधिकारी, मोबाईल क्रमांक ९३७२८८७१२३०
२.वाहन चालकचे नाव : नरेंद्र सोनवणे मोबाईल क्रमांक ७०२१५७२९१६, वेळ सकाळी ७.०० ते रात्री ७.००
३.वाहन चालकचे नाव : धर्मा गवळी मोबाईल क्रमांक ९५९४७४६५२७, वेळ रात्री ७.०० ते सकाळी ७.००

# घरात घुसून मायलेकीला मारहाण

प्रतिनिधी
■ छत्रपती संभाजीनगर

मालमत्तेच्या वादातून पती पत्नीने घरात घुसून माय लेकीला अश्लील शिवीगाळ करीत मारहाण केल्याची घटना शनिवारी सकाळी न्यू शांतीनिकेतन मागासवर्गीय हाऊसिंग सोसायटी भागात घडली. महिलेच्या फिर्यादीवरून पती-पत्नीविरुद्ध जवाहरनगर पोलिस ठाण्यात शिवीगाळ करून प्राणघातक हल्ला करणे आणि इतर कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अजय अनिल अंबेकर, वंदना अजय अंबेकर (रा. पुंडलिकनगर) अशी या आरोपींची नावे आहेत. याबाबत महिलेने फिर्याद दिली की, गारखेडा परिसरातील न्यू शांतीनिकेतन मागासवर्गीय हाऊसिंग सोसायटीच्या प्लॉट क्रमांक ५४ येथे राहते. या प्लॉटच्या तळमजल्यात अजय अनिल अंबेकर याने अनिधिकृत ताबा मिळवून हॉटेल चालवितो. या अनाधिकृत ताब्याबाबत दिवानी न्यायालयात दावा दाखल केलेला आहे. १४ सप्टेंबर रोजी त्या किचनमध्ये स्वयंपाक करीत असताना अजय अंबेकर आणि वंदना अंबेकर हे दोघेजण वरच्या मजल्यावर येताना दिसून आले.

यावेळी अंबेकर याने पत्नीला सांगितले की, हिचे केस धरून घराबाहेर काढ. यानंतर वंदना अंबकेर हिने घरात घुसून धक्काबुक्की करीत घराबाहेर काढण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी माझ्या मुलीने शिवीगाळ आणि मारहाण का करता अशी विचारणा केली. त्यावेळी अजय अंबेकर याने घरासमोरील कुंड्यांची तोडफोड केली. त्यातील एक कुंडी माझ्या डोक्यात मारण्याचा प्रयत्न केला असता मुलीने कुंडी धरली. मुलीने या दोघांना खाली उतरण्यास सांगितले असता अजय अंबेकर याने मुलीला मारहाण केली. एवढेच नाही तर अश्लील शिवीगाळ केली. जाताना घरासमोरील स्कुटी पाडून जिवे मारण्याची धमकी दिली. हा सर्व प्रकार घरकाम करणारी महिला अनिता पवार आणि काकासाहेब पवार यांच्यासमोर घडला. महिलेच्या फिर्यादीवरून अजय अंबेकर, वंदना अंबेकर या दोघांविरुद्ध अश्लील शिवीगाळ, प्राणघातक हल्ला आणि इतर कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोहेकॉ अनिता उपाडे या करीत आहेत.

# 'स्वच्छता ही सेवा' अभियानात 'एक पेड माँ के नाम' उपक्रमाव्दारे 300 हून अधिक देशी झाडांचे वृक्षारोपण

प्रतिनिधी
■ नवी मुंबई

केंद्र सरकारच्या 'स्वच्छ भारत मिशन'च्या वतीने प्राप्त निर्देशानुसार 14 सप्टेंबर ते 1 ऑक्टोबर 2024 या कालावधीत 'स्वच्छता ही सेवा (SHS) पंधरवडा' साजरा करण्यात येत असून या अंतर्गत 'स्वभाव स्वच्छता, संस्कार स्वच्छता' अभियान राबविण्यात येत आहे. यामध्ये महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत असून त्यामधील 'एक पेड माँ के नाम' हा एक अभिनव उपक्रम सेक्टर 36, नेरूळ येथील गणपतशेठ तांडेल मैदानाजवळील उद्यानात संपन्न झाला.



याप्रसंगी विधानसभा सदस्य आ.गणेश नाईक, महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे, अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार, माजी आमदार संदीप नाईक, प्रशासन विभागाचे उपआयुक्त शरद पवार, उद्यान विभागाचे उपआयुक्त दिलीप नेरकर, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे परिमंडळ 1 उपआयुक्त डॉ.अजय गडदे व परिमंडळ 2 उपआयुक्त डॉ.संतोष वारूळे, अति. शहर अभियंता अरविंद शिंदे, नेरूळ विभागाचे सहा.आयुक्त तथा विभाग अधिकारी डॉ.अमोल पालवे, बेलापूर विभागाचे सहा. आयुक्त तथा विभाग अधिकारी शशिकांत तांडेल, माजी नगरसेवक रविंद्र इथापे, स्वच्छ नवी मुंबई मिशनच्या वुमेन आयकॉन श्रीम.रिचा समित आणि इतर उपस्थितांच्या शुभहस्ते वृक्षारोपण करण्यात आले. विशेष म्हणजे या उपक्रमात लेट्स सेलिब्रेट फिटनेस संस्थेच्या सहयोगातून 167 तृतीयपंथी नागरिकांनी उत्साहाने सहभागी होत वृक्षारोपण केले.

आपल्या वडिलधा-यांच्या सन्मानार्थ झाड लावण्याची आपली परंपरा आहे, त्यानुसार मा.पंतप्रधान महोदयांच्या संकल्पनेतून 'एक पेड माँ के नाम' हा उपक्रम राबविला जात असल्याचा आनंद व्यक्त करीत आ.गणेश नाईक यांनी नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने शिक्षण, आरोग्य, पाणीपुरवठा, स्वच्छता अशा विविध क्षेत्रांप्रमाणेच वृक्षारोपणातून पर्यावरणासाठीही लौकिकाला साजेसे काम होत असल्याबद्दल आयुक्त व सर्व सहकारी, अधिकारी यांचे कौतुक केले. सध्याच्या काळात पर्यावरणाचा समतोल राखणे महत्वाचे असल्याचे सांगत नवी मुंबई महानगरपालिका त्यादृष्टीने समाजातील सर्व घटकांना सोबत घेऊन काम करीत असल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.

# महिला प्रवाशांच्या सुरक्षेबाबत जनजागृती

## लोहमार्ग पोलिसांचा 'खाकीतील सखी' उपक्रम

प्रतिनिधी
■ मुंबई

कम्युटिंग पोलिसिंग अंतर्गत वडाळा रेल्वे पोलिस ठाणे कार्यक्षेत्रातील वडाळा रेल्वे स्थानक फलाट क्र. एकवरील महिला राखीव डब्याजवळ महिलांच्या सुरक्षेच्या अनुषंगाने 'खाकीतील सखी' या संकल्पनेबाबत शुक्रवारी (ता. १३) मार्गदर्शन करण्यात आले. हा उपक्रम वडाळा रेल्वे पोलिस ठाण्याच्या वरिष्ठ पोलिस निरीक्षक स्मिता ढाकणे यांच्या नेतृत्वाखाली राबवण्यात आला. पोलिस उपनिरीक्षक मुकुंदराव देशमुख यांनी या वेळी मार्गदर्शन केले.

मोबाईल फोन चोरी, किमती व मौल्यवान वस्तूंची चोरी या गुन्ह्यांबाबत उपस्थित रेल्वे प्रवासी, महिला प्रवाशांचे प्रबोधन करण्यात आले. महिला प्रवाशांनी महिलांसाठी राखीव असलेल्या डब्यातून प्रवास करावा, एकटे राखीव डब्यातून प्रवास करताना सुरक्षा कर्मचारी डब्यामध्ये आहे याची खात्री करावी, सुरक्षा कर्मचारी नसल्यास प्रवासी असलेल्या डब्यातून प्रवास करावा, रेल्वे स्थानक अथवा रेल्वे प्रवासात कोणत्याही प्रकारची छेडछाडीची घटना हो असल्यास त्याची माहिती तत्काळ कर्तव्यावरील पोलिस अंमलदार अथवा रेल्वे पोलिस हेल्पलाईन क्र. १५१२ यांना कळवावी, लोकलमध्ये चढताना उतरताना व प्रवासादरम्यान आपला मोबाईल, बॅग व इतर मौल्यवान वस्तूंवर लक्ष द्यावे, लोकलमध्ये चढताना अथवा उतरताना आपल्याजवळील सँगबॅग पाठीवर न लावता समोर धरावी जेणेकरून चोरांना चोरी करण्याची संधी मिळणार नाही, दरवाजात लटकून प्रवास करू नये, अशा सूचना देण्यात आल्या. दरम्यान, 'खाकीतील सखी व कोटो ॲप'बाबत माहिती देऊन पत्रकांचे वाटप करून जनजागृती करण्यात आली. या वेळी 'खाकीतील सखी' पाच महिला पोलिस अंमलदार, ५० महिला प्रवाशांची उपस्थिती होती.

महिलांच्या सुरक्षेसाठी रात्रीच्या व पहाटेच्या वेळी महिलांसाठी राखीव डब्यांमध्ये रेल्वे पोलिसांकडून सुरक्षा कर्मचारी नेमण्यात आले आहेत. महिलांनी सुरक्षेच्यादृष्टीने या राखीव डब्यातून प्रवास करावा, असे आवाहन लोहमार्ग पोलिसांनी या वेळी केले.

# श्री गणरायाला निरोप देण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिका सज्ज






पर्यावरणपूरक श्री गणेशोत्सव साजरा करण्यासाठी यंदा विविध उपक्रम राबविणारी बृहन्मुंबई महानगरपालिका आता उद्या मंगळवारी १७ सप्टेंबर २०२४ रोजी अनंत चतुर्दशी दिनी होणाऱ्या श्री गणेशमूर्ती विसर्जनासाठी सज्ज झाली आहे. श्री गणेश विसर्जनासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून विशेष तयारी करण्यात आली आहे. विसर्जन सुलभ, निर्विघ्नपणे पार पडावे यासाठी महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पूर्व उपनगरे) डॉ. अमित सैनी यांच्या मार्गदर्शनाखाली बृहन्मुंबई महानगरपालिकेचे सुमारे १२ हजार अधिकारी - कर्मचारी, ७१ नियंत्रण कक्ष तसेच अन्य विविध सोयीसुविधांसह सुसज्ज आहेत. यंदा गणेश मूर्ती विसर्जनासाठी ६९ नैसर्गिक स्थळांसह एकूण २०४ कृत्रिम विसर्जनस्थळांवर व्यवस्था आहे, मुंबईतील श्री गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून यंदाही अधिकाधिक विविध सोयी-सुविधा पुरविण्यात आल्या आहेत.

श्रीगणेशोत्सव अंतर्गत स्वराज्य भूमी (गिरगांव चौपाटी) येथे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या डी विभागामार्फत भाविकांसाठी विविध नागरी सेवा-सुविधा उपलब्ध करुन दिल्या जातात. महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पूर्व उपनगरे) डॉ. अमित सैनी यांनी स्वराज्यभूमीला भेट देवून संपूर्ण व्यवस्थेची पाहणी केली व योग्य ते निर्देश दिले आहेत.

मुंबईतील घरगुती तसेच सार्वजनिक श्री गणेशमूर्तींच्या विसर्जनासाठी मागील दोन महिन्यांपासून पूर्वतयारी सुरू केली होती. श्रीगणेशमूर्ती विसर्जनासाठी येणारे वाहन चौपाटीवरील वाळूमध्ये अडकू नयेत व श्री मूर्तींचे विसर्जन सुरळीतपणे पार पडावे, याकरीता चौपाटीच्या किना-यांवर ४७८ स्टील प्लेट तसेच छोट्या गणेशमूर्तींचे विसर्जन करण्यासाठी विविध ठिकाणी ४३ जर्मन तराफ्यांचीही व्यवस्था करण्यात आली आहे. चौपाट्यांवर सुरक्षेच्या दृष्टीकोनातून ७६१ जीवरक्षकांसह ४८ मोटरबोटी तैनात केल्या आहेत. श्री गणेश मूर्ती विसर्जनापूर्वी भाविकांनी अर्पण केलेले हार, फुले इत्यादी निर्माल्य जमा करण्यासाठी १६३ निर्माल्य कलशांसह २७४ निर्माल्य वाहनांचीही सोय करण्यात आली आहे.

महानगरपालिकेच्या विविध खात्यातील कर्मचा-यांमध्ये योग्य तो समन्वय साधण्यासाठी मुख्य नियंत्रण कक्षासह प्रशासकीय विभागांच्या स्तरावर १९२ नियंत्रण कक्ष कार्यान्वित करण्यात आले आहेत. तर सुरक्षेच्या दृष्टीने ६६ निरीक्षण मनोरे उभारण्यात आले आहेत. विविध ठिकाणी ७२ स्वागत कक्ष तयार करण्यात आले आहेत. तर आरोग्य विभागाकडून ७५ प्रथमोपचार केंद्रांसह ६७ रुग्णवाहिका देखील सज्ज ठेवण्यात आल्या आहेत. प्रभावी प्रकाश योजनेसाठी 'बेस्ट' च्या सहकार्याने खांबांवर व उंच जागी सुमारे १,०९७ फ्लडलाईट आणि २७ सर्चलाईट लावले आहेत. विसर्जनासाठी येणाऱ्या नागरिकांच्या सोयीसाठी १२७ फिरती प्रसाधनगृहं सज्ज ठेवण्यात आली आहेत. त्याचबरोबर आपत्कालीन परिस्थितीचा सामना करण्यासाठी अग्निशमन दलाच्या सुसज्ज वाहनासहीत प्रशिक्षित मनुष्यबळ तैनात करण्यात आले आहेत.

**' 'क्यूआर कोड' स्कॅन करून मिळवा घराजवळील कृत्रिम तलावांची माहिती**

पर्यावरण पूरक श्री गणेशोत्सव साजरा व्हावा यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने यंदा तब्बल २०४ कृत्रिम तलाव तयार केले आहेत. 'क्यू आर कोड'द्वारे देखील भाविकांना, गणेश भक्तांना या कृत्रिम तलावांची माहिती मिळणार आहे. हा 'क्यू आर कोड' स्कॅन केल्यावर मुंबईतील कृत्रिम तलावांची माहिती आणि गुगल मॅप लिंक भाविकांना उपलब्ध होणार आहे. यामुळे मुंबईतील यंदाचा गणेशोत्सव अधिकाधिक पर्यावरणपूरक होण्यासाठी मदत होणार आहे. तसेच https://portal.mcgm.gov.in/irj/portal/anonymous/qlGanpatiDeQR या लिंकवरूनही कृत्रिम तलावांची माहिती मिळू शकेल.

**विसर्जनस्थळी काळजी घ्या**

अनंत चतुर्दशी दिनी सर्व विसर्जनस्थळी नागरिकांनी पावित्र्य व मांगल्य जपावे. उत्सवादरम्यान गर्दीच्या तसेच विसर्जनस्थळी जबाबदारीने आणि सतर्कतेने वागावे. बृहन्मुंबई महानगरपालिका आणि मुंबई पोलीस दलाद्वारे दिल्या जाणाऱ्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे, असे आवाहन पालिका प्रशासनाद्वारे करण्यात आले आहे.

**विसर्जनादरम्यान घ्यावयाची काळजी**

१.समुद्राच्या खोल पाण्यात जाण्याचा प्रयत्न करु नये.
२.मूर्ती विसर्जनाकरीता महानगरपालिकेमार्फत नेमलेल्या प्रशिक्षित मनुष्यबळाची मदत घ्यावी.
३.अंधार असणा-या ठिकाणी गणेशमूर्ती विसर्जनाकरीता जाणे टाळावे.
४.महानगरपालिकेने पोहण्याकरीता निषिद्ध केलेल्या क्षेत्रात जाण्याचा प्रयत्न करू नये.
५.समुद्रात किंवा तलावात कुणी बुडत असल्याचे निर्दशनास आल्यास त्वरित अग्निशमन दलाचे जवान, पोलिस किंवा जीवरक्षकांना कळवावे.
६.अफवा पसरवू नका किंवा कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नका.
७.भाविकांनी लहान मुलांची विशेष काळजी घ्यावी. त्यांना पाण्यात जाऊ देऊ नये.

**ओहोटीवेळी काळजी घ्या**

यंदा अनंत चतुर्दशी दिवशी (१७ सप्टेंबर २०२४) समुद्रात सकाळी ११.१४ वाजता ४.५४ मीटरची भरती, सायंकाळी ५.२२ वाजता ०.८६ मीटरची ओहोटी, रात्री ११.३४ वाजता ४.३९ मीटर उंचीची भरती असेल.

१८ सप्टेंबर २०२४ रोजी पहाटे ५.२७ मिनिटांनी ०.४८ मीटरची ओहोटी, सकाळी ११.३७ वाजता ४.७१ मीटरची भरती, सायंकाळी ५.४९ वाजता असेल. या भरती तसेच ओहोटीदरम्यान विसर्जनासाठी चौपाट्यांवर येणाऱ्या नागरिकांनी सतर्क राहावे, असे आवाहन बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

**मत्स्यदंशापासून बचाव करा**

ऑगस्ट ते ऑक्टोबर या कालावधीमध्ये मुंबई येथील समुद्राच्या किनारपट्टीवर 'ब्लू बटन जेलीफीश', 'स्टिंग रे' प्रजातीच्या माशांचा वावर अधिक दिसून येतो. या पार्श्वभूमीवर विसर्जनादरम्यान मत्स्यदंश होऊ नये, याची काळजी नागरिकांनी घेण्याचे आवाहन महानगरपालिका प्रशासनाकडून करण्यात आले आहे. मत्स्यदंशाची घटना घडल्यास चौपाटी परिसरात वैद्यकीय कक्ष सज्ज ठेवण्यात आला आहे. तसेच '१०८ रूग्णवाहिका' देखील तैनात करण्यात आली आहे.

**प्रशांत सपकाळे**
**उप आयुक्त (परिमंडळ २)**
**तथा गणेशोत्सव समन्वयक**

# मुलुंड येथे नवसाच्या गणपतीचा 'शतक महोत्सव'



एके काळी थर्माकॉल शिटवर बारीक नक्षीकाम करून गणपतीची सजावट करणाऱ्या म्हात्रे बंधू यांची विलेपार्ल्यात नव्हे तर महाराष्ट्र आणि गुजरात राज्यातही त्यांची ख्याती असायची. त्यांची कोरीव, सुक्ष्म नक्षीकाम केलेली सजावट पाहण्यासाठी पहाटे ६.३० पासून रात्री १ ते २ वाजेपर्यंत सतत गणेश भक्तांचा आणि सजावट पाहणाऱ्यांची वरदळ सुरू असे. सन १९२४ साली त्यांचे आजोबा म्हणजेच पांडूरंग गणेश म्हात्रे यांना अर्धांगवायूचा झटका आला होता. त्यावेळी त्यांनी श्रीगणेशजींना साकडे घालून नवस केला होता की, माझ्या अर्धांग वायुचा आजार तु जर बरा केलास तर मी तुझी सेवा अखंड चालू ठेवीन आणि त्याचा आजार बरा झाला. तेव्हापासून म्हात्रे घराण्यांत गणेशोत्सव सुरू झाला. प्रारंभाच्या काळात चुन्याचे रंग वापरून पडद्यावर रंगछटा होत असे त्यानंतर चायनीज निमित छोट्या-छोट्या बाहुल्या तसेच बाटलीत चाफ्यांची फुले करून सजावट केली जात होती. कालांतराने फिरते रंगीत चक्र असायचे.

सन १९७१ ते १९७३ या कालावधीत पॅकिंगसाठी लागणारा थर्माकॉल पेपर आणून त्यावर नक्षीकाम करून सजावट करण्यात येत होती. मात्र १९७४ मध्ये थर्माकॉलच्या सहाय्याने केलेला एक सुंदर रथ गणेश भक्तांचे लक्ष वेधून गेला. त्यासाठी तत्कालीन मंत्री श्री. सुशीलकुमार शिंदे यांनी म्हात्रे बंधुच्या गणेश दर्शनाप्रित्यर्थ भेट दिली होती. शिंदेसाहेबांना सजावट व मुर्ती इतकी आवडली की त्यांनी १९७५ सालापासून म्हात्रे बंधुंना त्यांच्या घरच्या गणपती सजावट करण्यास सांगितले. गानकोकीळा लता मंगेशकर यांच्या घरीही दोन वर्ष म्हात्रे बंधुंना सजावट करण्याचे भाग्य लाभले आहेत.

सन १९७५ साली ८ फुट उंच अशी शंकराची पिंड तसेच शिवाजी महाराजांची प्रतिमा थर्माकॉल पेपरच्या सहाय्याने साकारली होती. सन १९७६ मध्ये विकास कार्याच्या इंदिरा गांधी यांच्या २० कलमी कार्यक्रमाच्या सर्व योजनांची प्रतिकृती उभारण्यात आली होती. त्यासोबत सुप्रसिद्ध रांगोळीकार रघवीर मुळगांवकर यांच्या रांगोळी प्रित्यर्थ हरिहर भेटीची प्रौराणिक कथेवर आधारीत चित्राचे थर्माकॉल पेपरच्या सहाय्याने रेखाटन केले होते. सन १९८४ मध्ये गणेशोत्सवाला ६० वर्षे पुर्ण झाली म्हणून प्रचंड हिरा केला होता. सन १९९७ साली आंतरराष्ट्रीय बालक वर्ष निमित्त सजावट केली होती.

आपल्या चित्ताकर्षक सजावटींसाठी पार्लेकरांच्या कौतुकाचा विषय असलेल्या म्हात्रे कुटुंबाच्या या गणपतीची दखल अनेक मोठमोठ्या दिग्दजांनी घेतली आहे. कलेचा वारसा लाभलेला म्हात्रे कुटुंबातील यंदाची पाचवी पिढीही तेवढ्याच जोमाने जोपासत आहे. यंदा त्यांनी अयोध्येतील श्रीराम मंदिराच्या गाभाऱ्यांनी प्रतिकृती उभारली आहे.आम्ही सर्व भाऊ गणपतीच्या दहा-बारा दिवसापासूनच सजावटीला लागायचो. किशोर आणि चंद्रकात, हे दोघे माझे भाऊ. सगळ्यात धाकटा किशोर यांच्या संकल्पनेतून आम्ही विविध देखावे किंवा सजावट करायचो असे नरेंद्र म्हात्रे यांनी यावेळी आमच्या प्रतिनिधीला सांगितले. कलेचे कोणतेही अधिकृत शिक्षण न घेताही हे सर्वच बंधू भन्नाट कलाकुसर केलेले देखावे तयार करतात.

२००७ मध्ये पार्ल्यांतील ती टुमदार दुमजली इमारत तोडली आणि म्हात्रे कुटुंबीय इतस्ततः विखुरले. गणपती नरेंद्र म्हात्रे यांच्यासह मुलुंडमध्ये ११०१, सेलेस्टिया बिल्डींग, मराठा मंदिर हॉलजवळ, ९० फूट रोड, मुलुंड (पूर्व), मुंबई येथे आला. तेव्हापासून नरेंद्र म्हात्रे यांचे बंधू, भगिनी, त्यांची मुले, नातवंडे असे सगळे एकत्र येऊन मुलुंडला हा गणपती साजरा करतात. यंदा शतक महोत्सवानिमित्त कुटुंबातील १५ जणांनी मिळून अयोध्येतील श्रीराम मंदिरातील गाभाऱ्याचा देखावा उभारला आहे. किशोर, चंद्रकांत, तन्मय, अरूण अनिश, पियुष, रिद्धी, कोमल, कुणाल, निहित, भुषण, गौरी, विभावरी, रश्मीन, प्रणव, गरीमा अशा म्हात्रे कुटुंबातील सदस्यांचे हात सजावटीला लागले आहेत. त्याशिवाय नरेंद्र म्हात्रे यांचा धाकटा मुलगा पीयुष दरवर्षी श्री गणेशाची मुर्ती विविध खड्यांनी सजवतो. यंदाही त्याने मूर्तीवरील मुकूट विविध खड्यांनी साकारला आहे.

**नरेंद्र रघुनाथ म्हात्रे**

# राहुल गांधी यांची नवीन आरक्षण भूमिका



"काँगेस पक्ष आरक्षण व्यवस्था खतम करण्याचा विचार तेव्हाच करेल, जेव्हा या देशातील सर्वच समाज घटकांना समान संधी मिळालेली असेल, पण आज देशात तशी परिस्थिती नाही,. इतकी स्पष्ट भुमिका राहुल गांधी यांनी अमेरिकेत एका विद्यार्थ्याच्या प्रश्नाला उत्तर देताना घेतली. राहुल गांधी यांच्या या भूमिकेने आरक्षण विरोधकांच्या जीभेला लगाम घातला आहे. सर्वांना समान संधी उपलब्ध होणार नाही, तोवर आरक्षण व्यवस्था लागुच राहणार, या राहुल गांधींच्या भूमिकेचा स्पष्ट अर्थ आहे. ते इथेच थांबले नाहीत, तर त्यांनी सर्वच क्षेत्राचे पदर उलगडत देशातील दलित, आदिवासी, ओबीसी व अल्पसंख्याक समाजाच्या भागीदारीबाबतही चिंता व्यक्त केली. विकासाच्या प्रक्रियेत या समाज घटकांची परवड झाल्याचे चित्र ही त्यांनी या दौऱ्यात जगाच्या समोर आकडेवारी सह आणले. द्रोणाचार्य व एकलव्य ही त्यांनी जगासमोर उभे केले. तर अनेक उदाहरणे देत " सबका साथ, सबका विकास" या मोदीच्या जुमल्यातील हवाच त्यांनी विदेशी धरतीवर काढून तिच्या ही चिंध्या केल्या. यामुळे संघ, भाजप व अंधभक्तांचा तडफडात होणे आपण समजू शकतो. पण तो भाजपच्या बी टीमचा ही होत आहे, तो का ? हे समजत नाही. मालकासाठी इतकी जी हुजरी अन् ती ही भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव घेत. खूप कठीण आहे.

आजपासून एक शतकापूर्वी अथवा ९ दशकापूर्वी गोलमेज परिषद व अन्य मार्गाने संधी मिळताच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दलित, शूद्र अतिशुद्राची ब्राह्मणी व्यवस्थेने केलेली दयनीय अवस्था जगासमोर मांडली. राहुल गांधी आज देशात व विदेशात ही तेच करीत आहेत. मग भाजपची बी टीम म्हणून काम करणाऱ्या तथाकथित आंबेडकरवादी पक्ष व संघटनांच्या नेत्यांना राहुल गांधींच्या या भूमिकाबाबत इतका आक्षेप का आहे ? तर यांचे उत्तर आहे, हे पक्ष एक तर भाजपसोबत आहेत, अथवा मतं विभाजनाचे राजकारण करीत ते भाजपला सहकार्य करीत आहेत. अन् अशा साऱ्या परिस्थितीत ही राहुल गांधी त्यांना कुठलाच स्पेसच मिळू देताना दिसत नाही. त्यामुळे त्यांचे तडफडणे साहजिकच आहे. " नफरत के बजार में मोहब्बत की दुकान" खोलण्याचा जसा ते प्रयत्न करीत आहेत. तसाच प्रयत्न ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने दुकानदारी करणाऱ्यांचा बाजार उठविण्याचे काम ही करीत आहेत. म्हणुन ते राहुल गांधींवर इतके चिडत आहेत. नफरत करीत आहेत.

राहुल गांधी यांनी आरक्षण व्यवस्था संपविण्याचे विधान करुन काँगेस आरक्षण विरोधी आहे, हेच दाखवून दिले, अशी आवई बसपा, वंचित व अन्य काही आंबेडकरवादी विचारांच्या पक्ष, संघटना व नेत्यांनी उठविली आहे. भाजपचा फायदा व इंडिया आघाडीचे नुकसान करण्यासाठीं त्यांनी ही आवई उठविली आहे. हे देशातील जनतेला कळत आहे. त्यामुळे त्यांनी राहुल गांधी व इंडिया आघाडीच्या विरोधात संविधान अन् आरक्षणाच्या मुद्द्यावरून किती ही आकडतांडव केले तरी त्याचा काहीच फायदा होणार नाही. पण संघ, भाजपची सुपारी घेतल्याने ध चा मा करून राहुल गांधींना बदनाम करण्याचा प्रयत्न हे करीत राहणारच. यात काही शंका नाही.

राहुल गांधी आरक्षण विरोधी आहेत, अशी विधाने गेल्या दोन दिवसात संघ व भाजपच्या अनेक नेत्यांनी केली आहेत. यामध्ये तडीपारचा ही समावेश आहे. पण आरक्षणाच्या मुद्द्यावरून समाजवाद्यांची केंद्र व राज्यातील अनेक सरकारे पाडण्याचे महापाप संघ, भाजपच्या नावावर आहे. आरक्षणाच्या मुद्द्यावरूनच कर्प्यूरी ठाकुर यांचे बिहारमधील सरकार जनसंघाने पाडले आहे. तसेच विश्वनाथ प्रताप सिंग यांच्या नेतृत्वाखालील केंद्रातील सरकार भाजपने पाडले आहे. असे असताना राहुल गांधी यांना आरक्षण विरोधी ठरवित स्वतःला आरक्षण समर्थक ठरविण्यात या धर्मांध शक्तींना जराही काही वाटत नाही.

आता देशभरातील अनेक आंबेडकरीवादी पक्ष, संघटना हिंदु राष्ट्र निर्माण करायला निघालेल्या भाजपसोबत आहेत, त्यांनी आपापल्या राज्यात राहूल गांधींच्या विरोधात मोर्चा खोलला आहे. भाजप नेत्यासाठी दलाली करणारे या पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते हे मोर्चे काढत आहेत. या बिचाऱ्यांना राहुल गांधी काय बोलले हे ही माहित नाही. अन् माहित झाले तरी ते नीट समजून घ्यायला ही अक्कल लागते. हे बिचारे ते आणणार कुठून. यांच्या नेत्यांनी तर त्यांना भाजपच्या दावणीला बांधले आहे. बाकी काही असो राहुल गांधी यांच्या भूमिकेचा विपर्यास करुन संभ्रम निर्माण करण्याच्या प्रयत्नात राहुल गांधी यांची आरक्षणवादी भूमिका अधिकच स्पष्ट होत गेली असून आंबेडकरी विचारांचा मुखवटा घातलेल्या दलित नेतृत्वाचा चेहरा उघड होताना दिसत आहे.

**राहुल गायकवाड,**
**(महासचिव, समाजवादी पार्टी,**
**महाराष्ट्र प्रदेश)**

# माझे 'आरास स्पर्धा' परीक्षण व आनंद दिघे !

मुंबईच्या " महानगर " दैनिकाने, १९९५ मध्ये गणपतीच्या आरास स्पर्धेसाठी परीक्षक मंडळावर माझी नेमणूक केली होती. आम्हाला ठाण्यामधील अनेक मंडळांचे परीक्षण करायचे होते. तेथील सार्वजनिक गणेशोत्सव मंडपांना आम्ही रात्री भेटी देत होतो. एका ठिकाणी अचानक लोकांची वेगळीच धावपळ, औत्सुक्य, कुजबुज पाहायला मिळाली. तोच तेथे ठाण्याचे अत्यंत लाडके नेते, धर्मवीर आनंद दिघे हे दाखल झाले. नेते म्हणून ते विविध मंडपांना भेट देत होते. आम्ही परीक्षक आहोत असे म्हटल्यावर त्यांनी आपणहून, पुढे होऊन आमच्याशी ओळख करून घेतली. त्यानी विचारले तुमची काय, उदबत्ती, पान मसाला, चहा.... काय ? अगदी सुरुवातीला हे आमच्या डोक्यावरूनच गेले. पण नंतर लगेच लक्षात आले की ते आमच्या प्रायोजकाबद्दल विचारत होते. ती स्पर्धा त्या वेळेला ' शिवरंजनी ' या अगरबत्ती उद्योगाने प्रायोजित केली असल्यामुळे, आम्ही त्यांना सांगितले " उदबत्ती, उदबत्ती ! तेव्हा ते दिलखुलास हसले.

मग आम्ही त्या मंडपामध्ये जो चालता बोलता देखावा केला होता त्याचा एकदमच आनंद घेतला. पुढच्या मंडपामध्येही असेच झाले. कै.दिघे यांची गाडी पुढे आणि त्यांच्या मागे आमची गाडी ! पुन्हा एकदा संयुक्त दर्शन, परीक्षण झाले. कै.दिघे यांना प्रत्येक ठिकाणी मिळणारा कमालीचा आदर सन्मान, त्यांचे व्यक्तिमत्व पाहून आम्ही दडपूनच गेलो होतो.




त्या पुढच्या ठिकाणी कै. दिघे यांची गाडी गेल्यावर आम्ही असे ठरवले की आपण थोडे नंतर जावे. कारण त्यांना मिळणारा मान हा त्यांचाच होता. त्यात आपण भागीदार होऊ नये. म्हणून आम्ही थोडा वेळ आधीच्याच मंडपात रेंगाळत राहिलो. नंतर पुढे गेलो. पुढच्या मंडपात गेलो तेव्हा आम्हाला आश्चर्याचा धक्काच बसला. कारण तिथले सर्व कार्यकर्ते आमचीच वाट पाहत थांबले होते.

याचे कारण म्हणजे कै. दिघे यांनी त्यांना असे सांगितले होते की माझ्याबरोबर एक परीक्षक मंडळही आले आहे. त्यांच्यासाठी आपण थांबू या. म्हणून दिघे यांच्यासह त्या मंडळाचे सर्व कार्यकर्ते आमची वाट पाहत ताटकळत थांबले होते. आम्हाला अगदी अवघडल्यासारखे झाल्यामुळे आम्ही त्यांच्याबरोबर जाणे टाळत होतो आणि ते मात्र आम्हाला सन्मान देऊ इच्छित होते. हे पाहिल्यावर आम्हीच ओशाळलो.

मग मात्र आम्ही त्यांच्या सोबतच अनेक गणेशोत्सव मंडपांना भेटी दिल्या. नंतर त्यांचा रीतसर निरोप घेऊनच आम्ही पुन्हा मुंबईकडे परतलो. अशा नेत्यांच्या सामान्य जनतेशी असलेल्या भावबंधांमुळेच ते जनतेच्या कायम स्मृतीत राहतात. सध्या गणेशोत्सव सुरु आहे. धर्मवीर चित्रपटाचा दुसरा भागही येऊ घातला आहे.

कै.दिघे यांच्या स्मृतीला नम्र अभिवादन !

**मकरंद करंदीकर.**

# असा सुटेल बिबट्यांचा प्रश्न

**शहरे आणि गावांमध्ये तसेच मानवी वस्तीकडे बिबट्या येण्याचे प्रमाण सातत्याने वाढते आहे. दबा धरून असलेल्या या बिबट्याने भीतीचे वातवरण तयार होते. बिबट्यांच्या या प्रश्नाकडे गांभिर्याने पाहण्याची गरज आहे.**

मार्जार कुळातला प्राणी असलेला बिबट्या हा वन्यप्राणी आहे. मात्र, गेल्या काही वर्षात त्याचा अधिवास धोक्यात आल्याने तो सातत्याने मानवी वस्तीकडे येण्याचे प्रकार घडत आहेत. यातूनच मग, मानव आणि वन्यप्राणी संघर्ष निर्माण होत आहे. परिणामी, लहान बालकांना उचलून नेणे, बिबट्याच्या हल्ल्यात काही जण जखमी होणे, शेतपिकांची नासाडी होणे, बिबट्याचा वावर असल्याने त्या परिसरात शेतीची कामे खोळंबणे अशा कितीतरी बाबी घडत आहेत. यातूनच बिबट्यांविषयी कणव न वाटता थेट बिबट्यांचा संहार करण्याची मानसिकताही बळावत आहे. बिबट्या हा नकोसा होणे हे तसे आशादायी चित्र नक्कीच नाही. कारण, निसर्ग साखळीतील एक महत्त्वाचा घटक म्हणूनही बिबट्याचे अस्तित्व मोलाचे आहे. पण, विविध कारणांमुळे बिबट्यांचे घर असुरक्षित बनले आहे आणि यातूनच ही मोठी समस्या निर्माण झाली आहे. यावर प्रभावी तोडगा आवश्यक असला तरी ठिगळ लावण्यातच धन्यता मानली जात आहे. यातून हा प्रश्न दिवसेंदिवस उग्र होण्याची शक्यता नाकारता येत नाही. नाशिक, नगर, पुणे, ठाणे, जळगाव, सांगली, कोल्हापूर अशा विविध जिल्ह्यांमध्ये बिबट्या मानवी वस्तीकडे येण्याच्या घटना वारंवार घडत आहेत. गोदावरी काठालगत असो की अन्य नद्यांच्या परिसरात बिबट्या सर्वसामान्यांना दृष्टीस पडतो आहे. भक्ष्य शोधण्यासाठी तो सैरावैरा होतो आहे. काही ठिकाणी तर तो विहीरीत पडलेलाही आढळून आला आहे. अखेर वनविभागाच्या मदतीने त्याला विहीरीतून सुखरुप काढण्यात येत आहे. आदिवासी भागांमध्येही बिबट्यांचा प्रश्न दिसू लागला आहे. ही बाब तशी चिंताजनकच आहे. कारण, आदिवासी बांधव हे शक्यतो वनांच्या क्षेत्रात किंवा सान्निध्यात राहतात. आणि तेथेही बिबट्यांचा प्रश्न निर्माण होणे हे तेथील वनांचे क्षेत्र कमी होण्याचेच द्योतक आहे. घनदाट जंगल विरळ झाल्याने हिरव्याकंच शेतांमध्ये बिबट्या येणे स्वाभाविकच बनले आहे. त्यामुळे बिबट्यांचा मानवी वस्तीकडे ओढा आणि त्यातून हल्ला-प्रतिहल्ला घडत आहे. पण, हे सारे असेच घडत राहणार का? या साऱ्या प्रकरणाची प्रामुख्याने जबाबदारी असलेला वनविभाग केवळ पिंजरा लावणे, बिबट्यांना पकडणे आणि सोडून देणे हेच सोपस्कार पार पाडणार का? हे प्रश्न उपस्थित होत आहेत. बिबट्यांनी हल्ला केला आणि त्यात कुणी व्यक्ती जखमी झाली तर त्यास वनविभागाकडून नुकसान भरपाई दिली जाते. पण ही भरपाई देण्यातच धन्यता मानावी का? नुकसान भरपाई देणे ही काही प्रभावी उपाययोजना नाही. बिबट्यांमुळे होणाऱ्या नुकसानीची भरपाई वनविभागाकडून वेळेवर दिली जात नसल्याच्या तक्रारी वारंवार होतात. पण, वनविभागाच्या कामकाजावर त्याचा काहीही फरक पडत नाही. घटना घडल्यानंतर सरकारी पद्धतीनुसार सर्व प्रक्रिया पार पडते. लोकांचे जनावर मेले की वनविभाग मदत देते. ही बाब योग्य नाही. मदत मिळविण्यासाठी वनविभाग किंवा सरकारी कार्यालयांमध्ये चकरा मारण्याची वेळ येणे हीच मोठी शोकांतिका आहे. खासकरुन दुर्गम भागात राहणाऱ्यांना वनविभागाकडे चकरा मारणे दुरापास्त बनते. यातूनच स्थानिक ग्रामस्थांमध्ये नाराजी पसरते आणि नैराश्यही येते. परिणामी, वनविभागाला हक्काचे सहकार्य करणाऱ्या व्यक्ती दूरावतात. यातून वनसंपत्तीसह जैविक विविधतेचे अतोनात नुकसान होते. यासाठीच वनविभागाने काही नुकसान होऊ नये यासाठीच ठोस पावले उचलायला हवीत आणि घटना घडलीच तर तातडीने पंचनामा करुन मदतही द्यायला हवी.

ग्रामीण भागात गाय, बैल, शेळ्या यासारखी जनावरे ही मोकळी असल्याने ती बिबट्याच्या हल्ल्यात जखमी होत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे जनावरांना बंदिस्त ठेवणे आवश्यक आहे. ज्या पद्धतीने कांदा चाळ बनविण्यासाठी अनुदान दिले जाते. तसे शेळी ठेवण्यासाठीचे शेड बांधण्यासाठी वनविभागाने मदत केली तर त्याचा अधिक फायदा होऊ शकतो. बिबट्या हा पूर्वीपासूनच मानवी वस्तीच्या परिसरातच राहत असल्याचे नमूद आहे. त्याला असुरक्षित भासले किंवा स्वसंरक्षणासाठी बिबट्या हल्ला करीत असल्याचे तज्ज्ञ सांगतात. त्यामुळे बिबट्या मानवी वस्तीत आला तर त्याला बंदिस्त कसे करता येईल, याचा विचार केला पाहिजे. एखाद्या खोलीत किंवा घरात बिबट्याला बंदिस्त करता आले तर त्याला पकडणे शक्य होते. अन्यथ मोठी कसरत करावी लागते. यातून काही आपत्ती किंवा दुर्घटना घडणार नाही, याचीही खबरदारी घेताना नाकी नऊ येते. बिबट्या मानवी वस्तीत आला तर त्याला पाहण्यासाठी नागरिकांची मोठी झुंबड उडते. अशा प्रसंगी नागरिकांनी वनविभागाला सहकार्य करणे आवश्यक असते. पण, वनविभाग आणि ग्रामस्थांमध्ये संवाद राहिला नाही तर फोटो काढण्याच्या नादातही काही अपप्रकार घडतात. वनविभागाचे अधिकारी व कर्मचारी आणि नागरिक यांच्यातील अत्यल्प संवाद हा अतिशय चिंतेची बाब आहे. बिबट्या आल्याची माहिती देण्यासाठी वनविभागाच्या अधिकाऱ्यांना फोन केला तर हे आमच्या हद्दीत नाही तुम्ही त्या तालुक्याच्या अधिकाऱ्यांना फोन करा, असे सांगितले जात असल्यानेही वनविभागाविषयी तीव्र नाराजी आहे.बिबट्यांविषयी ग्रामस्थांमध्ये जनजागृती करण्यासाठी वनविभागाने मोहिम हाती घेतली होती. बिबट्यांच्या अभ्यासक विद्या अत्रेय यांनी तयार केलेली फिल्म शाळांमध्ये तसेच ग्रामसभेत दाखविण्यात येत होती. ही फिल्म पुढील काळात शाळा तसेच विविध गावांच्या ग्रामपंचायतींमध्ये, ग्रामसभांमध्ये, चावडीवर तसेच अनेक शेतकऱ्यांच्या गटांना दाखविण्याचे नियोजन होते. टीव्ही, एलसीडी प्रोजेक्टर, लॅपटॉप याद्वारे ही फिल्म दाखविण्याला प्रारंभही झाला. त्याला चांगला प्रतिसादही लाभला. मात्र, ही मोहिम आता बंद पडली आहे. बिबट्यांचा वावर असलेल्या आणि बिबट्या-मानव संघर्ष निर्माण होणाऱ्या भागात जनजागृतीची ही मोहिम पुन्हा राबविणे आवश्यक आहे.

**भावेश ब्राह्मणकर**

# मनसेचे माऊली थोरवे यांच्या घरगुती गणेशोत्सवात महिलांच्या सुरक्षेचा मुद्दा

**मुंबई :** माता भगिनींची सुरक्षा तुच कर रे गणपती बाप्पा अशी साद मनसेचे माऊली थोरवे यांच्या घरगुती गणेशोत्सव मध्ये गणरायाकडे घालण्यात आली आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे चेंबूर विधानसभा अध्यक्ष माऊली थोरवे हे गणेशोत्सव मध्ये दर वर्षी आपल्या वेग वेगळ्या संकल्पनेतून सामाजिक संदेश देणारे देखावे सादर करून जनजागृती करत असतात. सद्या देशभरात बलात्कार आणि हत्याची मालिका सुरु आहे. याच अनुसंघाने या गणेशोत्सवात माऊली थोरवे यांनी आपल्या चेंबूर येथील निवासस्थानी स्त्री सुरक्षेचा विषय उपस्थित केला आहे. माता भगिनींची सुरक्षा तुच कर रे गणपती बाप्पा अशी साद घालण्यात आली आहे. या देखव्यात मुलींच्या सुरक्षेचा विषय उपस्थित करून माता भागनींची सुरक्षावर प्रकाश टाकला आहे. धोरवे यांच्या गणेशाचे दर्शन घेण्यासाठी मनसे नेते अमित ठाकरे, शिरीष सावंत, सरचिटणीस रिटा गुप्ता, शिवसेना माजी आमदार तुकाराम काते, मुंबई रणजी क्रिकेटर भूपेन ललवाणी, मनसेचे सुधाकर पांडे, आदिनी भेट देऊन त्यांच्या संकल्पनेला दादा दिली आहे.



# वर्षा निवासस्थानी जे.पी नड्डा यांच्याकडून गणरायाचे दर्शन



प्रतिनिधी
■ मुंबई

भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री जे.पी नड्डा तसेच केंद्रीय पर्यावरण, वन, जलवायू परिवर्तन मंत्री भूपेंद्र यादव यांनी काल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वर्षा या शासकीय निवासस्थानी जाऊन गणरायाचे दर्शन घेतले. यावेळी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी शाल, पुष्पगुच्छ आणि श्री गणेशाची मूर्ती देऊन मान्यवरांचे स्वागत केले.

यावेळी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, वृषाली श्रीकांत शिंदे, राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल, खासदार मिलिंद देवरा, कौशल्यविकास मंत्री मंगलप्रभात लोढा, आमदार आशिष शेलार, आमदार प्रवीण दरेकर, शिवसेना भाजप समन्वयक आशिष कुलकर्णी आदी मान्यवर उपस्थित होते.

# डायमंड लीगच्या अंतिम फेरीत नीरज चोप्राला उपविजेतेपद

## 87.86 मीटरचा सर्वोत्तम थ्रो; ग्रेनेडाच्या अँडरसन पीटर्सला विजेतेपद

वृत्तसंस्था
■ ब्रुसेल्स

2024 च्या डायमंड लीग फायनलमध्ये नीरज चोप्रा दुसऱ्या स्थानावर राहिला. त्याने तिसऱ्या प्रयत्नात 87.86 मीटरचा सर्वोत्तम थ्रो केला. तो चॅम्पियन होण्यापासून 0.01 मीटर दूर राहिला. ग्रेनेडाच्या अँडरसन पीटर्सने पहिल्याच प्रयत्नात 87.87 मीटरची सर्वोत्तम थ्रो करून पहिले स्थान मिळविले.

नीरजने पहिल्याच प्रयत्नात 86.82 मीटर थ्रो केला होता. जर्मनीच्या ज्युलियन वेबरने ८५.९७ मीटर थ्रो करून तिसरे स्थान पटकावले. अंतिम फेरीत ७ भालाफेकपटूंनी भाग घेतला. त्यापैकी 4 थ्रोर्सना 83 मीटरही थ्रो करता आले नाही.डायमंड लीग फायनल 13 आणि 14 सप्टेंबर रोजी ब्रुसेल्स, बेल्जियम येथील किंग बौडौइन स्टेडियमवर झाली. शुक्रवारी, भारताचा अविनाश साबळे 3000 मीटर स्टीपलचेस स्पर्धेत 9व्या स्थानावर राहिला.

गेल्या महिन्यात संपलेल्या पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेत नीरज चोप्राने रौप्यपदक जिंकले होते. त्याने हंगामातील सर्वोत्तम ८९.४५ मीटर थ्रो केले. पाकिस्तानच्या अर्शद नदीमने ९२.९७ मीटर फेक करून सुवर्णपदक जिंकले. तथापि, तो डायमंड लीगचा भाग नव्हता.नीरजने २०२० च्या टोकियो ऑलिम्पिकमध्ये सुवर्णपदक जिंकले होते. त्यानंतर अर्शद नदीमलाही टॉप-5 खेळाडूंमध्ये स्थान मिळविता आले नाही. नीरजने 2022 मध्ये डायमंड लीगची फायनल जिंकली होती, 2023 मध्ये तो दुसऱ्या स्थानावर होता.



***तिसऱ्या प्रयत्नात नीरजने सर्वोत्तम थ्रो फेकला***
*शनिवारी रात्री 11.52 वाजता भालाफेक स्पर्धेला सुरुवात झाली. पहिल्या प्रयत्नात नीरज चोप्राने 86.82 मीटर फेक केली, ज्यामुळे तो दुसऱ्या स्थानावर पोहोचला. ग्रेनेडाच्या अँडरसन पीटर्सने ८७.८७ मीटर फेक करून पहिले स्थान पटकावले. जर्मनीच्या ज्युलियन वेबरने ८५.९७ मीटर फेक करून तिसरे स्थान पटकावले.तिसऱ्या प्रयत्नात नीरजचा थ्रो ८७.८६ मीटर गेला. तो प्रथम स्थान मिळवण्यापासून 0.02 मीटर दूर राहिला.*

# फेव्हरेट आम्ही आहोत, काळजी त्यांनी करावी - शमी




वृत्तसंस्था
■ कोलकत्ता

वेगवान गोलंदाज मोहम्मद शमीने बॉर्डर-गावस्कर ट्रॉफीबद्दल बोलताना सांगितले की, 'आम्ही फेव्हरेट आहोत, त्यांनी काळजी करायला हवी.' 34 वर्षीय वेगवान गोलंदाज शनिवारी बंगाल क्रिकेट असोसिएशनच्या पुरस्कार कार्यक्रमात सहभागी झाला होता. शमी एनसीएमध्ये घोट्याच्या दुखापतीतून सावरत आहे. गेल्या 4 कसोटी मालिकेत ऑस्ट्रेलियन संघ भारताला पराभूत करू शकलेला नाही.

डावीकडून, CAB अध्यक्ष स्नेहाशीष गांगुली, मोहम्मद शमी, सौरव गांगुली, संदीप पाटील आणि अजय जडेजा 2023-24 च्या बंगाल वार्षिक पुरस्कार सोहळयादरम्यान. डावीकडून, CAB अध्यक्ष स्नेहाशीष गांगुली, मोहम्मद शमी, सौरव गांगुली, संदीप पाटील आणि अजय जडेजा 2023-24 च्या बंगाल वार्षिक पुरस्कार सोहळयादरम्यान.जोपर्यंत मी पूर्णपणे तंदुरुस्त होत नाही तोपर्यंत धोका पत्करणार नाही: शमी टीम इंडियात परतण्याच्या प्रश्नावर शमी म्हणाला- 'मला जबरदस्ती आणि घाई करायची नाही. 100 टक्के तंदुरुस्त झाल्यानंतर मला मैदानात परतायचे आहे.

शमीने पीटीआयला सांगितले की, 'मी जितका मजबूत पुनरागमन करेन तितके माझ्यासाठी चांगले होईल. मला घाई करायची नाही कारण मला पुन्हा दुखापत होण्याचा धोका नको, मग ती बांगलादेश, न्यूझीलंड किंवा ऑस्ट्रेलियाविरुद्धची मालिका असो. तो म्हणाला- 'मी आधीच गोलंदाजी सुरू केली आहे. शमीने त्याचा शेवटचा आंतरराष्ट्रीय सामना 2023च्या एकदिवसीय विश्वचषकात खेळला होता. ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या अंतिम सामन्यात त्याला दुखापत झाली होती.

मोहम्मद शमीने बंगळुरू येथील नॅशनल क्रिकेट अकादमीमध्ये गोलंदाजी सुरू केली आहे.शमी रणजी ट्रॉफी खेळू शकतो शमी ऑक्टोबरमध्ये होणाऱ्या रणजी ट्रॉफीमध्ये खेळताना दिसणार आहे. तो 11 ऑक्टोबरला यूपी आणि 18 ऑक्टोबरला बिहारविरुद्धच्या सामन्यात बंगालकडून खेळू शकतो. जर तो देशांतर्गत क्रिकेट खेळला तर तो न्यूझीलंडविरुद्धच्या कसोटी सामन्यांमध्ये भारतीय संघात पुनरागमन करू शकतो.

शमी घोट्याच्या शस्त्रक्रियेतून बरा होत आहे मोहम्मद शमी या वर्षी जानेवारीत इंग्लंडला गेला आणि त्याच्या घोट्याची शस्त्रक्रिया झाली. शस्त्रक्रियेनंतर तो ६ महिने मैदानापासून दूर राहिला. या महिन्यात त्याने बेंगळुरू येथील राष्ट्रीय क्रिकेट अकादमीमध्ये पुनर्वसन सुरू केले. शमीचे काही व्हिडिओही समोर आले आहेत, ज्यामध्ये तो संथ गतीने गोलंदाजी करताना दिसत आहे.

# श्रीकांत चषक कॅरम स्पर्धेत भव्या सोळंकी विजेता

प्रतिनिधी
■ मुंबई

श्रीकांत चषक आंतर शालेय-कॉलेज कॅरम स्पर्धेत निर्णायक क्षणी अचूक फटकेबाज खेळ करणारा विवा कॉलेज-विरारचा भव्या सोळंकी विजेता ठरला. पहिले दोन बोर्ड हातचे निसटल्यामुळे दबावाखाली खेळणाऱ्या पार्ले टिळक विद्यालयाच्या सार्थक केरकरला अंतिम फेरीत भव्या सोळंकीने १५-० असे सहज नमविले. परिणामी सार्थक केरकरला अंतिम उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले.

विजेत्या-उपविजेत्यांना श्रीकांत चषक व स्ट्रायकर पुरस्कार देऊन माजी नगरसेवक ठाकूर सागर सिंह, उद्योजक शैलेश दलाल, तेजस शहा, संदीप आयरे, चंद्रकांत करंगुटकर, शिवछत्रपती पुरस्कार विजेते लीलाधर चव्हाण आदींच्या प्रमुख उपस्थितीत गौरविण्यात आले. श्रीकांत स्पोर्ट्स क्लब-कांदिवली व आयडियल स्पोर्ट्स अकॅडमी आयोजित विनाशुल्क कॅरम स्पर्धेमध्ये मुंबई शहर व उपनगर, ठाणे, पालघर, रायगड, कोल्हापूर आदी जिल्ह्यातील ज्युनियर ४८ खेळाडूंनी भाग घेतला होता.




कांदिवली-पूर्व येथील कानकश्री सभागृहामध्ये झालेल्या उपांत्य फेरीत पुष्कर गोळेने दमदार प्रारंभ करूनही उत्तरार्धात भव्या सोळंकीने त्याला १०-४ असे चकविले. सार्थक केरकरने श्रीशान पालवणकरचे आव्हान ७-३ असे संपुष्टात आणून अंतिम फेरी गाठली. उपांत्य उपविजेतेपदाचा पुरस्कार पुष्कर गोळे व श्रीशान पालवणकर यांनी; उपांत्यपूर्व उपविजेतेपदाचा पुरस्कार वेदांत राणे, अथर्व म्हात्रे, प्रसन्ना गोळे, नील म्हात्रे यांनी आणि उपउपांत्यपूर्व उपविजेतेपदाचा पुरस्कार अर्णव गावडे, तृशांत कांबळी, रेहान शेख, ओमकार वडार, अंश जाधव, अवैस खान, शेख अब्दुल, वेदांत पाटणकर यांनी मिळविला.

शालेय-कॉलेज खेळाडूंच्या आग्रहास्तव आयडियल स्पोर्ट्स अकॅडमी व सुमती सेवा मंडळ-दहिसरतर्फे माहीम ज्युवेनील स्पोर्ट्स क्लब सहकार्याने माजी केंद्रीय राज्य अर्थमंत्री आनंदराव अडसूळ यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून १६ सप्टेंबर रोजी आनंदराव अडसूळ अमृतमहोत्सवी चषक शालेय-कॉलेज प्रमुख ज्युनियर खेळाडूंची सुपर लीग कॅरम स्पर्धा शिवाजी पार्क येथे आयोजित करण्यात येणार आहे. सुपर लीगमध्ये गणाधीश चषक व श्रीकांत चषक कॅरम स्पर्धेमधील १६ खेळाडूंना प्रवेश दिला जाणार असल्याची माहिती सुमती सेवा मंडळाचे अध्यक्ष प्रमोद पार्टे यांनी दिली.

# आम्हाला उंचीचे वेड नाही...

■ मुंबई



लालबाग परळ मधील गणेशोत्सव जगप्रसिद्ध झाला आहे. परंतु, मंडळामध्ये वाढत चाललेली स्पर्धा, जाहिरात बाजी आणि भाविकांना आकर्षित करण्याचे वेगवेगळे प्रयोग यामध्ये गणेशोत्सवाला व्यावसायिक स्वरूप आले आहे . गणपतीच्या मूर्तींची उंची वाढत जात ४० -४० फुटांपर्यंत पोहोचली आहे. दुसरीकडे कुणी मंडळाचे नाव बदलत आहे तर कुणी नेते मंडळी, कलाकार यांना आमंत्रित करीत आहे. अशा या चढाओढीच्या वातावरणात परळ मधील नवचैतन्य बालसेवा सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ अपवाद ठरले आहे. कृष्णा बिल्डिंग नंबर ४, गोखले सोसायटी क्रॉस लेन, परळ येथील हे मंडळ गेली ७३ वर्षे गणेशोत्सव साजरा करत आहे. स्थापनेपासून गणेशाच्या मूर्तीची उंची दीड फुटाच्या वर गेलेली नाही. रस्त्यावर वाहतुकीला अडथळा वगैरे न करता छोट्या जागेत अकरा दिवस सर्व धार्मिक विधी पार पाडले जातात. अनंतचतुर्दर्थी दिवशी महाप्रसादाचे आयोजन केले जाते, किमान ८०० ते १००० लोक या महाप्रसादाचा लाभ घेतात. पण कुठेही गडबड, गोंधळ, गोंगाट नसतो. विसर्जनाची मिरवणूक ही शांततेत पार पडते. निमिष नायक संस्थेचे अध्यक्ष असून सुशांत सावळ सचिव आहेत.

# मलिन झालेली प्रतिमा सावरण्यासाठी राजीनामा देणे केजरीवालांची स्टंटबाजी

## भाजपा गटनेते प्रविण दरेकरांची टीका

प्रतिनिधी
■ मुंबई

भ्रष्टाचारामुळेच अरविंद केजरीवाल यांना तुरुंगात जावे लागले. त्यांच्या मते जो चेहरा जनतेत दाखविण्याचा होता तो बुरखा फाटलेला आहे. अशावेळी आपली प्रतिमा जनतेच्या मनात मलिन झालीय ती पुन्हा सावरण्यासाठी स्टंटबाजी करण्याचा केविलवाणा प्रयत्न आपल्या स्टाईलप्रमाणे केजरीवाल करू इच्छित असल्याची टीका भाजपा गटनेते आमदार प्रविण दरेकर यांनी केली आहे.

पत्रकारांशी संवाद साधताना दरेकर यांनी राज्यातील विविध राजकीय घडामोडिंवर भाष्य केले. ते म्हणाले कि, उद्धव ठाकरे अडीच वर्षाच्या मुख्यमंत्री पदाच्या कालावधीत योजना कशी लागू करतात. त्याकरिता बजेट कसे करावे, सरकार कसे चालवावे हे ज्यांना समजले नाही. सरकार ज्यांना टिकवता आले नाही, स्वतःच्या मंत्रिमंडळातील मंत्री हाताळता आले नाही, आमदार हाताळता आले नाहीत ते जनतेचे प्रश्न काय हाताळणार. 'मुंगेरीलाल के हसीन सपने' संजय राऊत बघताहेत तेच त्यांचे प्रमुख उद्धव ठाकरे बघताहेत. सरकार महायुतीचेच येणार. त्यामुळे कुणीही अशा प्रकारच्या स्वप्नात राहू नये. स्वप्नात रममाण व्हायचे असेल तर त्यांना मोकळीक आहे.



दरेकर पुढे म्हणाले कि, विरोधी पक्ष भयभीत झालेला आहे. ज्यापद्धतीने महायुती सरकारला जनतेचा प्रतिसाद मिळतोय, ज्या योजना मग लाडकी बहीण असेल, शेतकरी, ज्येष्ठ नागरिक, सोयाबीन-कापूस निर्यातबाबत घेतलेला निर्णय असेल यामुळे जनमाणस पूर्णपणे बदलला आहे. आता विरोधक संभ्रमित, भयभीत झालेत. कुठल्याही प्रकारची गोष्ट आम्ही अजेंड्यात आणू हे येणाऱ्या काळात ते सांगताना दिसतील. कारण कर्नाटकला अशाच प्रकारे नको त्या घोषणा केल्या नंतर त्याची अंमलबजावणी झाली का? याचे आत्मपरीक्षण त्यांनी करावे.

***पवारांना मराठा समाजाच्या आरक्षणाविषयी कणव नव्हती***

*दरेकर म्हणाले कि, चंद्रकांत पाटील यांचे अत्यंत योग्य असे वक्तव्य आहे. ५० वर्ष शरद पवार राजकारणात आहेत. चार वेळा मुख्यमंत्री राहिलेत. अनेक वर्ष त्यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्यमंत्री होते. का पवारांनी मराठा समाजाला आरक्षण दिले नाही. उलटपक्षी ९४ साली जे १६ टक्के आरक्षण होते ते देऊन आरक्षणाची मर्यादा ५० टक्केपर्यंत नेऊन ठेवली. का त्यांना वाटले नाही हे आरक्षण ठेवले नाही जर ते खाली ठेवले असते तर आज मराठा समाजाला आरक्षण देण्यासंदर्भात ५० टक्क्याच्या वर मर्यादा गेली नसती. खऱ्या अर्थाने पवारांना कधीच मराठा समाजाच्या आरक्षणाविषयी कणव नव्हती. ते फक्त नावाला, राजकारणासाठी मराठा समाजाचा उपयोग करायचे. मराठा समाजासाठी त्यांनी कधीच भुमिका घेतलेली नाही. स्पष्टपणे मराठा समाजाला आरक्षण देता येणार नाही एवढंही सांगण्याचे धाडस केले आहे.*




***मुंबई : राहुल गांधी यांनी परदेशात जाऊन संविधानाचा अपमान केल्याचे निषेधार्थ शिवसेना आमदार यामिनी जाधव, नगरसेवक दत्ता नरवणकर, नगरसेवक संतोष खरात, एडवोकेट सुशिबेन शहा यांच्या नेतृत्वाखाली वरळी येथे जोरदार निदर्शने करण्यात आली.***
***छाया केतन खेडेकर***

# चांदिवलीत आमदार दिलीप लांडे यांच्या नेतृत्वाखाली राहुल गांधींविरोधात निदर्शने

प्रतिनिधी
■ मुंबई

काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी परदेशामध्ये आरक्षण रद्द करण्यासंदर्भात केलेल्या वक्तव्यामुळे महायुतीतील सहयोगी पक्ष आक्रमक झाले असून राहुल गांधी यांच्या विरोधात मुंबईसह राज्यभरात आंदोलन करण्यात येत आहे. शनिवारी शिवसेना शिंदे गटाच्या वतीने राहुल गांधी विरोधात मुंबईत विविध ठिकाणी निदर्शने करण्यात आली. चांदिवलीचे शिवसेना आमदार दिलीप लांडे यांच्या नेतृत्वाखाली चांदिवलीतील संघर्ष नगर येथील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर पुतळ्या समोर शिवसैनिकांमार्फत निदर्शने करण्यात आली. यावेळी राहुल गांधी आणि काँग्रेस च्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. राहुल गांधी हाय हाय.. मुर्दाबाद मुर्दाबाद राहुल गांधी मुर्दाबाद, आरक्षण आमच्या हक्काचे नाहीं कोणाच्या बापाचे अशी घोषणा देत उपस्थित जनसमुदायसह शिवसैनिकांनी निषेध केला. याप्रसंगी प्रतिक्रिया व्यक्त करताना आमदार दिलीप लांडे म्हणाले की देशातील दिन दुबळयाना आरक्षण देण्याचे काम भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी केले होते. अशा वंचिताचे आरक्षण कोणी हिरावून घेऊ शकत नाहीं. बाबासाहेबांचे संविधान कोणी बदलू शकत नाही, राहुल गांधी यांच्यात हिंमत असेल तर त्यानी भारतात येऊन बोलाव, आरक्षण हक्काचे आहे, ते काढण्याची भाषा करणाऱ्यांना त्यांची जागा दाखवून देऊ. आपला पक्ष आरक्षणाच्या बाजूने आहे. यावेळी आमदार दिलीप लांडे यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी आणि स्थानिक नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते.




# पॅरालिम्पिक : भारतीय खेळाडूंच्या कामगिरीला सलाम

सुहास जोशी,
ज्येष्ठ क्रीडा पत्रकार

पॅरिस येथे संपन्न झालेल्या पॅरालिम्पिक स्पर्धेत भारतीय खेळाडूंनी शानदार कामगिरी करुन नव्या इतिहास रचला. भारताने या स्पर्धेत प्रथमच ७ सुवर्ण, ९ रौप्य, १३ कांस्य अशी एकूण २९ पदके मिळवून पदक तालिकेत १८ वा क्रमांक मिळवला. गेल्या टोकियो स्पर्धेत भारताने १९ पदके जिंकताना २४वा क्रमांक पदक तालिकेत पटकावला होता. त्या अगोदरच्या दोन स्पर्धेत भारताला अवघी ५ पदके जिंकता आली होती. त्या तुलनेत गेल्या दोन स्पर्धेतील भारतीय खेळाडूंची कामगिरी निश्चितच कौतुकास्पद आहे. जिगर, जिद्द, चिकाटी, लढाऊबाणा या साऱ्यावर मात करुन भारतीय खेळाडूंनी मिळविलेल्या यशाला तोड नाही. म्हणूनच त्यांच्या या कामगिरीला "सलाम" करावाच लागेल. स्विझर्लंड, बेल्जियम, दक्षिण कोरिया, तुर्कस्थान, अर्जेंटिना या बलाढ्य देशांना मागे टाकून भारताने पदक तालिकेत मिळविलेले १८ वे स्थान वाखाणण्याजोगे आहे.

अपेक्षेप्रमाणे बलवान चीन, अमेरिका, इटाली, इंग्लंड या देशाचा यंदा देखील या स्पर्धेवर दबदबा राहिला. चीनने ९४ सुवर्ण, ७६ रौप्य, ५० कांस्य अशी एकूण २२० पदके जिंकून पदक तालिकेत अव्वल क्रमांक पटकविला. शारीरिक व्यंग, अपंगत्व, आर्थिक अडचणी, प्रशिक्षणाच्या विशेष सुविधा उपलब्ध नसताना देखील भारतीय खेळाडूंनी मिळविलेल्या या यशाला एक वेगळीच किनार आहे. १९४८ साली युद्धात जखमी झालेल्या सैनिकांचे मनोबल उंचावण्यासाठी पॅरालिम्पिकचा जन्म झाला. १९६०च्या रोम स्पर्धेपासून खऱ्या अर्थाने या स्पर्धेला प्रारंभ झाला असे म्हणावे लागेल. तेव्हा प्रथमच ४०० पेक्षा जास्त खेळाडू रोम स्पर्धेत सहभागी झाले होते. यंदा पॅरिसमध्ये ७९ देशांचे ४ हजार पेक्षा जास्त खेळाडू सामिल झाले होते. यंदा ८४ खेळाडू भारतातर्फे सहभागी झाले होते. त्यामध्ये हरियाणाचे सर्वाधिक २३ खेळाडू होते. या अगोदर झालेल्या उन्हाळी ऑलिंपिक स्पर्धेत देखील भारतीय चमूत हरियाणाचेच सर्वाधिक खेळाडू होते. हरियाणासारखे छोटे राज्य खेळाडूंना देत असलेल्या सुविधा आणि सवलतीला तोड नाही. त्यांचाच कित्ता भारतातील इतर राज्यांनी गिरवला तर आंतरराष्ट्रीय स्पर्धात भारताची कामगिरी नक्कीच आणखीन उंचावेल.

भारतीय चमूत यंदा प्रथमच विक्रमी ३२ महिला खेळाडूंचा समावेश होता. पदक विजेत्यांमध्ये १० भारतीय महिला खेळाडूंचा समावेश होता. भारतीय महिलांना १ सुवर्ण, १ रौप्य, ८ कांस्य पदके मिळविली. विशेष म्हणजे मृगसेन, मनिषा, शितल, नित्या, प्रिती, दिप्ती, मोना या महिला खेळाडूंचे हे पहिलेच पॅरालिम्पिक होते. त्यात त्यांनी पदार्पणातच पदक जिंकण्याचा पराक्रम केला. प्रिती पालने १०० आणि २०० मीटर धावण्याच्या शर्यतीत २ कांस्य पदके जिंकली. या स्पर्धेत २ पदके जिंकणारी ती एकमेव भारतीय खेळाडू होती. ही विशेष बाब म्हणावी लागेल. यंदाच्या स्पर्धेत भारतीय खेळाडूंनी नुसती पदकेच जिंकली नाही तर नवे विश्वविक्रम देखील नोंदविले. तिरंदाजित शितल देवीने कंपाऊंड प्रकारात ७०३ गुणांची नोंद करुन विश्वविक्रम नोंदविला.




ॲथलेट सुमित अंतिलने भालाफेक स्पर्धेत नव्या पॅरालिम्पिक विक्रमाची नोंद केली. तसेच शरद कुमारने देखील १.८८ मीटर झेप घेत उंच उडीत नवा पॅरालिम्पिक विक्रम केला. धरमवीरने पुरुषांच्या क्लब थ्रो प्रकारात ३४.९२ मीटरची फेक करून नवा आशियाई विक्रम नोंदविला. तर गोळाफेक स्पर्धेत सचीन खिल्लारेने देखील नव्या आशियाई विक्रमाची नोंद केली. महिला नेमबाज अवनी लेखराने १० मीटर एयर रायफल प्रकारात २४९.७ गुणांची नोंद करून नवा पॅरालिम्पिक विक्रम नोंदविला. १७ वर्षे, ७ महिने, २३ दिवसांच्या शितलने तिरंदाजीत कांस्य पदक मिळवून भारतातर्फे सर्वात लहान वयात या स्पर्धेत पदक जिंकण्याचा पराक्रम केला. तर ३५ वर्षे, ७ महिन्यांच्या गोळाफेकपटू धरमवीर भारताचा या स्पर्धेतील सुवर्णपदक जिंकणारा सर्वात वयस्कर खेळाडू ठरला.

उन्हाळी ऑलिम्पिकमध्ये विनेश फोगाटचे पदक वजन वाढल्यामुळे हुकले होते. इथे मात्र भालाफेल स्पर्धेतील रौप्य पदक विजेत्या नवदिप सिंगला एफ - ४२ गटात नंतर मात्र नशिबाची साथ मिळाली. याच गटातील सुवर्ण पदक विजेत्या इराकच्या बेइतला अपात्र ठरविण्यात आल्याने नवदिप सिंगच्या रौप्य पदकाचे रुपांतर सुवर्ण पदकात झाले. बेइतला स्पर्धेच्या ठिकाणी अक्षेपार्ह कृत्य केल्यामुळे बाद करण्यात आले. त्यांनी फडकविलेल्या झेंड्याबाबत अक्षेप घेण्यात आला. अवघ्या ४ फूट ४ इंच उंची असलेल्या नवदिपला सातत्याने कमी उंचीमुळे अवहेलना सहन करावी लागत होती. किमान ७ फूट लांब अशी भाल्याची उंची असते. त्यामुळे नवदिपसमोर खडतर आव्हान होते. परंतु या आव्हानाला सामोरा जाऊन नवदिपने नवा आदर्श आजच्या तरुण खेळाडूंसमोर ठेवला आहे. तो लवकर जन्माला आल्यामुळे त्याची वाढ फारशी झाली नाही. परंतु वडिलांनी खेळण्यासाठी सतत प्रोत्साहन दिल्यामुळे नवदिपने ही मोठी झेप घेतली.

तिरंदाज हरविंदर सिंग या स्पर्धेतील भारताचा पहिला सुवर्ण पदक विजेता ठरला. नेमबाज अवनी लेखरा आणि भालाफेकपटू सुमित अंतिल यांनी यंदा देखील आपले सुवर्णपदक राखण्यात यश मिळविले. लेखराने तर नवा विश्वविक्रम देखील नोंदविला. ज्युदोत कपिल परमारने कांस्य पदक जिंकून या स्पर्धेतील या खेळाचे पदकाचे खाते उघडले. क्लब थ्रोमध्ये सुवर्ण आणि रौप्य पदके भारताच्याच धरमवीर, प्रणवने जिंकली. भारताची या स्पर्धेतील आणखी किमान ७ पदके हुकली. भारताच्या ७ खेळाडून चौथ्या क्रमांकावर समाधान मानवे लागले. तिरंदाज राकेश कुमार, ॲथलेट संदिप, शिवराजन - नित्या, सुकांत कदम (बॅडमिंटन), शैलेश कुमार, उंच उडी, हरविंदर - पूजा (तिरंदाजी), सिमरन (१०० मीटर धावणे) या खेळाडूंची पदके थोडक्यात हुकली अन्यथा भारतीय पदकांची संख्या ३५च्या पुढे गेली असती..

भारतीय यशात केंद्र सरकारचा देखील वाटा आहे. खेळाडूंच्या तयारीसाठी केंद्र सरकारनी ७६ कोटींची मदत खेळाडूंना केली होती. भारतीय क्रीडा प्राधिकरणाने देखील खेळाडूंना सर्वोतोपरी सहाय्य केले होते. भारतीय खेल प्राधिकरणाने आता रिसर्च ऑफिसर नियुक्त करून या खेळाडूंच्या कामगिरीकडे लक्ष देण्याची जबाबदारी त्याच्यावर सोपविली आहे. "टारगेट ऑलिम्पिक पोडियम' या प्रमाणे भारतीय पॅरालिम्पिक संघटना देखील काही चांगले उपक्रम राबवत आहे. त्या उपक्रमाचा देखील फायदा खेळाडूंना झाला आहे. आता या पदक विजेत्यावर देखील त्या त्या राज्याने पारितोषिकांचा वर्षाव करुन त्यांना देखील चांगली रक्कम देणे आवश्यक आहे. जेणे करुन पुढील स्पर्धांमध्ये त्यांच्या कामगिरीत अधिक सुधारणा होईल. आजवर आम्हांला दुर्बलतेमुळे अवहेलना सहन करावी लागत होती. आता मात्र आम्हांला सन्मान द्या ही तिरंदाज हरविंदर सिंगची प्रतिक्रिया खूपच बोलकी आहे. तेव्हा या सर्व पदक विजेत्या खेळाडूंचा उचित सन्मान होणे आवश्यक आहे. त्याची दखल राज्य आणि केंद्र सरकार घेईल अशी आशा करुया.

